म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ...निबंध
सं. क्र. २८२२.

दृष्टीआडच्या सृष्टीत

कृष्णाबाई मोटे



REFBK-0023021

२१९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

27 JUN 1981

4 JUL 1981

11 JUL 1981

29 JUL 1981

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

निबंध/समाजशास्त्र
२८२८
२३०२७
९१२१८०
संदर्भ शाखा

दृष्टीआडच्या सृष्टीत

कृष्णाबाई मोटे

REFBK-0023021

अभिनव प्रकाशन, मुंबई ४०००१४

प्रकाशक :

वामन विष्णु भट

अभिनव प्रकाशन

५३, गुरु नानक मार्केट,

डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

© श्रीमती कृष्णाबाई मोटे

पहिली आवृत्ती : १९३९

दुसरी आवृत्ती : १९४६

तिसरी आवृत्ती : सप्टेंबर १९८०

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

किंमत : सोळा रुपये

मुद्रक :

एस० व्ही० काणेकर

मुद्रणस्थळ : न्यू एज प्रिंटिंग प्रेस,

८५, सयानी रोड, प्रभादेवी,

मुंबई ४०० ०२५

प्रकाशकाचे दोन शब्द

"**दृष्टीआडच्या सृष्टीत**" या श्रीमती **कृष्णाबाई मोटे** यांच्या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ती. या पुस्तकाची पहिली आवृत्ती नागपूरच्या सुविचार ग्रंथ माले तर्फे १९३९ सालात प्रसिद्ध झाली. दुसरी आवृत्ती पद्म प्रकाशन, मुंबई यांचेतर्फे १९४६ साली प्रकाशित झाली. या पुस्तकाचे हिंदी भाषांतर "**आँख ओर पहाड ओर**" या नावाखाली १९५५ च्या सुमारास प्रसिद्ध झाले होते. पुस्तकरूपाने प्रसिद्ध होण्यापूर्वी यातील बरेच लेख १९३० सालापासून किर्लोस्कर, स्त्री, प्रतिभा व अन्य काही नियतकालिकांतून '**श्यामा**' या टोपणनावाने येऊन गेले होते.

चाळीस वर्षापूर्वी वाचलेले व मला अत्यंत आवडलेले हे पुस्तक अद्यापही माझ्या मनात घर करून होते. अलीकडेच '**संग्रहालय**' मासिकात 'लक्षात राहिलेली पुस्तके' या सदरात एकेकाळी गाजलेल्या परंतु आजच्या वाचकांच्या पूर्णपणे 'दृष्टीआड' झालेल्या या पुस्तकाचा परिचय करून द्यावा या इराद्याने मी त्याचा शोध घेऊ लागलो पण ते कुठेही मिळेना. गंमत म्हणजे खुद्द श्रीमती कृष्णाबाईंकडेही त्याची प्रत नव्हती. शेवटी श्री. **रत्नाकर वाशीकर** यांच्या संग्रहात असलेली एक प्रत त्यानी मला उपलब्ध करून दिली.

पुस्तक हाती पडताच मी मोठ्या उत्साहाने ते वाचून काढले. आणि चाळीस वर्षानंतरही ज्यातील '**ताजेपणा**' यत्किंचितही कमी झालेला नाही असे अगदी एक नवे पुस्तक वाचल्याचा आनंद मला झाला.

"**दृष्टीआडच्या सृष्टीत**" हे पुस्तक म्हणजे ग्रामीण आणि शहरी विभागातील, समाजाच्या दृष्टीने उपेक्षित अशा काही वस्त्यांतून जागरूकतेने टिपलेल्या समाजदृश्यांची 'सजीव' रेखाटणे आहेत.

समाजसेवेच्या आवडीने पत्करलेले काम करीत असताना बाईना आलेला एकेक अनुभव म्हणजे भारतीय समाजपुरुषाला वर्षानुवर्षे जडलेल्या अज्ञान, दारिद्र्य, ऋढीग्रस्तता इ. रोगांची शिकार झालेल्या दुर्दैवी जीवांची घडून आलेली विदारक शोकांतिकाच जणू.

अलीकडे दलित साहित्याच्या रूपाने समाजातील एका उपेक्षित विभागाचे ज्वलंत चित्रण आपल्यासमोर येऊ लागले आहे. परंतु चाळीस वर्षांपूर्वी '**उपेक्षितांचे अंतरंग**' लिहिणाऱ्या कै. **श्री. म. माटे** यांच्यापूर्वीही अनेक वर्षे—कृष्णाबाईंनी या तथाकथित गुन्हेगार, दलित, पीडित समाजाची दुखणी मराठी साहित्याच्या वेशीवर मांडली हे त्यांचे कार्य कुणालाही विसरता येण्याजोगे नाही. असे असताना मराठी साहित्याच्या कोणत्याही इतिहास पुस्तकात '**दृष्टीआडच्या सृष्टीत**' ची नोंदही घेतली जाऊ नये याचे नवल वाटते. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या डॉ. **भालचंद्र फडके** यांच्या मराठीतील स्त्री लेखिकांच्या वाङ्मयकृतींचा आढावा घेणाऱ्या प्रबंधात या पुस्तकाची योग्य दखल घेण्यात आली आहे हा एक सुखद अपवाद.

"**संग्रहालय**" मासिकात '**दृष्टीआडच्या सृष्टीत**' चा परिचय करून देणारा माझा लेख आणि '**निर्जीव तक्के**' हा त्या पुस्तकातील एक उतारा प्रसिद्ध होताच वाचकांनी हे पुस्तक कुठे मिळेल याबद्दल माझ्याकडे विचारणा केली. ते पुस्तक सध्या बाजारात उपलब्ध नसल्यामुळे त्याची नवीन आवृत्ती एकाद्या नामवंत प्रकाशनसंस्थेमार्फत प्रकाशित करण्याबद्दल मी श्रीमती कृष्णाबाईंना सुचविले व दुसरा कोणी प्रकाशक या कामी पुढे येत नसल्यास मी स्वतःच ते प्रकाशित करण्याची तयारी दर्शविली.

श्रीमती कृष्णाबाईंनी अत्यंत तत्परतेने माझ्या पत्राला उत्तर पाठवून आर्थिक मोबदल्याची कोणतीही अपेक्षा न ठेवता पुस्तक प्रकाशनास अनुमती दिली. त्यामुळे या पुस्तकाची तिसरी आवृत्ती '**अभिनव प्रकाशन**' च्या वतीने आज प्रकाशित होत आहे.

श्री. **हरीभाऊ मोटे** व श्रीमती **कृष्णाबाई मोटे** यांनी माझ्याबद्दल दाखविलेल्या या आपुलकीबद्दल मी त्यांचा खूप खूप ऋणी आहे.

वामन विष्णु भट

दृष्टीआडच्या सृष्टीत



अनुक्रम

❀

१

१	दृष्टीआडच्या सृष्टीत	९
२	मोठ्या मायेचे बोलावणे	१६
३	भिकारी वार्डात	२१
४	निर्जीव तक्के	३०
५	जुगारीचा पहिला धडा	३५
६	माझे कोरडे तत्त्वज्ञान	४३
७	गिरणीतून आल्यावर	४७
८	काशाबाचे स्वप्न	५७
९	श्रद्धानंद महिलाश्रमास भेट	६३
१०	फिरून तुरुंगात	७२
११	जुव्हेनाईल कोर्टात	७९
१२	पीर महंमदाचा उद्योग	८९

२

१३	टेम्स नदीवरील एक आठवण	९९
१४	विलायतचे पत्र	१०३
१५	मॅन्चेस्टर व आसपास : १	१०८
१६	मॅन्चेस्टर व आसपास : २	११७
१७	मॅन्चेस्टर व आसपास : ३	१२२
१८	हेल्सनोर !	१२५
१९	मिस्टर ब्राईट	१३६

१

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य पहिले

दृष्टीआडच्या सृष्टीत

* * * * * * * * * * * * * * *

आज त्या पुऱ्यातून आल्यापासून माझे डोके कसे फिरून गेले ! रागावू तरी कोणावर ? मी स्वतः हे काम पत्करले कशाला म्हणून माझ्यावर रागवू, की धर्मावर रागवू, का रूढीला शिव्या देऊ !

आपल्या हातून काही तरी व्हावे—चोहोकडे कामाचे डोंगर पडले असता एकच काम सत्राशे जणींना करावयाला पाहिजे; इतरत्र किती कामें आहेत पण त्यांकडे कोणी ढुंकून सुद्धा पाहात नाही; आपण यातून निराळा मार्ग काढला पाहिजे; युरोपियन स्त्रियांप्रमाणे नाना क्षेत्रात शिरायला पाहिजे; म्हणून मी मोठ्या आवडीने हे समाजसेवेचे काम पत्करले. काय अभिमान वाटला त्या वेळी मला ! 'सर्व्हेंट्स ऑफ इन्डिया' म्हणून म्हणवून घेताना त्यांच्या आद्य चालकांना सुद्धा इतका अभिमान वाटला नसेल ! पण नुसते समाज–सेविका म्हणून स्वतःला गौरवून घेणे आणि प्रत्यक्ष काम करणे यात किती अंतर आहे !

आज मिस् रोझब्रोबर त्या पुऱ्यात गेले. बोलून चालून आम्ही महार-वाड्यात गेलेल्या. अशा वेळी मी काही त्यांच्याकडून मोठ्या मानमरात-बाची अपेक्षा केली नव्हती; पण अशा अनपेक्षित रीतीने माझे स्वागत होईल अशी कल्पनासुद्धा मनात आली नाही एवढे खरे. त्या ठिकाणी शिरल्यापासूनचा सारा देखावा कसा माझ्या दृष्टीसमोर स्पष्ट उभा आहे. अगदी ती पहिली उजवीकडची लिंबाखालची झोपडी. एक म्हातारी, केस पिंजारलेली बाई गोधडी शिवीत घराच्या पुढच्या जागेत बसली होती. तिच्या त्या केस पिंजारून बसण्यात मला काहीच अस्वाभाविक वाटले नाही. सारे कसे मोबतालच्या चित्राला साजेसेच होते. ती एवढीशी झोपडी खरी, पण किती स्वच्छ ! लिंबाखालची जागा कशी झाडून सारवून स्वच्छ राखिली

होती. त्यातच अंगणात बसून दुपारच्या प्रहरी ती गोधडी शिवीत होती. जवळ ४-६ महिन्यांचे मूल जमिनीवरच कायसेसे चोखीत पालथे पडले होते. छान गुटगुटीत होते ते पोर.

आम्ही त्या बाईला विचारताक्षणी पालथ्याच जरा मान उचलून किती सहज डौलदार रीतीने त्या मुलाने आमच्याकडे पाहिले. गोड होते ते दृश्य! तो लिंब, त्याखालची गोधडी शिवीत बसलेली म्हातारी; जवळ धुळीने अंग माखलेले, देवी काढल्याची साक्ष पटविगारे मोठ्यामोठ्या व्रणांचे पण गोंडस हात पसरून पडलेले ते मूल; दुपारची विश्रांतीची वेळ; शांततेचे किती भोळे भाबडे गोड चित्र होते ते! मी त्या बाईला विचारले, "बाई, बसू का?" "हो तर बाई. नको कोण म्हणते?" असे साध्या भावाने म्हणून तिने जवळ उभी केलेली खाट टाकली. आम्ही दोघी त्यावर बसलो. मला तिच्याशी एक क्षण काय बोलावे तेच कळेना. खरंच, काय बोलायचं तिच्याशी? काय हिला 'मी तुम्हांला सुधारण्याला आले' म्हणून सांगू, की हिला शिवायची आवड दिसते म्हणून 'आम्ही उद्यापासून एखादा शिवण्याचा वर्ग काढला तर त्याला येशील का', म्हणून विचारू? माझे सारे शिक्षण आज मला निरुपयोगी वाटले. थॉमस हार्डीच्या कादंबऱ्या वाचताना इंग्लंडमधील खालच्या वर्गाशी सुद्धा समरस होऊन वाचणारी मी आज माझ्या देशातल्या, माझ्या समाजातल्या, माझ्या धर्मातल्या एका बाईशी सहज बोलू शकले नाही. सहज प्रश्न विचारायचे म्हणून सुरुवात केली, "बाई, किती महिन्याचे मूल?" "असल बाई ५-६ महिन्याचं." झाले, तिचे माझे भाषण सहज सुरू झाले. खरोखर लहान मूल म्हणजे कोणत्याही दोन स्त्रीहृदयांना साधणारा एक दुवाच आहे. कोणत्याही बाईपाशी मूल अस् द्या. तुमची तिची पंधरा मिनिटांच्या आत गट्टी जमेल.

तिचे माझे भाषण चालू होतेच. रस्त्याने मधून मधून ओढ्यावरून धुणे धुवून येणाऱ्या बायका जात येत होत्या. आम्हांला तिथे बसलेल्या पाहिल्या की थबकून त्या तिथे थांबत. त्यांच्या चेहऱ्यावरचे ते कुतूहल, विशेषतः नवीन माणूस पाहिल्याबरोबर कोणत्याही तऱ्हेने न लाजता अगदी डोळे लावून पाहण्याची ती पद्धती, साऱ्याची कशी मला मजा वाटली. त्यांच्या उभे

राहण्याच्या पद्धतीत तरी किती स्वाभाविक डौलदारपणा होता! डोक्यावर धुणे घेऊन गुडघ्यापर्यंत लुगडे खोवून तोंडात बोटे घालून अभावितपणे उभी राहणारी एक पोरगी तर मला फारच आवडली. मी तिला विचारले, "काय ग तुझं नाव?" पण ती काय म्हणून उत्तर देईल? तिने मान फिरविली नी पुढे चालती झाली. जाता जाता मागे वळून पाहत होती. पण माझ्या प्रश्नाला उत्तर देण्याकरिता खास नव्हे.

झाले, आम्ही आल्याची बातमी किती तरी चटकन येथे पसरली. एक 'साहेबीण' आणि एक बाई आली आहे, एवढीच गोष्ट त्या वस्तीत खळबळ उडवायला अगदी पुरेशी होती. मिस रोझ तोडक्या मोडक्या मराठीत त्या म्हातारीशी बोलत असता मी इकडे तिकडे पाहत होते. झोपड्यांच्या पुढच्या अंगणात कोणी बायका पोरे घेऊन येऊन बसल्या, कोणी तेलफणी घेऊन केस विंचरीत दारापुढे बसून राहिल्या, कोणी दगडाजवळ भांडी घासायला सुरुवात केली. थोडक्यात, दुपारच्या वेळी त्या वस्तीत जेवढ्या बायका जमणे शक्य आहे तेवढ्या साऱ्या निरनिराळ्या निमित्ताने आपल्या झोपडीबाहेर येऊन उभ्या राहिल्या. त्यातल्याच चौघी पांचजणी त्या म्हातारीच्या दाराशी जमल्या. कोणी दात कोरीत, तर कोणी दोन्ही ओचे हातात धरून. पण साऱ्यांचे डोळे आमच्याकडे लागलेले.

लहान पोरेपोरी तर आमच्यापासून दहापंधरा हातांच्या अंतरावर जमून अगदी टक लावून आमच्याकडे पाहत होती. त्या वेळी मला अगदी लहानपणची आठवण झाली. एखादा अस्वलवाला किंवा माकडवाला आला म्हणजे आम्ही अशाच उभ्या राहत असू. पण आज त्या अस्वलवाल्याची पाळी आमच्यावर आली होती. काय विचित्र दिसत होता तो जमाव! इतर वेळी मी "काय ही घाणेरडी पोरं" असे म्हणून त्यांच्या शेजारी सुद्धा गेले नसते व त्यांचा विचारही केला नसता. पण माझे हे कार्यक्षेत्र या नात्याने त्यांच्याकडे दृष्टी टाकताना माझे मलाच किती तरी अवघड वाटले.

त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करणे निष्फळ होते. मी एकदोघी पोरींना प्रश्न विचारले. त्यातील एक भिऊन पळून गेली. एक जरा मोठी व धीटही होती. तिने दुसरीकडे बघून हसायला सुरुवात केली. त्या दोघींचे

हसू निर्विकारतेने घ्यायला माझ्या मनाची सारी तयारी त्या वेळी जरा लंगडीच पडली. माझ्या समाजात मी असते तर...खास संतापलेच असते. पण त्या संतापाचे येथे काय होय ? निमूटपणे मी आणि मिस रोझ त्या चारपाच बायका व म्हातारी बसली होती तिकडे वळलो. त्यांच्याकडे पाहून आम्ही जरा हसल्यासारखे केले. मिस रोझ नमस्कार म्हणायला शिकल्या होत्या. त्यांनी नमस्कार केला.

बोलण्याला आरंभ आम्हीच केला. थोड्याच वेळात रस्त्यावर काही गंमत झाली म्हणजे चार लोक जमावे तशाच साऱ्या बायका आमच्याभोवती जमल्या. आम्ही रंगलो. हळूहळू नवथरपणाचा पडदा दूर झाला. त्याबरोबर त्याही बायका हसून खेळून मिस रोझविषयी प्रश्न विचारू लागल्या. त्यांनी सारे सारे विचारून घेतले. त्यांच्या पोषाखाविषयी व एकंदर अंगात घालण्याच्या कपड्यांविषयी त्यांची फारच उत्सुकता दिसली. त्यांनी नाही ते प्रश्न विचारले. एरव्ही कुठे जर ते प्रश्न विचारले गेले असते तर मिस रोझना अपमानच वाटला असता. पण येथले सारे काही न्यारेच होते. सुधारलेल्या समाजाच्या अंगी मुरलेले शिष्टाचार येथे माहीत होते कोणाला ?

माझ्याजवळ बसलेली म्हातारी चांगलीच रंगात आली. तिने आपल्या पसरलेल्या पायांवरून एकवार हात फिरविला व दातवणाने काळ्या पडलेल्या दातांची कवळी बाहेर काढीत काढीत मला सांगितले, "बाई, आता एक गाणे गा ना." मला गाता येत नाही म्हणून, नाही तर त्यांच्याशी मिसळण्याच्या त्या भरात मी कदाचित गायला सुरुवातही केली असती व मग त्यांच्या विचारण्याचा अर्थ मला कधीच कळला नसता. तिच्या प्रश्नाला मी साहजिकपणे "बाई, मला गाता येत नाही" म्हणून उत्तर दिले. म्हातारी फिरून हसून म्हणाली, "बाई, तुम्ही लोक तर नेहमी गाता, तुला नाही गायला येत ?" तिच्या बोलण्याचा मला काहीच अर्थ कळेना.

मी गोंधळून तिच्याकडे व इतर बायकांकडे पाहू लागले. पण साऱ्या बायका जणू काय तिचा प्रश्न म्हणजे अगदी साहजिक प्रश्न, अशाच मुद्रेने माझ्याकडे पाहात होत्या. "तुमच्याजवळ ते बुक नाही ? ते बुकातले

गाणे." म्हणून म्हातारीने हातानी लिहिलेल्या गाण्याचा जो अभिनय करून दाखविला तो इतका स्पष्ट होता की, सुप्रसिद्ध मूकाभिनयपटु नट चार्ली चॅपलिन याला सुद्धा तो इतक्या सफाईने साधला असता की नाही याची शंकाच आहे. तिच्या शब्दानी, कृतीनी, डोळ्यांनी माझ्यासमोर एक अगदी लहानपणी पाहिलेले चित्र उभे केले. मला लहानपणी खेडेगावात राहत असता पाहिलेल्या एका गाणाऱ्या मिशनरी बाईची आठवण झाली. त्या आठवणीबरोबर कसेसेच झाले. मी जरा चिडल्यासारखी होऊन तिला विचारले, "कोणचे गाणे म्हणता बाई तुम्ही? आमच्याजवळ तर बुकबिक काहीच नसते." ती म्हातारी मोठ्याने हसली. जणू काय मी असे उत्तर देईन अशी तिची अपेक्षाच होती. तिच्या हसण्याने साऱ्यांना मजा वाटली. म्हातारी जरा चढून गेली. "बाई, बाई, ते–ते तुमच्या देवाचे गाणे." म्हणून साभिनय तिने प्रश्न केला.

मी मिस रोझकडे पाहिले. त्यांना चाललेल्या प्रश्नोत्तरापैकी काही कळत नव्हते. त्या नुसत्या त्या बायकांकडे व माझ्याकडे पाहत होत्या. त्यांना मी इंग्रजीत त्या बायकांचा प्रश्न समजावून सांगितला तरी विशेषसा अर्थबोध झाल्याचे दिसले नाही. पण मला त्यांच्या प्रश्नाविषयी शंका उरण्याचे कारणच नव्हते. काय वाटले त्या वेळी मला, याची कल्पना आली की मन चरकते. चांगली मी जातीने ब्राह्मण असून आज या बायका मला समजताहेत तरी कोण? खिस्ती? छे! यांना एवढे सुद्धा ओळखण्याची अक्कल नाही? "मी काय खिस्ती दिसते तुम्हांला?" असे विचारण्याचे माझ्या मनात आले--पण नको. मी आणि खिस्ती यांचा संबंध एका वाक्यात जोडून, प्रश्न विचारून, याची परीक्षा पाहणे सुद्धा बरे नाही. मी ठासून उत्तर केले, "बाई, मी ब्राह्मण आहे, तुम्हाला मी वाटले तरी कोण? तुमचा देव तोच माझा देव, कोणत्या देवाचे तुम्ही गाणे म्हणता? कृष्णाची, विठोबाची तुम्ही नाही का गाणी गात? तीच आम्ही गातो. आमचा देव निराळा नाही." आता शांतपणे विचार करता करता मला वाटते की, खरोखर ही महार माणसेसुद्धा माझ्याच धर्माची आहेत ही गोष्ट आज त्यांनी मला खड्यासारखी उचलून टाकण्याचा प्रयत्न केला नसता तर माझ्या

मनात कधीच ठसली नसती. "बाई, मी काही मिशनरी नाही. आपला चांगला हिंदु धर्म आहे, चांगला आहे तो सोडून दुसऱ्या कोणत्या देवाचे गाणे मी उगीच कशाला म्हणू?" मी चटकन हे बोलून तर गेलेच. माझ्या दिसणाऱ्या फणकाऱ्याने त्या बायका जरा चमकल्या, स्तब्ध राहिल्या, तरी पण त्या खात्री पटल्यामुळे खास नाही हे त्यांच्या चर्येवरून निर्विवाद दिसत होते. माझ्या विधानाची त्यांना शंकाच होती. पण मी रागावले ही गोष्ट त्यांनी ताडली. हळूहळू आम्हीही आपले भाषण आटोपते घेऊन दुसरीकडे गेलो. पण माझ्या डोक्यातून मात्र झालेला प्रकार जाईना.

काय ही आज आपल्या समाजाची स्थिती! मी आणि मिस रोझ. एक अस्सल हिंदु-हिंदी, एक अस्सल परदेशी. पण आज आमच्या समाजात काम करायला गेले असता दोघीही सारख्याच विदेशी ठरलो! हिंदूलाच हिंदू ओळखू शकत नाही. मी त्यांच्यात जाऊन मिसळू पाहता त्यांना खिस्ती मिशनरी वाटले. मी ब्राह्मण आहे असे ठासून सांगून सुद्धा त्यांना माझा विश्वास पटत नाही. कदाचित मिस रोझबरोबर असल्याने असे झाले असेल. पण तरी काय? त्यांना मी एकदम इतकी का परकी वाटावी? बाकी का वाटू नये?

एक ब्राह्मणाची बाई त्यांच्या वस्तीत येऊन त्यांच्याशी बोलू शकते ही कल्पनाच त्यांना किती नवीन आणि परकी आहे! आजपावेतो या समाजाचे अस्तित्व तरी मला कधी जाणवले होते का? मी त्यांच्या वस्तीत जाताक्षणी मला मी आपल्या लोकांत वावरते आहे असे वाटले नाही. जितके मिस् रोझला त्यांच्यात परकीय वाटेल तितकेच मला वाटले. तिला भाषा येत नव्हती. मला भाषा येत होती. तरी काय! तिला कोठेही बसायला संकोच वाटत नव्हता. संकोच वाटला असेल तो काय जरासा अस्वच्छतेने. पण माझे तसे नव्हते. माझ्या मनातील हजारो वर्षांचे संस्कार "तू आज महारात बसली आहेस" अशा अस्पष्ट जाणिवेने मला अस्वस्थ करीत होते. मग माझ्याविषयी तरी त्यांना विश्वास का वाटावा? त्यांच्यात जाऊन काम करणारे, त्यांना जवळ करणारे, असे कोणी लोक त्यांना भेटत असतील तर ते खिस्ती मिशनरीच. मग त्यांच्याहून एखादी निराळी बाई

अकारण त्यांच्या वस्तीत हिंडू लागल्यास त्यांनी तिच्याविषयी 'मिशनरी' म्हणून कल्पना करून घेतली तर त्यांचा दोष तो खासच नाही!

नुसत्या ह्या अपृश्य वर्गाचीच ही गोष्ट नाही. पांढरपेशे वर्गाशी मिसळणारे थोडेसे कुणबी वगैरे सोडले तर सारेच आमच्यापासून इतके दूर नाहीत का? त्यांना आम्ही त्यांचे वाटत नाही. आम्हांला ते आपले वाटत नाहीत. आमच्या आकांक्षानी त्यांची मने कधीच उचंबळून येत नाहीत. आम्ही त्यांचा कधीच जरूरीशिवाय विचार करीत नाही.

हिंदुस्थान सुधारण्याच्या गप्पा मारे जोरजोराने आम्ही मारीत असतो, पण समाजपुरुषाला पाठीच्या कण्याप्रमाणे आधारभूत असलेल्या ह्या अज्ञ लोकांकरिता आम्ही काय करतो आहो? मिशनरी लोकांना आम्ही नावे ठेवतो, हसतो, त्यांचा उपहास करतो. ते आज पाच हजार कोसावरून येतात. त्यांना या समाजाच्या तळाशी वावरताना घाण वाटत असेल का? पण आज ते लोक, आमच्या दृष्टीने खोट्या पण त्यांच्या दृष्टीने खऱ्या व उच्च अशा भावनेने प्रेरित होऊन केवढे कार्य करीत आहेत? जिथे बैलगाडी सुद्धा जाऊ शकत नाही अशा ठिकाणी जाऊन या लोकानी आपले मठ स्थापन केले आहेत. कल्पना करा, सुधारलेल्या सुखसोयींच्या यांत्रिक जगातून येऊन खेडेगावातून असले उंबराच्या किड्याचे जिणे कंठायचे! किती अवघड गोष्ट आहे ही! आम्ही सुशिक्षित मंडळी नुसते मुंबई, पुणे सोडायला सुद्धा तयार होत नाही. मग असले एकलकोंडे जिणे सोसायला तयार कोठून? आज खेड्यातून—शहराच्या दूरवरच्या भागातून जो लाखो लोक-समुदाय पसरला आहे त्याचा आमचा काय संबंध?...त्यांना आम्ही विदेशी माणसाइतकेच परकी आहोत. या प्रचंड समुदायाला हालवून जागे केले तर आजच्या पेक्षा किती तरी झपाट्याने कार्य होईल.

मला या वेळी 'हिंदुधर्म व सुधारणा' कर्त्या गोळ्यांचे वाक्य आठवते, "शहरातून विजेचा झगमगाट चकचकाट दृष्टीस पडतो पण त्याला येणारी शक्ती अज्ञात प्रदेशात उत्पन्न झालेली असते."

ही अज्ञात शक्ती शोधून कामी लावण्याचे कार्य आज व्हावयास पाहिजे आहे!

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य दुसरे

मोठ्या मायेचे बोलावणे

* * * * * * * * * * * * * * *

कोपऱ्यात केशरी मुण्डासे घातलेला एक माणूस तोंडाने काहीसे पुटपुटत ध्यानस्थ बसला होता. त्याच्यासमोर जोंधळ्याच्या चित्रविचित्र आकृती काढल्या होत्या. त्यांतल्याच एकीवर दिवा ठेविला होता. त्या सगळ्या आकृतीवर हळदकुंकू वाहिलेले दिसत होते. तान्हीचे अंथरूण पार गुण्डाळून ठेवून तिला भिंतीला टेकून तेथे जवळच बसवली होती. मी तिच्याकडे पाहिले; ती पुरी भानावर सुद्धा नव्हती. तिची मान, तारवटलेले डोळे, सारे इतके काही विचित्र दिसत होते, की खरे म्हणजे कांबळे पांघरून ती तशी बसू कशी शकली याचेच मला आश्चर्य वाटत होते.

मी त्या सगळ्या देखाव्याकडे पाहतच उभी होते. तो तान्हीची आई आली. मला पाहताच खरे म्हणजे ती चमकलीच. पण किती? एक क्षण. लगेच डोक्यावरची घागर खाली ठेऊन ती आत गेली, त्यातल्या कडुनिंबाच्या पाण्याने तिने तान्हीवर सिंचन केले; आणि बरोबर असलेली जोंधळ्याची पिवळी पिवळी आंबील तिने तान्हीला खाऊ घालण्यास सुरुवात केली.

हे सारे करीत असता तिच्या हालचाली इतक्या निश्चयाने व शांतपणे चालल्या होत्या की, माझ्या अस्तित्वाला सुद्धा त्यात कुठे वाव नव्हता; मात्र माझा एखादाच वावगा शब्द त्या वेळी निघायला पाहिजे होता, की सुरुंगाची वती शिलगावल्याप्रमाणे वरचा तो दगडी शांतपणा व निश्चय कोसळून भडका मात्र खास उडाला असता. आपल्या एका शब्दाने उपाय होण्याऐवजी अपायच व्हायचा हे मला पुरे कळून चुकले. मी नुसती पाहत राहिले. तो ध्यानस्थ बसलेला मनुष्य मधून मधून माझ्याकडे डोळे उघडून पाही. पण तान्हीची आई माझ्याकडे पाहतसुद्धा नव्हती. आणि तान्ही तर पुरी बेसावधच होती. आणलेल्या आंबिलीची दोन तीन बोटे

तिच्या आईने तिला चाटवली, पण ती सुद्धा पुरी आत न जाता बाहेर आली. बेभानपणे डोळे उघडून तिने एकदा आजूबाजूला पाहिले.

त्या सर्व देखाव्याने तर माझा संताप क्षणाक्षणाला वाढतच चालला. पण तितकाच तो दाबून शांतपणा धारण करण्याची आवश्यकता आहे असे बिचारी मन मला दरडावून सांगू लागले. अखेर धीर धरवेना. काही तरी बोलून संतापाला वाव द्यायचा म्हणून मी विचारलेच, "तान्हीचा ताप उतरला का?"

तिची आई तयारच होती.

"ताप! ताप उतरतोय अशाने? तो का साधा ताप हाय? देवीचा कोप हाय त्यो. त्येला कोठे असं विंग्रजी औषध चालतंय व्हय? म्हणे ताप उतरला काय! देवी तर डॉक्टरला बोलावला म्हणूनच रागावली हाय!"

"अग असं कुठं होतं का?" मी जरा बोलण्याचा प्रयत्न केला. पण ती बोलूच देईना.

"बरं झालं बाय; मला सुबुद्ध झाली आणि तुमचं औषध दिलं न्हाई. नाही तर एवाना कामच झालं असतं. माझी प्वार हातातनं गमावली असती!"

"औषध दिलं नाही!" माझ्या तोंडून आश्चर्यातिरेकाने स्तंभितच होऊन शब्द बाहेर पडले.

"हो! मी त्येयाला बसलंय् औषध?"

"पण मग औषधाचे काय केलेस?"

"काय करायचं त्येच केलं. तू आणून दिलंस म्हणून मी देईन असं वाटलं तुला?" तुम्ही ची भाषा मी—तूवर आली. इतका वेळ गप्प बसलेल्या मांत्रिकाने आता डोळे उघडले; आणि तिच्या समर्थनार्थ म्हणून तोही भोप्या बोलू लागला.

"बाई, हा देवीचा ताप आहे. त्येला डॉक्टरी औषध नाही लागू पडत." जणू काय असल्या गोष्टी मला समजणे कठीण अशा स्वरात तो सांगू लागला. "बाई, देवी रागावली आहे हिच्यावर. तिला भुक लागली आहे. त्याला निराळंच औषध हवं." असे म्हणून सूचक मुद्रेने त्याने

माझ्याकडे पाहिले.

मीही डोळे फाडून त्या लोकांकडे पाहू लागले. तान्हीची आई, तो मांत्रिक आणि देवीपुढे बेभान पडलेली ती तान्ही ! करणार तरी काय हे लोक त्या पोरीचे ! मारणार काय ? एक वेळ मनात आले, कायद्याची दहशत घालून पोरीला घेऊन नाही का जाता येणार ? पण असा कोणताच कायदा माझ्या पाठीशी नव्हता. कायदा आंधळा आहे. वेड्या समजुतीने किंवा कसे का होईना, आईबाप मुलांचे प्राणही घेऊ शकतात, हे कायद्याला दिसत नाही ना ? रागावण्यात तर काहीच फायदा नव्हता. मी त्यांच्या घरात होते. त्यांनी मला घालवून दिले असते, तर मी त्यांचे काहीच करू शकत नव्हते. एक मन सांगू लागले, 'जा येथून आता. तुझा येथे उपयोग नाही.' दुसरे मन माघार घेईना. 'माघार ? मग कशी तू काम करणार ? बुचकळ्यात पडलेली मी विचार करू लागले. करू तरी काय इथे ? काय करू ? 'एक उपाय चालत नाही तर दुसरा करून पहा. आता एक वेळ सोडशील, पण नेहमी–?' दुसऱ्या मनाने उत्तर दिले.

अखेर मी माझे तंत्र बदलले.

"हं, तान्हीची आई. हा देवीचा कोप तर खराच." मी तिच्याविषयी सहानुभूतीच्या स्वरात बोलू लागले, 'पण बघा तुम्ही चुकला. औषधाला विटाळ नसतो. औषध म्हणजे प्रत्यक्ष गंगेचं पाणी ! सदैव शुद्ध ! त्याला कसला आला आहे विटाळ ? प्रत्येक वेळी औषध देताना देवीच्या पुढे ठेवावं आणि देवीचे नाव घेऊन द्यावं म्हणजे काही दोष नाही की देवी रागावत नाही. आम्ही असंच करतो. असं भांड्यात औषध घ्यावं, देवीचं नाव घ्यावं, 'औषधं जान्हवी तोयं' म्हणावं आणि एकदम घशात. प्याल्यानंतर मात्र भांडं पालथं टाकावं लागतं, म्हणजे त्याचा ओघळ येतो तो धरित्रीला मिळतो आणि ती संतुष्ट होते."

माझ्या तंत्राचा परिणाम झाला नाही असे नाही. एकूण मी अगदीच देवीच्या विरुद्ध–विंग्रजीच–नव्हे तर ! तिला तितकी खात्री पटली व बरे वाटले. विशेषतः औषध घेण्याचे माझे यथासांग तंत्र तिला फारच पसंत पडले.—

गंमत आहे या लोकांची. धर्म घ्या, नीती घ्या, कोणतीही सुधारणा घ्या, त्यांना आचार पटतो, तंत्र पटते आणि त्यालाच ते चिकटून बसतात. मी औषधाचे तंत्र सांगितल्याने तिला जितकी खात्री पटली तितकी प्रत्यक्ष औषधाने सुद्धा पटली नसती. आणि त्यात आम्हीही असेच करतो असे सांगितल्यावर खास ह्या बाईजवळ देवीसंबंधी बोलायला तर हरकत नाही इतके तिच्या मनाने घेतले. आणि तान्हीची आई बोलू लागली !

"बाई, तसं नव्हं. परवाच मी याला देव पाह्यला सांगितलं, पर देवीचं काही उत्तरच येईना. त्येनं मला सांगितल की देवी डॉक्टराला बोलावल्या-वरून रागावली जणू ! मी अखेर बोलल्ये, 'अरे बाबा, डॉक्टर आला, बाईनं त्येचं औषध बी दिलंय, पर मी नाही दिलं माझ्या पोरीला.' अखेर काल सांजपासून साऱ्या रात्रभर अक्षी देवी बोलावली तवा कुठं सकाळी देवी बोलली. डॉक्टरचा राग बीग काही नाही, माज्याकडून पर देवीचं काय चुकलं व्हय कंदी, त्येचा बरीक कोप झालाय. त्येनंच संतापून जाऊन तिन्हं तान्हीला बोलावणं बी धाडलंय ! माझी छाती धडकूनच गेली. म्हटलं, पोर जात्ये. किती देवीच्या पाय पडले, अर्जबा केल्या. लुगडं चोळी नेसवीन बोलल्ये, पाच रुपे दक्षणा बी ठेवीन असं कबूल केलं, तवा कोठं देवी जरा परसन्न झाली. ती बोलली की मला तान्हीची भूक लागली हाय, पर आत्ताची येळ सोडते. एक बकरा दे आणि आज आत्ताच्या आत्ता जाऊन माझं तीरथ आण आणि अंगावर शिंपड. त्येला माझा निविद पाठव. मघा न्हवं का तुमी मला पाह्यली, ते तिचं मायेचंच करीत होत्ये. आता सांग, माय इक्ती बोलल्यावर दवा कसा देणार ?—"

काय बोलणार मी ! माझे सर्व प्रयत्न निष्फळ होते हे मला कळले होते. मी आणलेली मुसंबी देवीच्या प्रसादाला गेली होती, औषध ?— ते तर गेलेच. फक्त मी मात्र त्या घरातून देवीच्या कारणी लागल्याशिवाय सुटले.

विषण्ण मनाने मी परत आले. डोक्यात एकच विचार येत होता. मायेचे नाव करून तो मांत्रिक पाच रुपये, बकरा, लुगडेचोळी लाटणार आणि सर्व मिळून पोरीला मारणार ! काय हे अज्ञान ! पण असे वारंवार

म्हणायचे सुद्धा माझ्या जिवावर येते. ह्या लोकांच्या जीवितावर ही धर्माची बसलेली खोटी पकड पाहिली की मी हताश होते. ह्यातून एका पिढीतून डोके वर काढू पाहणे म्हणजे निव्वळ दगडाशी टक्कर घेणे आहे, असेच वाटू लागते. आणि स्वतःवरच चिडून मी गप्प बसते.

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य तिसरे

भिकारी वार्डात

* * * * * * * * * * * * * * *

१६ नोव्हेंबर

आज त्या मुलाला आम्ही हॉस्पिटलमध्ये टाकला. त्या मुलाची स्थिती म्हणजे खरोखरच आभाळ फाटल्यासारखी नाही का?

आम्ही सकाळी मोटारमधून जात होतो तेव्हा आम्हाला एका माणसाने येऊन सांगितले, "बाई, मुलगा भारी आजारी आहे. त्याला कोणीसुद्धा तसा नातेवाईक नाही. तुम्हीच त्याची काळजी घेतलीत तर. त्याचा म्हातारा चुलता अगदी आंधळा आहे आणिक घरात कोणी असेल तर माहीत नाही. तो पहा, त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन चालला आहे."

आम्ही खाली उतरून जवळ गेलो. मी पाहिले तो एक आंधळा ५५-६० वर्षांचा म्हातारा त्या आजारी मुलाला पाठुंगळीला बांधून घेऊन चालला होता. त्या म्हाताऱ्याची आधी स्वतःची स्थितीच सोसाट्याचे वारे अनेक वर्षे सहन करून क्षीण झालेल्या वृक्षासारखी झाली होती. पण तशाच स्थितीत तो त्या मुलाला घेऊन चालला होता. रस्ता पुरा दिसत नसल्याने मधून मधून ठेचाळत होता. मी त्याला थांबवून विचारले,

"बाबा, या मुलाला इस्पितळात ठेवायला तयार आहात का? आम्ही करतो त्याची सारी व्यवस्था." त्या दृष्टिहीन, कळाहीन, सुरकतलेल्या चेहऱ्यावर सुद्धा अंतःकरणातील कृतज्ञतेने जरा टवटवी आली. "बाई, तुमचे देव कल्याण करो. बघा मी असा आंधळा, घरात दुसरे कोणी नाही. अशात या पोराचा कुठे संभाळ करू? त्यातून याचे याला या जागचे त्या जागी हालता येत नाही." असे म्हणून त्याने पाठीवरची मोट उतरली. "हरी, बाबा ऊठ. तुझ्या नशिबाने बघ मायच स्वतः धावून आली."

त्या मुलाकडे पाहून मला काय वाटले हे सांगता येणे खरेच कठीण आहे. त्याच्या निस्तेज होत चाललेल्या प्राणज्योतीला सर्वंध शरीरावर पसरलेली मृत्यूची छाया दूर करता येत नव्हती. अंधारात क्षीण प्रकाशाने चमकणाऱ्या लहानश्या ज्योतीने अंधाराचे स्वरूप जास्तच भयाण व्हावे तशाच प्रकारची भीषणता त्याच्या सर्वांगावर पसरली होती. हातपाय अन्नपाण्यावाचून व रोगाने अगदी पिकुटल्यासारखे होऊन गेले होते.

मोटार जवळ आणता येणे शक्य नव्हते व त्याला तर पाऊलसुद्धा टाकायचे सामर्थ्य नव्हते. अखेरीला एकाने उचलून त्याला व म्हाताऱ्याला मोटारीत घातला आणि आमचा मोर्चा हॉस्पिटलकडे वळला.

रस्त्यात त्या मुलाची हकीकत आम्हाला कळली. त्याला आईबाप कोणी नव्हते. तो या आंधळ्या चुलत्याजवळ राहत होता. एक दिवस चुलता फार रागावला व त्याने वेदम मारले म्हणून तो घरातून पळून गेला. मुंबईतल्या गोदीत तो कसलेसे काम करीत असे. चौदा वर्षांचा मुलगा, त्याला गोदीत काय काम मिळत असेल ते असो, पण तिथे चांगला एक दोन महिने काम करीत होता खरा. मुंबईची वस्ती, लहान वय व टाकून दिलेल्या कचऱ्याप्रमाणे होणारी वाढ. अशा वेळी तो मुलगा आजारी पडला तर काहीच नवल नव्हते. आव, ताप, यांनी तो चांगलाच बेजार झाला. आपल्या आजारीपणाचे जेव्हा तो मुलगा सांगायला लागला तेव्हा तर खरेच कुणाचेही मन कळवळल्याशिवाय राहणे शक्य नव्हते. तो सांगू लागला, 'बाई, आजारीपणात एक दिवस भूक लागली, पण खायला काही नव्हते. भीक मागून तरी काही मिळाल्यास पाहावे म्हणून तसाच रखडत उठलो नी चालू लागलो. जरा नाक्यापर्यंत गेलो न गेलो तो घेरी येऊन फुटपाथवर पडलो बघा. किती वेळ तसाच होतो. प्रत्येकजण माझ्याकडे बघून काही वेळ थांबून पुढे जाई. पण एकाच्याही मनात मला उचलण्याचे की माझी विचारपूस करण्याचे आले नाही. बाटे, देवा! मी असाच का इथे मरणार! कुणाला कशी माझी कीव येत नाही! साऱ्याना मजा बाटते आहे. बाई, अखेरीला देवालाच माझी कीव आली. एका तुमच्यासारख्या धर्मात्म्याने मला गाडी करून इस्पितळात नेऊन

टाकले. तिथे चांगला महिनाभर होतो. पण काही केल्या बरं वाटेना. शेवटी इस्पितळवाल्याने सांगितले, तू आता घरी जा. म्हणजे बरे वाटेल; म्हणून परत काकाकडे आलो. तो इथे ही दशा तुम्ही पाहताच आहा. बाई, मी इस्पितळात बरा होईन का हो?" म्हणून त्याने अगदी केविलवाण्या नजरेने आमच्याकडे पाहून डोळे मिटून घेतले. तो अगदी स्वस्थ पडून राहिला. त्याला रडू कसे ते आलेच नाही. कसे येणार! रडायला त्याची आसवे उरली नसावीत. परिस्थितीच्या कठोर तापाने केव्हाच ती खाक होऊन गेली. पण त्यामुळेच त्याच्या नजरेतला भयंकर हताशपणा अगदी अंतःकरणातल्या मर्मभागात जाऊन बोचू लागे.

थोड्याच वेळात आम्ही हॉस्पिटलमध्ये आलो. अलीकडे दवाखान्यात आम्ही चांगल्याच परिचयाच्या झालेल्या होतो. आम्ही आणीत असलेल्या रोग्यांच्यामुळे तेथले नोकरचाकर किंवा नर्सेस यांना काय वाटे ते सांगता येणे कठीण आहे. पण निदान मुख्य डॉक्टर तरी, वरवर का असेना, आम्हाला उत्तेजन देत असे, व आमच्या कामाविषयी पूर्ण सहानुभूति दाखवीत असे. त्यामुळे आम्ही त्याचा पुरेपुर फायदा घ्यावयाचे ठरविले होते.

"काय नवा रोगी आणलात?" गर्दीत असलेल्या एका डॉक्टरने आम्हाला पाहिल्याबरोबर नमस्कार करून हसत हसत येऊन विचारले. "हो. तुम्हाला अलीकडे रोगी कमी आहेत ना, म्हणून काम आणले आहे." मिस् रोझनी हसतच उत्तर दिले.

खरोखर अशा वेळी माझ्यासारखे विचार मनात येणे म्हणजे मनाच्या कोतेपणाचे निदर्शक असेल, पण माझ्या डोक्यात तसे विचार आल्याबाचून राहिले नाहीत खरे. समजा आम्ही (नुसत्या हिंदी स्त्रियाच) पुढे अशा रीतीने काम करीत राहिल्यास आता आमच्याविषयी जी सहानुभूती आणि तत्परता दाखविली जाते तीच कायम राहील काय? सध्या ठीक आहे. आमच्याबरोबर गोरी बाई आहे. आणि गोऱ्या कातडीचा परिणाम आमच्यावर इतका नकळत होतो की तो आमचा आम्हांला सुद्धा कळत नाही. अगदी न कळता त्यांच्याशी आमची वागणूक बदलते. पण—

असा विचार करीत राहायला वेळ नव्हता. लगेच डॉक्टर आले. मी थोडक्यात त्या मुलाची हकीकत डॉक्टरना सांगितली. मधून मधून तो म्हाताराही सांगत होता. अखेरीला तर त्या म्हाताऱ्याने अगदी कळवळून डॉक्टरचे पाय धरले नी सांगितले, "महाराज, याला तुमचाच समजा नी पहा. तुम्हीच त्याचे मायबाप, सारे तुम्हीच आहात." आपल्या सारख्याना हा देखावा अपरिचित असल्याने कसेसेच वाटते, पण डॉक्टरांना असला प्रकार नेहमीच सरावातील असल्याने त्यांना काहीच वाटत नाही. पण दर वेळी पाय धरणारा माणूस मात्र तितक्याच उमाळ्याने पाय धरीत असतो. अशा वेळी डॉक्टर म्हणजे यमाच्या हातून सोडवायला आलेल्या विष्णुदूताप्रमाणे वाटतो. डॉक्टरनी आपल्या जड स्वराने त्याला आश्वासन दिले.

त्याला हॉस्पिटलमध्ये ठेवायचा पण साऱ्या रोग्यांत ठेवणे शक्यच नव्हते. त्याचा ताप–रोग कशा तऱ्हेचा होता याची काही अजून कल्पना नव्हती. शिवाय, सांसर्गिकही असण्याचा संभव, म्हणून त्याला निराळे ठेवणे तर प्राप्तच होते. अखेरीला भिकारखान्यात (Pauper ward) त्याची सोय करू असे डाक्टरनी सांगितल्यावर आम्ही निघून परत आमच्या कामाला गेलो.

संध्याकाळी मी त्याला पाहायला गेले. आणि खरेच सांगायचे म्हणजे मला तो भिकारखाना, त्यातले ते रोगी, सारे बघून कसे अंगावर शहारे आले. आधीच बोलून चालून तो भिकारखाना. त्यात उत्तम व्यवस्था असेल अशी अपेक्षा करणे म्हणजे मूर्खपणाच होय. तरी, छे! इतकी नव्हती माझी कल्पना.

खोलीत शिरल्याबरोबर घाणीने तर मला कळमळायला लागले. सारा बिछाना घाण झाला होता. खोलीत घाण झालेली होती. त्यावर माशा किती भणभण करीत होत्या. जवळच ठेवलेल्या एका पितळेच्या घाणेरड्या तांब्यांत दूध उघडे पडले असून त्यात कितीएक तरी माशा पडल्या होत्या.

साऱ्या खिडक्या बंद असून घाण बाहेर जायला अगदी वावच नव्हता. मग स्वच्छ हवेची नुसती झुळूक तरी कोठून येणार!

माझे मन हा सारा प्रकार पाहून किळसून गेले. आधीच मला दवाखाने आवडत नाहीत. त्यातून ही घाण नी ही व्यवस्था पाहिल्यावर तर विचारूच नका.

मी हरीला हाक मारली. मला वाटलं तो निजला असेल, पण जागाच होता. क्षीण स्वरात त्याने ओ दिली. 'कसं वाटतं रे?' मी काही तरी विचारायचे म्हणूनच विचारले असावे. कारण हा प्रश्न विचारताना माझे मलाच ओशाळल्यासारखे होत होते. पण काही तरी विचारायला पाहिजे ना? "बरे वाटते का रे?"

"नाही बाई, माशा फार आहेत; त्रास होतो. पोटात अगदी कसे तरीच होत आहे."

"काही खाल्ले नाहीस तू?"

"बाई, त्यांनी दूध आणुन दिलं, पण दूध नको आहे मला."

"औषध मिळाले का?"

"हो, पण तेव्हापासून जास्तच होते आहे परसाकडेला. देवा, माझ्याच्याने अगदी उठवत नाही रे." अधिकच क्षीण होत चाललेल्या स्वरात हरी उद्‌गारला.

अशा ठिकाणी माणूस खाणार काय? आणि बरे वाटणार कसे? अधिकाऱ्याकडे जाऊन ओरडा करण्यापेक्षा मी तरी काय करणार होते? तेव्हा आता काही तरी करावे म्हणून मी खोलीबाहेर पडले तो जवळच पाठीमागल्या बाजूला मृतगृह दिसले. वा: खाशी सोय! भिकारवार्ड आधीच एकीकडे. त्यात ही अशी व्यवस्था; आणि जवळच मृतगृह! खरंच, बांधणाराचे डोके मोठे कल्पक असले पाहिजे! भिकारखान्यातून सुटावयाचे असेल तर मृत्युगृहात पाऊल घालणेच सोयीचे.

मला त्या विमनस्क स्थितीत सुद्धा मृतगृह इतक्या जवळ पाहताच दैवाच्या कठोर घटनेचे क्षणभर हसू आल्याशिवाय राहिले नाही.

शेवटी जाऊन जितका ओरडा करता येणे शक्य होते तेवढा करून मी खोलीची व्यवस्था करविलीच.

"हरी, आता बरं वाटतं ना? आता थोडं दूध घे बरं."

"बाई, दूध नको. मला लिंबू द्यायला सांगा ना!" जवळ असलेल्या हॉस्पिटलच्या माणसाकडे मी चटकन पाहिले. तो बोलला नाही. पण चर्या प्रत्यक्ष शब्दांनी बठविण्यापेक्षा कितीतरी जास्त काम करीत होती. "भिकारडे ते भिकारडे आणि चोचले किती! लिंबू पाहिजे. कोठलं याच्या बापाने ठेवलंय!" खास मी तेथे नसते तर त्याने हेच शब्द एखादी शिवी हासडून उच्चारले असते. गरिबांनी असले हट्ट कुठले करायचे? कदाचित येरवी तो मागता ना, पण सध्या गरिबी व श्रीमंती यांच्या पलिकडल्या प्रांताच्या द्वाराजवळ उभा असल्याने त्याला आठवण राहिली नसावी. मी निमूटपणे त्या माणसाला दोन आणे दिले आणि त्याला पाहिजे असलेली लिंबाची बाटली आणायला सांगितली.

"हरी, आता गुपचूप नीज बरं, तो बाटली आणून देईल ती घे. उद्या तुला बरं वाटेल हं." म्हणून मी त्याच्या अंगावर हात फिरविला. कोणास ठाउक, त्या पोराला काय वाटले ते! इतका ओझरता सुद्धा मायेचा हात त्याच्या अंगावरून कितीक वर्षात फिरला नसावा. माझा हात त्याने आपल्या कपाळावर ठेवला आणि काही वेळ तो तसाच पडून राहिला.

मला आता लिहिताना अगदी लाज वाटत आहे. पण खरे सांगावयाचे म्हणजे त्या वेळी माझे मन द्रवून गेले खरे, पण तेथे राहावेसे वाटले नाही. मनाची तितकी अजून तयारी झालीच नाही. आपण केले ते पुष्कळ केले, यापेक्षा आपण तरी काय करणार? अशी मनाची खोटी समजूत करून मी घरी परत आले. वाटेत येताना स्वतःचा दुबळेपणा झाकण्याकरिता असेल—हॉस्पिटलला मी कितीक दूषणे दिली. केवढे मोठे हे हॉस्पिटल! बांधण्याकरिता आणि सामानाकरिता कायसा २५-२६ लाख रुपये खर्च झाला म्हणून ऐकते. इतके पैसे आले कोठून? लोकांकडूनच ना? केवढे मोठे लठ्ठ लठ्ठ पगाराचे डॉक्टर तेथे ठेवलेयत. क्ष किरणाची सुद्धा सोय केलीय. पण रोग्यांची ही अवस्था. तक्रार करायला गेलो तर पुरेशा नर्सेस नाहीत, नोकर नाहीत, आम्ही तरी काय करणार, हे उत्तर. परवा नुक्ता गव्हर्नर

येऊन गेला. त्यांच्या स्वागताकरिता आणि कमानीकरिता काही हजार खर्च झाले. अशा वेळी पैसे येतात; पण जेथे जरूर आहे तेथे मात्र फंड नाहीत. अधिक खर्च करता येत नाहीत.

नोव्हेंबर १७

आज संध्याकाळी पुनः हरीला भेटायला गेले. फिरून तीच अवस्था. फिरून तीच माझी ओरड. गरीब लोकांना मोफत दवाखान्याचा फायदा घ्यायला आम्ही सांगतो आणि त्यांनी घेतला नाही की त्यांच्या मूर्खपणाचे आम्हांला आश्चर्य वाटते. सारे फुकट असून हे लोक फायदा का घेत नाहीत ? कमाल आहे यांच्या अज्ञानाची आणि हटवादीपणाची, असे उद्‌गार अगदी सहज निघून जातात. पण ज्यांना असे वाटेल त्यांनी त्यांना वागवणूक कशी मिळते हे एकदा डोळे उघडून पाहावे. त्यांच्या जागी आपण असलो तर जाऊ का, हा विचार करावा आणि मग त्यांना दोष द्यावा. ती माणसे अडाणी, हटवादी नाहीत असे नाही. आहेतच. पण त्यांच्यातला गरिबी हा आधी केवढा मोठा दोष आहे ? त्याने त्यांच्यातला खरा चांगुलपणा खग्रास ग्रहणाप्रमाणे काळा पडतो.

आज हरीच्या चेहऱ्यावर जरा बरी कळा दिसत होती. कालच्यापेक्षा जरा हुशारीही वाटते आहे असे दिसले. पण आज त्याने अगदीच वेड्या-सारखा हट्ट घेतला. काल त्याच्या शेजारी असलेल्या दुसऱ्या खोलीत एक रोगी आणून ठेवला होता. तो आज दुपारी मेला. तेव्हापासून त्याला सारखी भीती वाटते आहे.

"बाई, रात्री येथे कोणी निजत नाही. मला तहान लागते, कोणी पाणी देत नाही. बाई, तुम्ही जाऊ नका ना."

मी त्याची किती समजूत घातली, पण त्याचा आपला एकच हट्ट, "बाई, तुम्ही जाऊ नका. मला भारी भीती वाटते आहे. तर बाई तुम्ही जाऊ नका." मला अगदी वाईट वाटायला लागले.

"थांब, मी कोणाला तरी तुझ्या सोबत निजायला सांगते." म्हणून

सांगून एका हॉस्पिटलच्या नोकराला थोडीशी चिरिमिरी कबूल करून तेथे सोबत निजायला सांगून आले. पण याचा आपला एकच जप, "बाई, तुम्ही जाऊ नका ना." अखेरीला मी ऐकत नाहीसे पाहून तो अगदी रडायला लागला. मला सोडीना. रडता रडता अगदी हुंदके येऊ लागले. "बाई, मला जगात कोणी नाही हो. तुम्ही तरी मला सोडू नका." हे शब्द ऐकून माझ्या पोटात अगदी तुटल्यासारखे झाले.

बोर्डिंगात असताना किंवा एरवी सुद्धा आजारीपणात, आपण एकटे आहोत, आपल्याला कोणी नाही, अशी खोटी का होईना, मनाची एक क्षणभर भावना झाली तर काय वाटते; आणि आज या पोराला खरोखरच कोणी आई नाही, बाप नाही, अगदीच कोणी नाही. आज त्याला कसे वाटत असेल? "बाई, मला सोडून जाऊ नका ना. मला कोणी नाही." मला त्याचे शब्द ऐकवत नाहीत. हळूच पदराने मी डोळे पुसून तेथेच खुर्चीवर बसले. मला बसलेली पाहिल्याबरोबर त्याची धडपड जरा शांत झाली. माझा हात आपल्या अंगावर ठेवून तो स्तब्ध पडून राहिला. मला सारखे रडू येऊ लागले. राहवेना. देवा! आज हा प्राणी मृत्यूच्या दारी पडून आपल्या विझत्या डोळ्यांनी जगाकडे पाहतो आहे. जगाचा निरोप घेताना आपुलकीच्या स्पर्शाची त्याला तहान लागलेली आहे. पण त्याला काय दिसते आहे? अंधार! अगदी अंधार! आज हा मेला, गेला, कोणाला काही परवा नाही. गाई, गुरे, जनावरे, कुत्रे, साप यांच्या सुद्धा रक्षणाकरिता धर्माच्या नावाने माणसे पुढे येतात. पण आज हा मनुष्य-प्राणी जगातून जातो आहे म्हणून काही कोणी हळहळत नाही. जगाने ह्याला केव्हाच टाकून दिलेला आहे! पुढे अगदी विचारच करवेना. काही काही सुचेना. मला जास्तच रडू येऊ लागले.

हरीचा डोळा लागला. मी चांगली तासभर तेथे बसून होते. तेवढ्यात तो अगदी शांत पडून होता. तो निजलासा पाहून मी त्या नोकराला तेथे बसायला सांगून घरचा रस्ता सुधारला.

१८ नोव्हेंबर

आज आम्हांला निरोप आला. कालच रात्री तो मुलगा वारला. मी पाहायला गेले. काल जसा मी जवळ असताना निजला होता तसाच दिसत होता—बिचारा! सुटला जगातून.

तेथल्या नोकराजवळ मी गेल्यावर किती वेळाने तो गेला म्हणून चौकशी केली. "बाई, तुम्ही गेला आणि अर्ध्या एक तासाने त्याने 'बाई' म्हणून एक हाक मारली आणि हात पाय झाडून पडला तो पडलाच. त्याच्यात त्राण होता कुठे? तो मरायचाच होता. आम्हांला पहिल्यापासून ठाऊक होते ते."

खरंच. प्रत्येक प्राणी मरायचाच असतो. पण—?

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य चौथे

निर्जीव तक्के

* * * * * * * * * * * * * * *

वास्तविक 'इन्फन्ट मॉरटॅलिटी'चे (बालमृत्युगणनेचे) ते तक्के घेऊन हिंडत असता मला असला अनुभव अगदी नवीन होता अशातलाही प्रकार नाही. पुष्कळ वेळा कितीतरी बायकांच्या डोळ्यांना आटवणीने पाणी येई. पण किती ? सारे क्षणभरच.

हिला मी विचारले मात्र, तुझे मूल कशाने मेले; आणि ती जी रडू लागली ती काहीच्या बाहीच. मला तक्के लवकर संपवायचे होते, मला तिचे रडू म्हणजे कामात मोठा व्यत्ययच वाटला. चांगली चटकन् तक्का भरून मी मोकळी झाले असते. तेथे आता किती वेळ घालवावा लागणार कोण जाणे, म्हणून मी खट्टूच झाले. पण आत हे विचार चालले तरी वरून माझा पेशा निराळाच होता.

"काय झाले तुला ? असे रडून कसे चालेल ? मरण येणे न येणे हे आपल्या आधीनचे का आहे ?" मी सांत्वन सुरू केले.

"खरं बाई, पण मला अजून राहून राहून वाटतं का असा प्रसंग आला नसता तर काही माझा बाळ खास जात नव्हता."

"अग, वेळ आली की मग वाचवू म्हटले तरी असं माणूस कोठं वाचतं का! उगीच आपण आपल्याला रुखरूख लावून घेतो झालं." मी व्यवहारी तत्वज्ञानाचा सांत्वनपर 'डोस' दिला. वास्तविक याच तत्वाज्ञाना-विरुद्ध माझी मोहीम नव्हती का ? पण माझ्या प्रसंगाला तोच मार्ग जवळचा होता.

तिचे हुंदके थांबले. तिने सारी हकीकत पदराने डोळे पुशीत पुशीतच मला सांगितली आणि मलाही तिची थोडीशी कीव आली. पण ती केवळ तिच्यावरच्या प्रसंगाने. खरे म्हणजे मला तिचा रागच आला. पोराच्या

पोटांत डबा झाला, म्हणजे काय? डबा कसला, त्याला पुरेसे अंगावर दूध मिळाले नाही. वास्तविक मुलाला जन्माला घालून जेथे परमेश्वरानेच त्याच्या अन्नाची सोय करून ठेवली आहे, ते अन्न विकण्याचा हिला काय अधिकार? अजून त्या तान्ह्या पोराकरिता तरी तिला पैसा खर्चावा लागत नव्हता ना! कुठे बाहेर जावे लागत नव्हते की कोणापाशी तोंड सुद्धा वेंगाडावे लागत नव्हते. चांगली जन्मदात्या परमेश्वराने त्याची आयती सोय केली होती— केवळ पोटाची खाई भरण्याकरिता तिने ती विकायला निघावे?

मी तिला अगदी चिडून तिरस्कारानेच विचारले, "बाई, तुझं म्हणणं सारं खरं. आता इतकी रडतेस, पण पहिल्यांदाच तुइयाने असं स्वतःच्या मुलाच्या तोंडचं दूध तोडून दुसऱ्याच्या पोराला पाजायला कसं राहवलं?"

माझ्या प्रश्नातील तिरस्कार तिच्या अगदी जिव्हारी भेदून गेला. "बाई, असं का बोलता? सुखासुखी स्वतःचं लेकरू सोडून असं दुसऱ्याच्या पोराला कोण पाजील! जेव्हा मी काम धरलं तेव्हा काय मला यातना झाल्या ते एक देवाला माहीत. पर मी दुसरं काय करणार होते? काही कामधंदा करीन म्हटलं तर सारी महिनाभराची बाळंतीण व्हते मी. पदरात दोन चिल्ली पिल्ली. पोटाशी तान्हं लेकरू. घरधनी, कसला म्येला घरधनी? त्येला बायकोच्या जिवाची काही परवा हाय काय? रात्रंदिवस .....जाऊ द्या मेला त्यो. मी कामाला येईना म्हणून दुसऱ्या बाईसंग निघून गेला. सांगा, काय करणार होते मी? आणि तशात ममईची वस्ती. कुणाच्या तोंडाकडे पाहावं, कोणापाशी मागावं? आणि अशी दररोज तरी आपल्यास्नी कोण देणार, हिंडणार तरी किती? धडधाकट माणसाला काम भेटेना, तिथं मला कोण पुसतो! घरी जवळ असंल नसंल तेवढं पदर मोड करून खावं. दादापुता करून लोकांपाशी पैसे मागावं, पर लोक तरी कुठून देणार? असा महिना सवा महिना काढला असेल, पुढे चालेना. मी एक वेळ जेवी, पण दोन तीन पोरं—ती भूक लागली की कुत्र्याच्या पिल्लावाणी चावचाव करू लागत. "माये खायला दे ग" म्हणून रडू लागत. एखाद्या आईबाईला कीव यावी, तिनं भाकरतुकडा द्यावा; पर रोज तीनचार पोरांना कोण देणार आणि त्यात त्यांचं भागणार काय? पोरं अशी उपाशी तडफडू

लागली की माझ्या पोटात भडभडून येई. देवा, कशाला रे जन्म दिला या जीवांना असं वाटे. एखाद्या वेळी असं वाटे, साऱ्या पोरांस्नी घ्यावं आणि त्येंच्या सकट समिंदरात उडी घ्यावी.

"कोणती माय अशी जित्याजिवानिशी पोटचे गोळे तडफडताना पहाणार! जीव नुसता काहून गेला, तेव्हा एका शेजी बाईनं हये काम सांगितलं होतं—कधीचं सांगितलं होतं, तेथे गेले. त्यांनी माझं दूध तपासून-श्येनी पाहिलं. लई फक्कड दूध असं डॉक्टर बोलला. त्येना मी माझं मूल मेलं असं खोटंच सांगितलं आणि काम धरलं. जेवून खाऊन दहा रुपये द्येत. म्हटलं तेवढंच. पोरं ठपाशी तरी मरायला नकोत. बाई, जीव असा काहून गेला होता. माझ्या बाळाकडे पाहिलं न्हाई की काही न्हाई. कशी पहाणार? तो काय रडे रडे व गप्प बसे. अफूचा गोळा दिला की गप्प. पण ही कारटी कुटली गप्प बसायला! त्यांना सारं कळे, सांगता येई; भूक लागल्याचं समजे आणि ती जवा भूक भूक करून रडू लागत तवा पोटातली आतडी अशी अशी तुटू लागत. माझा तान्हा बाळ मुका जीव, यो बोलत तरी नसं, पर बाकीची तिघं भूक भूक करून आरडू लागली की वाटे, काय कसं करू, चोरी करू की, कुणाला फाडू नी याना खायला घालू. बाई, गरिबांना देव पोरं कशाला देतो? न्हाई खायला, न्हाई प्यायला. देवाचे जीव जन्माला यावे आन किडामुंगीवाणी पटापट मरून जावे. बाई, त्यांची उपासमार जित्या डोळ्यांनी पाहवेना. कशीबशी त्ये दहा रुपयान्सी त्यांना गप्प बसवले. मनात आलं, बाळाचं पाहून घेऊ. पर ती पारशीण मोठी द्वाड, दिवसभर घरी येऊ देत नसे. माझ्या बाळाला मी एकदा पहाटे पाजी त्यावर बाकी सारा वेळ त्याला काही नसे. आणि जे लागे ते दोन पेजेचे चमचे शेजीबाई घाली."

"एवढे मूल आणि त्याला पिठाची पेज!" मी असे अखेर विचारलेच.

"हो तर. त्यांत काय बाई? तुम्हास्नी दूध, पण आमच्या गरीब लोकांत कुठलं दूध भेटणार? असलं तर मातेचं नाही तर धरित्रीचं. किती जण तरी पेजच घालतात. तो पलीकडला पोरगा आगाशीत खेळतोयना, तो असाच वाढलेला." असे म्हणून तिने गणपतीसारखे पोट वाढलेले,

हातापायांच्या काड्या असलेले एक मूल खेळत होते तिकडे बोट केले. त्या मुलाची मूर्ती खात्री पटविण्यास पुरेशी होती.

"बाई, तुम्हाला वाटतं पण गरिबाचं हे असंच हाय. मला पेजेचं न्हाई इकतं वाटत, पर–माझ्या लेकराचं दूध दुसऱ्याच्या लेकराला पाजलं आणि माझ्या हातात..." असे म्हणून ती फिरून कपाळाला हात लावून रडू लागली.

तिची हकीकत ऐकून दुःखाच्या देखाव्याला सरावलेले माझे मन सुद्धा विरघळू लागले. खरेच, या बाईच्या परिस्थितींत मी काय केले असते? कामधदा नाही, अशी दोनतीन मुले अंगावर नुसती तोडून खाताहेत, अशा वेळी कोण कसला विचार करणार? विचार एकच. जगायचे. एवढ्याशा लहान मुलाला पेज देणे बाईट असेल, पण आवतीभोवती सारेजण तेच करीत असता मला त्यात बावगे कसे वाटावे? कदाचित इतक्या असहाय परिस्थितींत चांगल्या शिकल्यासवरल्यापणी सुद्धा मी मुलाला अफू दिली असती, पेज पाजली असती. मग ही बाई तर बोलूनचालून अडाणी. माझे हे विचार चालूच होते. मात्र नेहमीच्या सवयीप्रमाणे तक्त्याची सारी सदरे भराभर लिहीत होते. मुलाचा जन्म केव्हा झाला, कोठे झाला; वय, मृत्यू, कारण––एकाएकी माझी पेन्सिल अडखळली. कारण! काय लिहू, पोटात डबा झाला. पण डबा का? पिठाची पेज पाजली गेली म्हणून. पण ती का? कोणी तरी आत सतावून विचारू लागले. पिठाची कांजी पाजल्याकारणाने पोटात डबा! मी कंसात स्पष्टीकरण लिहिले. पण समाधान होईना. माझ्या या स्पष्टीकरणाने काय होणार? निर्जीव तक्ते यापेक्षा अधिक सजीव कसे होणार? उद्या या सर्व कागदावरून कारकून बसवून आकड्यांचे कोष्टक तयार केले जाईल. हिंदुस्थानात इतकी लहान मुले मरतात त्यातली डब्याने इतकी मरतात. डबा होण्याची कारणे, असे म्हणून त्याखाली, अफू, पिठाची कांजी, अज्ञानामुळे आबाळ वगैरे सारे भारूड दिले जाईल. अगदी निर्विकार मनाने हा अहवाल प्रसिद्ध होईल. पण त्या वेळी कदाचित यातील प्रत्येकी मृत्यूपाठीमागे उभा असलेला हा इतिहास कोण बोलणार? कोणाच्या हे लक्षात तरी येईल काय? जग हिंदुस्थानची कीव करील. शहाणे लोक

उपाययोजना सुरू करतील. डॉक्टर कमिट्या बसवतील. म्युनिसिपालट्या बालमृत्युसंख्या कमी करण्याकरिता निरनिराळी उपाययोजना अंमलात आणतील.

ही सारी दरिद्री जीवनाची थट्टा नव्हे तर काय!

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य पाचवे

जुगारीचा पहिला धडा

* * * * * * * * * * * * * * *

आज जर मला तेथे कोणी पाहिले असते, तर खास त्याला गंमत वाटल्यावाचून राहिली नसती. माझी मलासुद्धा गंमत वाटत होती ती! चारपाच मुले, हातात पत्ते आणि एका पडक्या खोलीत मोठ्या माणसांच्या दृष्टीआड चाललेला आमचा खेळ! मला अगदी लहानपणचेच दिवस आठवले! मी प्रथम तेथे गेले तेव्हा मला पाहिल्याबरोबर चटकन सारी मुले गप्प बसली, खेळही थांबला. पण मला आज काही त्यांचा खेळ थांबवायचा नव्हता. त्या रहस्याची दीक्षा घ्यावयाची होती.

"कायरे खेळता?"

"काही नाही, बाई, पत्ते." मुलांनी खाली माना घालून खोल चोरट्या आवाजातच उत्तर दिले. त्यावरूनच वास्तविक मी त्यांचा खेळ उमगले होते. पण राहवेना म्हणून प्रश्न केलाच. "काही पैसे बिसे लावून खेळता की नाही? का तसेच?" दोनतीन मुलांनी माझ्याकडे पाहिले न पाहिल्यासारखे केले. दोघांना मात्र मी बरोबर ताडलेले पाहून चोरटेपणे हसू आलेच.

"हं चालू द्या. तू किती पैसे मिळवलेस भिवा?"

"काही नाही बाई. उलट या गंग्याने खोटे खेळून माझ्याकडून चार पैसे जितले."

"हां, मुळीच नाही खोटं खेळलो मी." आतापर्यंत खाली मान घालून पत्त्याशी खेळत असलेला गंगाराम एकदम उसळला. "विचारा हवे तर भाग्याला आणि काशाला. आपण रडी खेळतो व दुसरे जितले की खोटे खेळतात असे बोलतो." म्हणून गंगारामाने नुसत्या शब्दांनी व आविर्भावाने जेवढे दबकावणे शक्य आहे तेवढे भिवाला दबकावलेच. बरे मी तेथे होते म्हणून. नाही तर भांडण एवढ्या शब्दांनीच न राहता सहज गुद्दा-

गुद्दीला सुरुवात झाली असती.

"कसेरे खेळता तुम्ही? खेळा पाहू." हळू हळू नाखुषीने त्यांचा डाव सुरू झाला, पण माझ्यादेखत पत्त्यांना रंग चढेना.

एखाद्या आगंतुक माणसाने उगीचच बारकाईने आपल्याकडे पाहिले म्हणजे जशी एक प्रकारची स्वतःविषयी जाणीव उत्पन्न होऊन आपण स्वतःला विसरू शकत नाही तशातलाच प्रकार झाला. 'ते काही उपयोग नाही,' मी मनाशी विचार केला, 'ह्यांच्यात शिरलेच पाहिजे. चोर होऊनच चोराची विद्या काढावी लागते.'

"कायरे, मला शिकवता का तुमचा खेळ? मला पत्ते येतात, पण साधे. असे तुमच्यासारखे नाही खेळता येत."

माझ्या शब्दासरशी ती मुले माझ्याकडे पाहू लागली. प्रथम त्यांना माझ्या शब्दांनी खात्री पटेना, पण जेव्हा मी अगदी खरीच तयार आहे, अशी त्यांची खात्री झाली, त्यासरशी सारे वातावरण एकदम बदलले. वातावरणांतील दाब नाहीसा होऊन पूर्वीचा मोकळेपणा दिसू लागला.

साऱ्यांना मी खेळणार म्हणजे खरीच गंमत असे वाटून हसू येऊ लागले. मीही हळूच माझ्या नव्या दीक्षेकरिता सज्ज होण्यासाठी माझी छत्री, पिशवी खाली ठेवून दगडावर बसले.

"हां, आता खरंच बाई खेळणार!" साशंक असलेला एकजण उद्गारला. हळूहळू एकएक वीर मला शिकवायला पुढे सरसावू लागले. आज बाईना काही येत नाही ते आपल्याला येते आहे ही जाणीव सर्वांच्या तोंडावर मोठ्या मजेने चित्रित झाली होती.

पत्त्यांचा वाटणी झाली. प्रत्येकाने दोन दोन पैसे खाली ठेवले. भिवापाशी पैसे नव्हते. ते गंगारामने उसने दिले. मी काहीच ठेवले नव्हते. "बाई, आधी दोन पैसे—काढून ठेवायला लागतात खाली, तर मग खेळ." "मजजवळ तर पैसे नाहीत." मी म्हटले. खरोखरच मजजवळ पैसे नव्हते. "मग?" काश्या उद्गारला. मी खरोखर खेळणार की नाही? फिरून त्यांना शंका आली. मलाही जरा बरे वाटले नाही. "दुसरे नाही का काही चालणार?" मी प्रश्न केला. मला खेळाचा विरस व्हायला नको होता.

"हो हो, चालेल तर!" माझ्या फाउन्टन पेनकडे दृष्टी टाकीत भाग्या हळूच बोलला. गंगाराम त्याच्याही पुढे जाऊन म्हणतो, "खरंच बाई, तुमचे ते फाउन्टन पेन ठेवा." मी अगदी निमूटपणे फाउन्टन पेन खाली काढून ठेवले. "मी हरले तर हे फाउन्टन पेन तुमच्या जवळ असू द्या. मी तुमचे पैसे उद्या आणून देईन."

आमच्या अटी कबूल झाल्या व आमचा खेळही सुरू झाला. निकाल काय व्हायचा ते मला माहीतच होते. त्यांच्या दर्यांच्या खाणाखुणा. शिवाय नेहमी खेळण्याचा सराव, एवढे असल्यावर मला हरायला कितीसा वेळ लागणार होता! दोन पैसे हरल्यावर मला आणखी हरायची इच्छाही नव्हती व माझे कामही झाले होते. सुदैवाने एवढ्यात आमच्या मोटरचा आवाज ऐकू आला. तेव्हा आम्हाला उठावेच लागले. मुलांची मात्र आणखी मला हरवायला मिळाले नाही म्हणून थोडीशी निराशा झाली. "काय बाई, तुम्ही आणखी बसत नाही; नाही तर आज तुम्हांला आणखी चांगलेच जितले असते." असे कुरकुरत ते सारेजण उठले; आता फाउन्टन पेन द्यावयाचे. फाउन्टन पेन त्यांच्याजवळ ठेवणे म्हणजे शुद्ध माकडांच्या हातात देणेच होते ते. माझा जीव अगदी खालवर होऊ लागला. "हे घ्या फाउन्टन पेन—पण उघडायचे मुळीच नाही अं." असे म्हणून मी फाउन्टन पेन देऊ लागले. पण एवढ्यातच माझ्या पेनचे दिवस भरले नव्हते म्हणून म्हणा, की काही म्हणा, त्यांची आपआपसातच पेन कोणी ठेवायचे, याबद्दल लठ्ठालठ्ठी सुरू झाली.

भिवा म्हणे, मी ठेवीन. गंगाराम म्हणे, मी ठेवीन. काशा म्हणे मग मीच का नको! शेवटी पेन आपल्याला मिळण्याचा काही योग नाही, हे पाहून भाग्या शिष्टपणाचा आव आणून सांगू लागला, "बाई, या पोरांच्या-जवळ कसले देता तुम्ही तुमचे पेन! खास हे उघडतील आणि मोडून टाकतील. तुम्ही आपले घेऊनच जा कसे!"

'मला नाही तर कोणालाच नको,' ही सूचना साऱ्यांना पटकन पटली.

"हो बाई, तुम्ही आपले घेऊन जा कसे, उद्या मात्र पैसे जरूर आणा हं." माझ्या पेनची सुटका झालेली पाहून मला बरे वाटले. आणि मी

पैसे आणण्याचे कबूल करून निघालेच.

एकूण आज मी चोहोकडे उघड्या चोरट्या स्वरूपात चालू असलेल्या जुगारीचा पहिला धडा घेतला अं!

आजच्या या साऱ्या प्रकाराची आठवण झाली की अजून हसू येते. मी फाउंटन पेन लावले कसे, खेळले काय, सारीच गंमत खरी! पण त्यामुळे मला किती गोष्टी कळल्या, त्या एरवी कळल्या असत्या की नसत्या कोण जाणे!

अफूचे गोळे लहानपणापासून चढवून जसे अगदी अज्ञानपणापासून मुलांना गुंगीत राहण्याचे वळण देण्यात येते तसेच जुगारीचे नाही काय? दारिद्र्याने पीडलेले, कफल्लक झालेले, पैसे असलेले, पैसे नसलेले, सारे लोक निरनिराळ्या तऱ्हेने जुगार खेळताना येथे दृष्टीस पडतात! एक दिवस तर मी सकाळी सातला गेले असता जो काही मनुष्यांचा अड्डा बसलेला पाहिला तो संध्याकाळी सातपर्यंत तेथे तसाच होता. एक गेला की दुसरा येई, पण त्यातले काही बहादर अशी मेख मारून बसलेले होते, की त्यांना उठावे लागले तेव्हाच काय ते उठले असतील. खेळता खेळता सोंगट्यात जशी जिद्द लागते, तसाच एक प्रकारचा कैफ यात चढत असला पाहिजे. त्याशिवाय माणूस हरत असताना सुद्धा ईर्षेला पेटून आणखी हट्टाने बसून राहाणार नाही. त्या खेळणाऱ्या लोकांकडे पाहिले की जुगारसुद्धा मादक आहे हे म्हणणे पटायला लागते. पण या मोठ्या मनुष्यांच्या गोष्टी मी किती झाले तरी दुरून पाहणार. फार झाले तर त्यांच्या बायकांना विचारणार. पण त्यांच्यात शिरून काही प्रत्यक्ष कळणे मला शक्यच नव्हते. आज या मुलांबरोबर मिसळून कितीक तरी माहिती सहज मिळाली. त्यांना असलेली सारी माहिती ऐकली की वाटू लागते, खरोखर मोठ्या माणसांना लहान मुलांची कल्पना नाही. लहान मुलांना त्यात काय कळते म्हणून नेहमी आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. पण एखाद्या पहारेवाल्याच्या

नजरेने आपली सारी कृती मुले लक्षपूर्वक पाहून मनात साठवीत असतात.

माझी कल्पना होती, निदान बायकांना तरी हे व्यसन आवडत नसावे. आईला तरी निदान असला नाद मुलाला लागलेला पाहताच धक्का बसावा. पण मुलांना विचारता माझी सारी कल्पना कविकल्पनेइतकीच फोल ठरली. आज त्यांच्या अड्ड्यावर गेल्यानंतर मी भाग्याला विचारले, "काय रे, तुझी आई मारीत नाही का तुला असे पत्ते खेळताना पाहिले म्हणजे?" भाग्याने जरा उत्तर द्यायचे टाळले. पण साऱ्यांचीच काही तशी स्थिती नव्हती. मी त्यांच्या खेळात भाग घेतल्याने त्यांच्या माझ्यामध्ये एक प्रकारचा मोकळेपणा उत्पन्न झाला होता. शेवटी दिले चौघांनी सांगून,– "बाई, आम्ही कधी आईला सांगतच नाही. ती मिळालेले पैसे सारखे मागत सुटते आणि दिले नाही तर मारते. पैसे जितले म्हणजे नाही ठोकीत. पण तिला मिळालेल्यापैकी काही तरी द्यावे लागते." आहे की नाही छान वळण!! जोपर्यंत हातात काही येते आहे तोपर्यंत ते कोणत्या कशा मार्गाने येते याचा विचार न करता, हरले म्हणजे मात्र 'पत्ते खेळतोस नाही का?' म्हणून तोंडाचा पट्टा व हाताचा सपाटा वळण लागण्याकरिता सुरू करावयाचा! मातेकडून मिळणाऱ्या या वळणाचा मुलांच्यावर होणारा सुपरिणाम अशा उत्तरात दिसतच असतो. पैशाच्या लालचीने घरची माणसेच न कळता अशा प्रकाराला उत्तेजन देत असतात!

मी नंतर हळूच विचारले, "काय रे, तुम्हांला पैसे तरी कुठून मिळतात? का हळूच घेता पेटीतील काढून?" माझा प्रश्न संपला सुद्धा नाही तोच तिघे एकदम ओरडले, "बाई, हा–हा काशा काढतो हळूच आईच्या पेटीतून. आम्ही नाही—बाई, आम्ही नाही. आईबाप कामाला गेले की हा हळूच किल्ली लागू करतो नी घेतो काढून." तो ओशाळलेला चेहरा अगदी निमूटपणे साक्ष देत होता.

"पण मला सांगा, तुम्ही कुठून आणता पैसे?"

"एखादे दिवस कुठे दोनचार आण्यांचे काम मिळाले की ठेवतो आम्ही त्यातले थोडे आमच्याजवळ. नाहीतर तो मारुतीच्या पारापाशी पिंपळाच्या झाडाजवळ एक पठाण नाही का राहत, तो देतो पैसे. दोन काढावे आणि

मिळाले की तीन द्यावे म्हणजे झाले! सारी मोठी माणसे पैसे नसले की त्याच्याजवळूनच काढतात. पण आम्ही फार वेळा नाही काढीत बाई. उंच उंच टांगेल्या शंकऱ्या आहे ना, त्याला पठाणाचे चार आणे द्यायचे आहेत." आणखी किती तरी मुलांची त्यांनी नावे सांगितली पण त्यांची रक्कम चार आणे एवढी मोठी नव्हती. आमचा हा संवाद चालू असतानाच एक पैसा मी हरले. त्या वेळी 'बाई हरल्या' म्हणून विजयानंदाने त्यांनी जो ओरडा केला तो अजून मला डोळ्यांसमोर दिसतो आहे. "चला बाई, एक पैसा तुमच्यावर लागला." म्हणून अगदी सारे हुरळून गेल्यासारखे ओरडू लागले. फिरून डाव सुरू झाला व त्याबरोबर माझे प्रश्नही हळूच सुरू झाले. खेळताना माझे लक्ष खेळापेक्षा माहितीकडे आहे अशी त्यांची कल्पना नव्हती.

खेळाच्या डावातले इतर प्रश्न तसेच ते. आणि ते सुद्धा बाईंना माहीत नाहीत म्हणून मोठ्या डौलाने सारी माहिती मला सांगत होते. "काय रे, तुम्हांला खेळताना एखाद्या पोलीस शिपायाने पाहिले तर!"

"हात्याच्या, शिपाई!" तुच्छतेने सारेच एकदम हसले. "शिपाई!— शिपाई तर मोठ्या माणसात बसून खेळतात सुद्धा. आणि तेवढीच वेळ आली तर त्याला पानबिडीला पैसे दिले की झाले! आम्ही तर काहीच देत नाही. आम्ही जातो पळून. मग नाही येत तो आमच्या पाठीशी. पण मोठी माणसे मात्र देतात पैसे!"

मला आश्चर्य वाटे, इतक्या उघड्यावर राजरोस जुगार चालला असता पोलिसांचे लक्ष कसे जात नाही? पण त्यातील पानबिडीचे इंगित कोठे होते मला माहीत? ते कळल्यावर सारा उलगडा झाला. जेथे राखणदारच सामील तेथे चोरी उमगावी कशी!

"काय रे, हे पैसे मिळाल्यावर तुम्ही काय करता?"

"काय वाटेल ते करतो. कधी भजी खातो, कधी चित्रे घेतो."

"बाई, माझ्याजवळ एक सिनेमा आहे तीन आण्यांचा! त्यातून किती छान दिसते!" भिवाने मोठ्या डौलाने सांगितले व मग हळूच म्हणतो, 'गंग्या आणि रामा दोघे तमाशाला जातात हो!"

"हो बाई, हो. हे दोघे जातात, आम्ही नाही जात." काशाने पण पुष्टी दिली.

गंगाराम काही न बोलता पत्यांकडेच पाहत होता, तो एकदम उसळला, "मग तुम्ही नाही जात का सिनेमाला?"

एवढे झाल्यावर आमचा खेळ मी जाईपर्यंत चांगला व्यवस्थित चालला होता.

झाले. सारी मजा वाटली! गंमत झाली खरी! पण विचार करता करता मन मात्र काय सांगते आहे? तेथे वाढणाऱ्या मुलांना लहानपणापासून काय हे बाळकडू! आमच्या घरात लहानपणी अपशब्द सुद्धा कानी पडू नये इतकी काळजी घेण्यात येई. आणि इथे मुलाला कळायला लागल्यापासून चांगले वळण बाजूलाच राहिले, पण दुर्वळण मात्र भरपूर. लहानपणापासून मोठी होईपर्यंत अगदी ती पक्की निर्ढावून निघतात. जुगार, दारू व इतर अनीतीचे प्रकार राजरोस मुलांच्या देखत घडत असतात. त्यांत काही अस्वाभाविक आहे असे मुलांच्या मनांत सुद्धा आले नसते. पण या गोष्टी वाईट आहेत ही जाणीव मोठ्या माणसांकडून कधी कधी करून देण्यात येते तेवढीच. पण हे वाईट कोठपर्यंत? लहानपण आहे तोंपर्यंत. लहानपणी तेवढे असे करायचे नाही. पण मोठे झाले की याच वाईट गोष्टी करण्याचा सदर परवाना मिळाला, अशी जर लहान मुलांची समजूत झाली तर त्यांत नवल ते कोणते? नशीब हे की अशा परिस्थितीत वाढून सुद्धा त्यांना चांगल्याची जाणीव राहते. मुलांना वाईट म्हणताना आपण त्यांना वाईट करतो हे पक्के कळते. मात्र ती जाणीव तीव्र असू शकत नाही.

आज ही मुले चोरून मारून पडक्या भिंतीआड खेळत आहेत. उद्या मोठी झाली की असा आडपडदा न ठेवता उघड खेळू लागतील. मोठ्या रकमा लावू लागतील; खरोखर या पुढच्या तयारीकरिता आज ती एव्हापासून सज्ज आहेत. अशा वेळी यातली कितीएक जुगारापायी देशोधडीला

लागली तर नवल ते काय ?

जुगार ! लहानपणापासून मोठेपणापर्यंत साऱ्या आयुष्याचा जुगारच नाही का ? आणि का, तर एकदम पैसे मिळविण्याची हाव—विनासायास पैसे मिळविण्याची हाव. याच हावेने हीच मुले शर्यतीच्या मैदानाभोवती घिरट्या घालतील, नाना ठिकाणी जातील. मोहक स्वरूपाचे जुगार चोहोकडे त्यांना गिळायलाच बसलेले आहेत.

• • •

* * * * * * * * * * * * * *

दृश्य सहावे

माझे कोरडे तत्त्वज्ञान

* * * * * * * * * * * * * *

मी प्रथम त्या खोलीत शिरले तेव्हाच त्या माणसाला दाराशी बसलेला पाहिला होता. आणि त्या वेळीच त्याची चर्या मला मुळीच आवडली नव्हती. पूर्वीसारखी भित्री असते तर मी त्याच्या आसपास राहण्याचे सुद्धा धारिष्ट केले नसते इतका तीव्र कडवटपणा त्याच्या नजरेत भरून ओसंडत होता. वाऱ्यावादळांनी विशीर्ण झालेले घर पाहिले की फक्त त्याच्या मोडकेपणाचीच कल्पना येते, पण त्याच घरातून वाऱ्याचे भेसूर आवाज येऊ लागले व घुबडे घुमताना ऐकली म्हणजे भीती वाटू लागते.

मी आत शिरले. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाने त्या बायकांना किती तरी गोष्टी सांगितल्या. त्याचे त्यांना काहीसुद्धा वाईट वाटले नाही. केवळ माझ्या समजुतीखातर का असेना, पण त्यांनी खोली स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. आणि खरंच, भाकरीचे तुकडे, कपडे, घाण इत्यादी गेल्याने खोली किती बरी दिसू लागली! मी त्यांचा त्यांना फरक दाखवला. माझे मलाही बरे वाटले. आणि "बघ, उद्या अशीच खोली ठेव. मी पाहायला येईन." असे म्हणून त्या बाईंची पाठ थोपटत मी बाहेर येणार इतक्यात हा मनुष्य आत आला. खरे म्हणजे मी त्याला टाळूच पहात होते. पण त्याने सरळ माझ्याशीच बोलायला सुरुवात केल्याने टाळणे शक्य नव्हते.

"बाई, तुम्ही म्हणता, ते सारं खरं. आम्हांला सुद्धा कळतं. आम्हांला चांगलं रहावंसं वाटत नाही काय? पण पैसा कुठला आणायचा?" मला हे वाक्य नित्य परिचयाचे झाले होते. त्याच्यावर मी नित्याचेच उत्तर दिले, "पैसा लागतो का खोली झाडायला? नीट कपडा ठेवायला पैसा लागतो, का पोराना आंघोळी घालायला पैसा लागतो?" मी माझे शस्त्र काढले.

"ते खरे बाई, तुम्हांला नाही त्याची कल्पना यायची."

"कल्पना नाही यायची म्हणजे काय?" मी जरा तिरिमिरीनेच विचारले.

"बाई, त्याला आमच्यासारखा पोटाला चिमटा बसावा लागतो. आज वेळ गेली, उद्या काय करायचं हा विचार पडावा लागतो. आज दाणेवाला आला, उद्या पठाण आला, तर त्याला चुकवावे कसे याची जाचणी असावी लागते, आणि मग या गोष्टीना पैसा लागत नसला, तरी असं का होतं ते फळतं." मला त्याच्या बोलण्यातील सत्य पटत नव्हते असे नाही. मी सुद्धा किती वेळा म्हटलेले नाही का, की मी त्यांच्या स्थितीत असते तर त्यांच्यासारखीच खास ताडी पिण्यास गेले असते! पण मला जरी कळत असले तरी आज त्याने सांगितले ते बरे वाटले नाही.

एखादे वेळी उलट खाऊन माझे मन मलाच विचारू लागते,—तुला असे जाऊन या लोकांना सांगण्याचा काय अधिकार? केवळ ते ऐकून घेतात म्हणूनच ना? उद्या श्रीमंत वर्गात जाऊन त्यांना त्यांचे दोष सांग पाहू! त्यांच्यात काय दोष नाहीत? त्यांना सुधारण्याजोगे असे काहीच उरले नाही काय? खास आहे. आणि पुष्कळ आहे. पण त्यांच्यात जाऊन नाही तू काम करीत? छे, श्रीमंत, सुशिक्षित वर्गात जाऊन 'सोशल वर्क' करण्याची कल्पना सुद्धा तुला हास्यास्पद वाटते. आणि याला कारण एकच. ते तुला तुझ्या बरोबरीचे वाटतात. तुझ्या बरचे वाटतात. त्यांच्यात दोष असलेच तर ते नाइलाजास्तव राहिजे आहेत, असे तुला वाटते. त्याबद्दल तू त्यांना दोषी धरीत नाहीस. त्या वेळी समाजाला दोषी धरतेस, समाजरचना चूक ठरवतेस; पण या चाळीतून सांगताना–?

त्याचे बोलणे चालूच होते, "तुमच्या नवऱ्याला माझ्यासारखा चार वर्ष कामावाचून राहण्याचा प्रसंग येऊ द्या, मग बघा तुम्ही अशाच राहता का? आणि बाई, तुम्ही हिची गोष्ट सोडून द्या. ही पहिल्यापासूनच अशी गबाळ अहे. पण मी आता तुम्हांला दिसतो तसा नव्हतो. माझी अशी शान होती, की लोकांना वाटावं की मास्तरच हाय जणू. महिन्याला अक्षी सत्तर रुपये मिळत होते कारखान्यात. बाई, तेव्हा यायचं होतंत, नी बघायचं होतंत माझं घर. आता काय बघता—

"दिवसामागून दिवस चालले. आज सारखा चार वर्से अस्सा बसून आहे! ह्या हातानं वीस तोळं सोनं मोडून खाल्लं. पहिल्यांदा हलकी कामं आली की वाटे, कमी पगार घेऊन आपली किंमत का कमी करा? आपलं काय, काम लागलं की जाऊ. पण महिना गेला, चार महिने गेले, कामाचं चिन्ह दिसेना. इकडे टंचाई भासू लागली. चार वर्षे ह्या पठ्ठ्याने मुंबईत हिंडूनशानी काम मिळवायचा प्रयत्न केला हाय. वीस पंचवीस रुपये भरावं तवा कुठं एखादं दुसरं काम लागलं तर लागावं, पर तेही खलास महिना दोन महिन्यांत. सांगा कसे दिवस काढावे?

"गेल्या महिन्या दोन महिन्यात तर अक्षी पायाचे तुकडे केले वणवण हिंडून! पंधरा रुपये द्यायला कबूल झालो, पर काम कुठं भेटेना. आणि गाठीशी तर पैसा नाही. लोकापाशी उसनं तरी किती दिवस मागावं? उद्या भाडेवाला येईल, भाडं चुकविलं नाही की घराला टाळा लावून जाईल. कुठलं आणूं भाडं? देता नोकरी लावून? मी सारं तुमच्या सांगण्याप्रमाणे करतो. पोटाला मिळालं की काय न झालं हे सारं सुचायला? पर ते अजून गावंना-बोला, देता काम लावून?"

मी त्याला काय उत्तर देणार? त्याने आशेने माझ्याकडे पाहिले. पण मी आज प्रत्येक चाळीतून असे शेकड्याने बसलेले लोक पाहत होते! त्यांतील सगळेच काही माझ्याजवळ भिक्षा मागत नव्हते, त्यांना फक्त कामच पाहिजे होते. आणि तेच तेवढे द्यायला माझ्याजवळ नव्हते.

माझ्या मौनाने त्याला कटु सत्य सांगितले. उदय पावत असलेली त्याची आशा नाहीशी झाली. "बाई, आमची भिकाऱ्याची जात नाही. या महाद्याच्या सात कुळीत कोणी भीक मागून खाल्लेलं नाही. मी पैसा द्या म्हणत नाही. कपडा मागत नाही. नुसतं काम द्या म्हणून म्हणतो...आणि ते... ते जर देता येत नसेल तर उगीच कशाला करता देण्याच्या गोष्टी!

"म्हणे औषध देतो!...आणि कपडे शिवायला शिवितो! काय करायचंय त्येला!" असे म्हणून तो एकदम तोंड फिरवून तेथल्याच पेटीवर बसला. मलाही काय बोलावे ते सुचत नव्हते. कशी तरी सारवा-सारव करून मी निघून आले.

खरंच, उगीच कशाला मग देण्याच्या गोष्टी! त्यांना आम्ही औषध देणार, पण त्याच्या आधी त्यांनी आजारी पडायला पाहिजे. त्यांच्या बायकांना शिवण शिकवणार, पण त्याकरिता शिवायला कपडा नको का? आमचे खेळायचे क्लब, आरोग्याचे नियम, स्वच्छता शिकविणे, सारे ठीक आहे! पण काय? ही वरची नुसती मलमपट्टीच नव्हे काय? मूळ कारणाला आम्ही हात घालीत नाही—नुसते ते लक्षात घ्यावयाला सुद्धा तयार नाही, तर काय होणार? जेथे खायची पंचाईत, काम नाही, काम मिळण्याची आशा पण नाही, तेथे मनाला उत्साह काय वाटणार? जीव चटकन जात नाही म्हणून कसे तरी जगायचे; तेथे कसल्या आल्या आहेत इतर गोष्टी?

आज आला, अशा प्रकारचे अनुभव आले की आधीच दुबळी असलेली माझी कार्यावरची श्रद्धा अधिकच ढासळू लागते. मी जाते आहे तो मार्ग बरोबर आहे की नाही, याची शंका उत्पन्न होते. नव्हे, आपण बरे करण्याच्या मिषाने उलट काही भलतेच तर करीत नाही ना, अशीही भीती मनाला डवचूं लागते. आणि मग हा ध्येयवाद–कार्यावरचा विश्वास, पाया डळमळीत असलेल्या इमारतीप्रमाणे खचून जाऊन उलथून पडतो की काय असे वाटू लागते.

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य सहावे

गिरणीतून आल्यावर

* * * * * * * * * * * * * * *

वास्तविक मी गिरणीत नाही. दिवसभराचा सारा शीण फेकून देऊन चांगली आरामखुर्चीवर पडले आहे. पण मनुष्याच्या कल्पकतेने, बुद्धि-वैभवाने गाइलेल्या त्या संगीताचे सूर मात्र अजून माझ्या कानात तसेच घुमत आहेत. त्यांत मार्दव नाही, मनाला विरघळून टाकणारा कोमलपणा नाही, सुरांची खालवर फिरकती फेक नाही की नुसती साधी विविधता सुद्धा नाही. कर्णकठोर कंटाळवाण्या एकाच सुरात ते संगीत सारखे चालू आहे. पण काही असो, ज्याने ह्या दिंडीदरवाज्याच्या आत पाऊल टाकून तेथला सारा देखावा डोळे भरून पाहिला असेल, त्याला खेचून धरण्याचे सामर्थ्य मात्र त्यात आहे खास!

वास्तविक, या गिरणीवरून मी कितीदा गेले असेन. मोटारीने गेले आहे, पायी गेले आहे. त्याच्या सकाळी ७ वाजता होणाऱ्या भोंग्यावरून माझे बंद पडलेले घड्याळ पण मी कितीकदा तरी लावले आहे. पण उंचच उंच दिसणाऱ्या चिमणीशिवाय माझे लक्ष तिच्याकडे कधीच वेधले नाही. मात्र आगगाडीतून येऊ लागले की त्यातील काचेच्या छपरावर जेव्हा सायंसूर्याचे किरण पडून सोनेरी तेजाने ते सबंध कौलार भोवतालच्या हिरवळीत चमकू लागे, तेव्हा मात्र अनेकदा मी त्या गिरणीकडे हेव्याने पाही. एकदा त्याच्या दिंडीदरवाजाजवळ असणाऱ्या गुलमोहराचा वृक्ष असाच बहरून आला असता एके दिवशी एका आंतून बाहेर येणाऱ्या इसमाला येथे काय आहे म्हणून विचारण्याची मला इच्छा झाली. त्याने ती गिरण आहे म्हणून सांगितले. पण मला ते आवडले नाही. चिमणीवरील 'गुलमोहर' हे रंगविलेले नावच मला अधिक पसंत पडले. आणि का कोण जाणे, आतील अज्ञात प्रदेशाचा मी गुलमोहोराच्या वृक्षाशीच संबंध जोडू लागले. ते

गिरणीचे आवार आहे हे मला माहीत होते. गिरणी कामगारांच्या गिरणीतील आयुष्याची अंधुक कल्पना पण मला होती; पण ती सारी कल्पनाचित्रे गुलमोहोर वृक्षाच्या धाग्यादोऱ्यांनी, सायंसूर्याच्या सोनेरी किरणांनी उजाळलेल्या पार्श्वभूमीवर भरलेली होती. बाकी माझ्या परिस्थितीत असलेल्या किती बायकांना—नव्हे पुरुषांना सुद्धा—उद्योगयुगातील या अद्‌भुत यंत्रसंगीताची पुरी कल्पना आहे? रात्रंदिवस त्या रस्त्याने जाऊनही आमच्यात आणि गिरणीत आवाराची प्रचंड भिंत उभी आहे, तिचा दरवाजाही तितकाच प्रचंड व पूर्ण अबोल असा आहे. एखादे वेळी बाजूच्या लहान फाटकातून आतला काही भाग दिसलाच, तर तो म्हणजे मुंबईच्या वस्तीला कधी न दिसणारे मोकळे अंगण, त्यांत रस्त्याच्या रांगेने असलेली ती आंब्याची झाडे व त्यापलीकडे तिरप्या छपराच्या काचेच्या कौलारानी चमकणाऱ्या इमारती. आतील दृश्याची—चमत्काराची आमची हीच कल्पना; म्हणूनच मी व मिस रोज, आवारांत शिरून मॅनेजरच्या ऑफिसाशी पोचेपर्यंत अगदी एका निराळ्या अपरिचित प्रदेशात पाऊल टाकल्यासारखे मला वाटत होते. आमची मोटर मॅनेजरच्या ऑफिसपाशी थांबली. आम्हाला शिपायाने आत बसण्यास सांगितले. पण तो ऑफिसाचा थाट पाहून वरून पंख्याचा वारा चालू असताही माझा विरस झाला. अगदी सरळ साध्या शब्दांत सांगायचे म्हणजे एकट्या मोठ्या गिरणीच्या मॅनेजरचे ते ऑफिस असे मुळीच शोभण्यासारखे नव्हते. तेथील भिंत, कागद-पत्रांचे गठ्ठे, सारे शेतात राबणाऱ्या रानवट मुलीइतके राकट व धुळीने भरलेले होते.

मॅनेजरसाहेब आले. त्यांच्याही शिरस्त्राणविहीन काळ्या पांढऱ्या केसात कापसाच्या तंतूंची पुटेच्या पुटे बसलेली मला आढळली. नाकपुडीच्या टोकाशीही एखादा तंतूच लोंबत असून खालवर करीत असावा अशी मला शंका आली. अं! अखेर हे ऑफिस असले तरी कांही खरे कोटातले ऑफिस नव्हे. गिरणीचेच ऑफिस. रंकाच्या वैभवाला वैभव शब्द लावला म्हणून त्याच्या स्वरूपात बदल थोडाच होणार आहे!

मॅनेजरसाहेब जरा कामात होते. त्यांनी आपल्या एका इंजिनिअरला

हाक मारली. लगेच एका तरुण तडफदार पण यंत्राजवळ असल्याने काळे काळे कपडे झाल्यामुळे मला न आवडणाऱ्या गृहस्थाबरोबर आम्ही गिरणी पाहूं लागलो !

"हां, पदर जरा सावरून घ्या. नाही तर एखादे वेळी जरा जरी टोक अडकलं की जाल त्या पट्ट्याबरोबर ताडकन् छप्परात आणि एकदम आपटाल खाली !" किंचित् हसून इंजिनिअरने मला सूचना दिली. मी माझा पदर कमरेभोवती अगदी घट्ट ओढून धरला व ओचाही सावरला ! न जाणो !

"परवाच येथे एक असाच अपघात झाला. एक मजूर असाच सापडला, आणि जो एकदम वर फेकला गेला, तो त्याचे डोके अगदी नारळासारखे ताडकन् फुटले. बिचारा ! लागल्याचे दुःख व्हायला काही दोन सेकंद राहिला नाही." मी भयभीत होत्साती त्या जगडव्याळ यंत्राकडे पाहू लागले. केवढाली प्रचंड प्रचंड चाके ! एक दोन तीन चार–अन् बारकी तर किती तरी ! बापरे ! एखादा पट्टा तुटला तर ! दृष्टी न ठरेल ठरेल इतक्या भराभर गरगर एकसारखी ती प्रचंड चाके आमच्या डोक्यावर सारखी फिरत होती.

जमिनीवर एक मोठे यंत्र बसवले असून त्यांत कांहीजण मोकळा केलेला कापूस भरीत होते. एक पोते ओतले, दुसरे ओतले ! क्षणांत खलास ! काय राक्षसी स्वाहाकार ! "किती माणसे काम करतात येथे ?" मी अगदी चमत्कारून जाऊन विचारले. "अं ! थोडी आहेत. २५–३० म्हाताऱ्या बायका आणि १०–१२ गडी माणसे. फार फार तर असतील ५०." पन्नास माणसे ! पण त्या यंत्राच्या विराट स्वरूपापुढे ती कोठल्या कोठे लोपून गेली होती. दृष्टीला काही दिसत असतील तर गरगर फिरणारी प्रचंड चक्के ! लहान चक्के ! त्यांत सरकणारे भरदार लांबच लांब पट्टे व सटासट् सटासट् आवाज करून कापसाचा स्वाहा करणारे यंत्र. मी अगदी दडपून जाऊन त्या देखाव्याकडे पाहत होते.

इंजिनिअरसाहेब मात्र त्यांनी नुकत्याच बसवलेल्या–धूळ शोषून घेण्याकरिता बसवलेल्या–नव्या यंत्राची योजना आम्हाला समजावून देण्यात गुंग होते. त्यांनी आम्हाला समजावून सांगण्याकरिता कुठेसा खटका दाबला आणि एकदम सारी चाके थंडावून बंद झाली. "अं ! हे काय !" किंचित

घाबरूनच मी विचारले. "काही नाही, मी खटका दाबला आहे, तुम्हाला दाखविण्याकरिता."

"पहा ती कापसांतील खकाणा, धूळ उडते ना?" इंजिनिअरसाहेब सांगू लागले. मला त्यांचे सांगणे कितपत समजले ते सांगता येत नाही. एखाद्या अभिजात कलावंताप्रमाणे ते त्या यंत्रागाराचे रहस्य अगदी उकलून सांगण्यात रंगले होते. मीही यंत्राच्या चमत्कृतिपूर्ण सामर्थ्याला भुलून त्यांचे म्हणणे ऐकत होते. हा खटका दाबला की अस्से...सुरू. हा दाबला की बंद —केवढी ती जगड्व्याळ चाके, त्यांची गती आणि कुठे ही बारीकशी कळ! माझ्या मनावर अखेर साऱ्या दोनच गोष्टी ठसल्या. यंत्राची बेफाम शक्ती आणि त्याच्या शेवटी असणारा लहानसा खटका. अल्लादिनाच्या दिव्याप्रमाणे प्रचंड राक्षसांवर हुकुमत चालविणाऱ्या त्या लहानशा खटक्याकडे मी आश्चर्याने व कुतूहलाने पाहू लागले.

"आम्ही शक्य तितकी नवी यंत्रसामुग्री बसवीत आहोत." इंजिनिअर मिस रोझना समजावून सांगत होते. माझे तिकडे लक्षच नव्हते. या दुसऱ्या खोलीत आल्यापासून बंडगार्डनच्या लहानशा धरणाप्रमाणे वरच्या रुळावरून खाली उडी घेणाऱ्या कापसाच्या पांढऱ्या शुभ्र व विरळ पण रुंदच्या रुंद पसरलेल्या प्रवाहाने माझे लक्ष खेचून घेतले होते. शेवटच्या रुळावरून खाली आला की लगेच त्या प्रवाहाला दोन फाटे फुटत. हळू हळू किंचित पीळ पडून त्याचे स्वरूप गोल, भरदार व अरुंद अरुंद होत जाई, व अखेर तर यंत्राच्या दोन्ही बाजूना लावलेल्या नळकांड्यांत अगदी पांढऱ्याशुभ्र शेवयांप्रमाणे त्यांचे एकावर एक वळसे पडू लागत. मला फार गंमत वाटली त्या यंत्राची! कापसाचे प्रथम पाहिलेले स्वरूप व हे, यात किती फरक पडला होता? हाच तो कापूस? छे! त्यातला केरकचरा, काळेपणा! आणि यात तर त्याचे नावही नव्हते! क्षणभर मला ही कापसाची वेगळीच जात असावी असेही वाटल्याशिवाय राहिले नाही. पण समोर दिसणाऱ्या देखाव्यापुढे कापसाची जातबीत सुचत होती कोणाला? वरच्या रुळावरून खाली सोडलेला स्फटिक मण्यांचा तो रुंदच्या रुंद पडदा, मध्येच त्याचे दोन भाग, शेवटी पटवेकऱ्याप्रमाणे शेवट जरासे पिळून आलेली

भेंडोळी! 'समजा तार मध्येच तुटली तर'—मी एका मजुराला विचारले. 'अं, त्याचे काय, फिरवून जुळवून द्यायची!' म्हणून जणू काय आपले कौशल्य दाखविण्याकरता त्याने खटका फिरवला. भरलेले नळकांडे उचलले. दुसरे लावून दाखवले. फिरून खटका, फिरून गंमत चालू. फिरून तो पांढऱ्या शुभ्र विरल स्फटिकाचा शेला!

मिस रोझ व इंजिनिअर पुढे चालू लागले. मलाही पुढे जावे लागले. पण त्या खोलीत पाऊल टाकताच मी नुसती विस्मित होऊन पाहात राहिले!

एक, दोन, तीन, नव्हे—शेकडोशे पऱ्या आपले पांढरे शुभ्र आखूड झगे उडवून भरभरा ओळीने नाचताहेत! किती रांगा! मध्ये दोन माणसे उभी केली असता मावतील न मावतील इतकी जागा. त्यातून काही बायकाही उभ्या असलेल्या. पण छे! त्यांना काय पाहायचे! खालच्या पोलादाच्या चकचकीत बैठकीवर एकच पायावर उभे राहून नाचणाऱ्या त्या चकत्याच अधिक चित्ताकर्षक होत्या. बापरे! काय गिरक्या ह्या! त्यांच्या ह्या विलक्षण गिरकीने त्या हळूच निघणाऱ्या धाग्याला भराभर पीळ चढतो आहे, पण या कशाला घेतात लक्षात! खरोखर, एखाद्या परिस्तानात आल्याप्रमाणे मी त्या नाचाने अगदी वेडावून गेले. हा काय प्रकार आहे ते मला कळेना. तेथे असलेल्या बायका माझ्याकडे टवकारून पाहत होत्या, तिकडेही लक्ष जाईना. माझी नजर नुसती त्या फिरत्या चात्यांवर खिळून राहिली! त्यांच्याकडेच नजर देत मी दोन्ही रांगांमधून चालू लागले. 'बाई, पदर अडकेल एखादा!' एक बाईने सूचना दिली आणि मी भानावर आले. खरोखर ह्या एवढ्याशा जागेत ही माणसे वावरतात तरी कशी! त्या सूचनेने माझ्या मनात प्रश्न उद्‌भवला. "किती चात्या एक एक जण पाहता?" "ही सबंध ओळ!" "सारखे या भिंगरीसारखेच चालावे लागत असेल नाही तुम्हाला?" "अं, त्याचे काय? होते सवय!"

"तुमच्याकडे किती माणसे एका साच्यावर काम करतात?" मिस रोझने विचारले! "साचे तिकडे चालतात" असे म्हणून इंजिनीअरसाहेबांनी तिकडे मोर्चा वळवला. मी फिरून एक वार त्या नाचणाऱ्या चात्यांकडे डोळे

भरून पाहून चालू लागले! माझ्या जवळच्या साच्यातून आवाज येऊ लागला. मी दचकून तिकडे पाहिले; कारण माझे लक्षच तिकडे नव्हते. दोऱ्यांच्या रंगीत उभारलेल्या पडद्याने माझे लक्ष वेधले होते. सट् सट्! एक लहानसे काही तरी उडून दुसरीकडे पडले. सट्! फिरून परत आले. 'कायरे हे!' मी खूप जोराने ओरडून त्या मजुराला विचारले. त्या कान-ठळ्या बसून जाणाऱ्या आवाजात माझा आवाज त्याला प्रथम ऐकू येईना. "काही नाही, धावता धोटा आहे हा! हा असा इकडून तिकडे जातो आणि कापड विणले जाते. या फण्या आहेत ना, यातून उभी बाजू ही अशी तयार करून घेतली की झाले." साचा थांबवून त्याने मला समजावून सांगितले.

"दोन साचे चालवतात हे?" मी जरा आश्चर्याने इंजिनिअरकडे पाहून विचारले.

"दोन? जपानात एक पोरगी आठ साचे चालवते. आपल्याकडे आता कोठे माणशी तीन साचे आम्ही काही ठिकाणी सुरू केले आहेत. वास्तविक काय असते ह्यांना काम? एकदा नीट लावून खटका सुरू केला की खलास! चार काय नी आठ काय!" आणि खरेच तो माणूस फारसे काही करीत नव्हता. धावता धोटा इकडून तिकडे सटासट उड्या मारी, प्रत्येक क्षणाला एकेक आठी पडून हळूहळू कापड पुढे सरके. त्या जवळ जवळ दिसणाऱ्या सुताच्या जाळीतून हळूहळू छानदार, घट्ट विणलेले पातळ बाहेर येत होते. दोन वीत दिसणारे ते तांबडे पिवळे दोरे, बारीकशा दोन किनारीत संकलित झाले होते. माझ्या डोळ्यांवर विश्वास न बसल्या-सारखे होऊन मी मात्र त्या पातळाला हळूच हात लावून पाहिला!

"किती वेळ लागतो कापसापासून अगदी पुरा कपडा व्हायला?" यंत्रयुगाच्या करामतीने स्तिमित होऊनच मी त्याला विचारले. "अं, फार तर चारपाच तास लागत असतील!" इंजिनिअरने स्वाभिमानाने उत्तर दिले. मीही यंत्राच्या अद्भुत सामर्थ्याने चकित होऊन त्या साच्याकडे पहात राहिले.

दुसऱ्या एका ठिकाणी रंगीत डिझाईनच्या चादरी तयार होत होत्या.

वास्तविक पुढे उभा असलेला उभ्या दोरांचा तणावा मागे पाहिल्यासारखाच दिसत होता, पण चादरीवर मात्र सुंदर कमळांची वीण आलेली होती.

काय मनुष्याचे डोके आहे! आणि त्याची करामत तरी किती?

तेथे सारे यंत्राने चालले होते. घड्या यंत्राने, छाप यंत्राने, ताणणे यंत्राने, उचलणे यंत्राने! खरोखर माणसाचे बुद्धिसामर्थ्य विलक्षण आहे. एवढासा असहाय प्राणी पण राक्षसासारख्या पंचमहाभूतांना सुद्धा केवळ आपल्या बुद्धीच्या जोरावर नमवून सारे विश्व पादाक्रांत करतो! चार तासात कापसापासून तलम कपडा! विश्वामित्राच्या जगनिर्मितीची दंतकथा नाही. खरोखरच या युगात मनुष्याने परमेश्वराशी स्पर्धा चालवलेली आहे. कुठे ती महिनेच्या महिने रात्रंदिवस खपून अखेर दिसायला जाडीभरडी दिसणारी वस्त्रे, व कोठे चार तासांच्या आंत गरिबाच्याही हातात मिळणारे हे तलम कापड!

"तुमच्याकडे या फण्या कशा ओवून येतात?" मिस रोझने प्रश्न केला. माझे कुतूहल अधिक वाढले; न जाणो येथे ओवण्याचेहि एकादे यंत्र असावयाचे. आमच्या स्वाऱ्या इंजिनिअरच्या मागोमाग ओवण्याच्या खोलीकडे चालू लागल्या. या खोलीत एक एक अशी चौकट लोंबकळत असून तिच्या दोन्ही बाजूला दोन दोन मनुष्ये दोरे ओवीत बसलेली होती. भराभर अचूकपणे दोरा ओवण्याचे त्यांचे ते काम पाहून मला कौतुक वाटले. पुरुष असून इतक्या सफाईने अं!

खास मला नाही इतक्या लवकर सुई ओवता येणार!

"डोळे दुखून येत असतील—नाही?" मी जरा त्यांची कल्पना येऊन सहानुभूतिपूर्ण स्वरात बोलू लागले;—

"किती वेळ काम करता तुम्ही हे?"

"दहा तास." त्या माणसांनी उत्तर दिले.

"काय! दहा तास? सारखे दहा तास दोरे ओवायचे? अगदी कंटाळवाणे होत असेल नाही?"

"हां बाई, पण पोटाकरता करायला पाहिजे ना!"

मला उत्तर मिळाले आणि का कोण जाणे, मला बरे वाटले नाही.

मिस रोझ व इंजिनिअर बोलत बोलत पुढच्या खोलीत शिरली. मीही त्यांच्या मागोमाग आत शिरले. "बाई, इकडे कोणीकडे ?" एकदम मला कोणी तरी प्रश्न विचारला. मी दचकून मागे वळून पाहिले. मला ओळखणारे कोण येथे हे, म्हणून पाहते, तो सहा नंबरच्या चाळीतील काशाबाची स्वारी त्या ठिकाणी काम करीत असलेली मला दिसली. त्याच्यापुढे एक लांबच लांब दोऱ्यादोऱ्यांचा तणाव पसरलेली चौकट असून ती सारखी खालवर करीत पुढे येई, मागे जाई. मला मोठी गंमत वाटली. इंजिनिअरने काशाबाला थांबविले व पुढे पाठीमागे होण्यात ते तणावे खालवर कसे होत जातात, ते आम्हाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

"काशाबा, काय रे हे ? काय म्हणता तुम्ही याला ?" मी काशाबाशी बोलू लागले.

"हत्त्येच्या, त्येला मोट बोलतात बाई ! ही अशी पुढे जाते आणि खटका बसतो. लगेच खालचा दोर वर येतो आणि येरून अक्षी म्हाघारी जातो."

"काय रे, केवढी भारी रंद आहे नाही ? एकटाच का काम करतोस हिच्यावर ?"

"न्हाई बाई; एक दुसरा पोरगा हाय ना मदतीला !" बोलता बोलता काशाबा सारखा मोटेवर मागेपुढे जात होता. पसरलेल्या तणाव्यातील मधला दोरा तुटला की त्याची सरावलेली नजर अचूक ती जागा हुडकून काढी आणि सांधून देई ! फिरून मोट सुरू.

"कायरे, सबंध वेळ हे असेच का करावयाचे ?"

"नाही तर काय बाई, मोटच ती ! मोटेच्या बैलावाणी आम्ही सारखंच मागं जातुया, पुढं येतुया. पर त्येथंबी कोणी धा तास न्हाई लावीत मोटेला. येथे अक्षी धा तास ! जरा चिलीम वढेन म्हटलं तर फुरसत बी न्हाई." मागे पुढे जाता जाता दोरे सांधीत काशाबा अर्धवट हासत बोलत होता.

"पण गंमत वाटते नाही यंत्राजवळ काम करावयाची ? एक कळ दाबली की झाले सुरू, राक्षसासारखे काम !"

"हां बाई ! पण त्ये गंमत कोणास्नी ? तुम्हास्नी गंमत ! पर असं बैला-

वाणी धा तास मागे पुढे व्हण्यात कसली आलिया गंमत!" काशाबाचा तक्रारीच्या सूर सुरू झाला.

सकाळच्या प्रहरी गुलाबी झोपेत गोड सुस्वप्ने पाहत अर्धवट गुंगीत असता एकदम दूधवाल्या भय्याची रुक्ष हाक ऐकून जागे व्हावे तसेच काशाबाने केले. मी शोधक नव्हते, पण यंत्रशक्तीच्या करामतीने दिपून जाऊन मला मानवी सामर्थ्याचा कैफ चढूं पाहत होता. निसर्ग आणि मनुष्याचे एवढेसे डोके यांच्या अष्टौप्रहर चाललेल्या प्राणान्त चुरशीच्या सामन्यात दर वेळी मनुष्य पुढेच पाऊल टाकीत आहे. ज्याला एवढी प्रचंड धुडे नुसती खटक्यासरशी चालती करता येतात, पंचमहाभूताना पायाच्या नुसत्या आंगठ्याखाली दाबून सहज लीलेने खेळवता येते, तो मनुष्य काय करू शकणार नाही? असा विचार करून यांत्रिक युगाची गोड गोड स्वप्ने पाहत यंत्रांमुळे सुखकर झालेले आयुष्य मी रेखाटू पहात होते. पण त्या सुखस्वप्नातून काशाबाने मला जागे केले.

काशाबा म्हणतो, "बाई, खटका फिरला की मोट चालू होते खरी, पण आम्हाला बी बैलावाणी मागं म्होरं करावं लागतं!" मनुष्याने निर्माण केलेल्या यंत्रापाशी त्याचे हेच का स्थान! अंहं, काही तरी चुकते आहे.

गोड स्वप्नातून जागे केल्याबद्दल रागावून फिरून डोळे मिटून तेच स्वप्न पाहण्याचा प्रयत्न करावा तसे मी केले. माझ्या मनातून मी काशाबाला धुडकावून लावले व फिरून अल्लादिनाच्या त्या गुहेत चोहोकडे पाहू लागले. पण ती जादू आता उधळून गेली होती. "छे, सारे सहा हजार मजूर तर आहेत या गिरणीत! तशी फारशी मोठी नाही." इंजिनिअर साहेब मिस रोझना सांगत होते.

सहा हजार! फिरून माझे मन विचार करू लागले. या सहा हजार माणसांचे येथे स्थान काय? त्या प्रचंड जगडव्याळ धुढाशी ही सारीच का अशी जखडून पडली आहेत? सारेच काशाबाखारखे दहा तास नाही का तेच काम करीत? दहा तास तेच दोरे ओवणे, तेच बाबीन भरणे, तेच साच्याकडे लक्ष देणे, तसेच मोटे बरोबर मागे पुढे होणे—काय आयुष्य हे! मला असे दहा तास तेच ते काम करायला कोणी सांगितले तर?

यंत्र, पट्टा नाही २४ तास सारखे चालत ! पण मनुष्य काही यंत्र नव्हे. त्याला मन आहे. त्याच गोष्टी करायचा त्याला कंटाळा येतो. प्रो. गोडबोल्यांनी एकदा अमेरिकेतील अनुभव सांगताना दिलेल्या उदाहरणाची मला आठवण झाली. "तू दहा वर्षे या मोटारच्या कारखान्यात काम करतोस; तुला सगळ्या कामाची चांगली माहिती झाली असेल नाही ?" त्यांनी एका मजुराला विचारले.

"नाही. आमच्याकडे 'स्पेशलायझेशन' आहे." त्याने उत्तर दिले.

"मग तू काय करतोस ?"

"आज दहा वर्षे सतत मी १०२४ हा नंबर खिळ्यांनी बसवतो आहे." यांत्रिक युगाचा स्पेशलायझेशन हा विशेष आहे. दहा वर्षे १०२४ हा नंबर बसवणे, दहा वर्षे दहा तास सारखे दोरे ओवणे, दहा वर्षे दररोज दहा तास साचे पाहणे, हेच अखेर यंत्राने माणसाला दिले काय ?

गिरण्यांनी गोरगरिबांना सुद्धा तलम कापड मिळते खरे, स्वस्तही मिळते. पण पैशाच्या स्वस्ताईबरोबर त्यांना मनुष्यजीविताची दुसरी किती जब्बर किंमत द्यावी लागते आहे ! सकाळी सातला हे मजूर येथे येतात, संध्याकाळी सहाला जातात. तोपर्यंत तेच ते कंटाळवाणे एकच एक काम ! काय एक तास जेवायला लगा लगा करीत जातील तेवढे.

या दहा तासानंतर त्यांच्यात काय त्राण उरत असेल ? ऊस चरकांत घालून पिळून काढावा तशीच यांची स्थिती आहे. गिरणीतील कामात असे दहा तास घालविल्यावर उरले जीवन म्हणजे उसाचा पाचोळा !

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य आठवे

काशाबाचे स्वप्न

* * * * * * * * * * * * * * *

मुंबईत राहण्यापूर्वी मी येथे आले म्हणजे मला मुंबईच्या बालू लोकांची मोठी गंमत वाटे. चाळींत काम करावयाचे, घरोघर काम करता करता मिळेल ते खावयाचे, दुपारी तण्णावून उन्हात झोप. फिरून संध्याकाळी काम. मग रात्री एकदा धुणीभांडी आटोपली की म्युनिसिपालटीच्या दिव्या खाली बसून पत्ते झोडायचे, झोप आली की रात्री असेच कोठे तरी आड-सांघीत, जिन्यांत, गच्चीत, नाही तर शेवटी रस्त्याच्या पदपथावर कोठे तरी पसरले की झाले काम. सकाळ झाली की फिरून काम सुरू.

ना घर, ना दार, ना बायको, पोर की आप्तेष्ट. एवढेच नव्हे, स्वयं-पाकाची सुद्धा खटखट नाही. अशा या मुंबईविशिष्ट प्राण्याचा जीवनक्रम मोठा विचित्र असतो. बाहेरगावी हे चित्र तुम्हांला कधीच आढळत नाही. तेथे तुमच्याकडे काम करीत असलेला माणूस सकाळी चारपासून तुमच्या-कडे कामाला येईल, पण रात्र झाली की आपल्या अशा तोडक्या का होईना, खोपटांत जाऊन पडेल. पण येथे असे नाही. त्यामुळे साडेतीन हाताच्या आराखड्याबरहुकूम कापलेली आगापिच्छा नसलेली बालूची मूर्ति चाळीतून, नळावर, जिन्यांत, चोहोकडे वावरताना पाहिली की मोठी गंमत वाटते. आणि 'अरे, हा पहा शहराच्या कारखान्यात तयार होत असलेला अस्सल शहरविशिष्ट माल,' म्हणून त्याकडे बोट दाखवावे असे वाटते.

मुंबईत राहून मजूरवस्तीत काम करायला लागल्यावर तेथे सुद्धा असाच एक पण दुसऱ्या प्रकारचा शहरी नमुना माझ्या पाहण्यात आला आहे. मात्र त्याची तऱ्हा अगदी निराळी आहे. यातील लोक कितीही वर्षे मुंबईत राहिले तरी त्यांना मुंबई कधी आपलीशी वाटू शकतच नाही.

वास्तविक मुंबई शहर म्हणजे खरोखर हिंदुस्थानच्या साऱ्या कोपऱ्यातून

येणाऱ्या अठरापगड लोकांना एकत्र मिसळण्याचा–शहरी बनविण्याचा–कारखाना. पण वालात न शिजणाऱ्या चहाडाप्रमाणे त्यातून सुद्धा हे लोक अलग राहतात, सर्वात मिसळून जाऊ शकत नाहीत. संसार मुंबईला, पण घरदार मुलखाला, अशी यांची द्विधा मनःस्थिती असल्यामुळे सदैव 'भाऊच्या धक्क्यावर' बोचकं बांधून तयार असल्यासारखे ते बोलत असतात. मुलाला शाळेत घालण्यासून तो महिनाभर विषमाने आजारी पडलेल्या मुलीला, नाहीतर बायकोला, डॉक्टरला दाखविण्यापर्यंत कोणतीही गोष्ट त्यांच्यापाशी काढा, त्यात मुलूख आला नाही किंवा मुलखाला गेल्यावर सर्व काही ठीक होईल, असे तुम्हांला उत्तर मिळाले नाही, असे होऊच शकत गाही.

असे का होते याचे मला नेहमी कोडे पडे. इतकी वर्षे मुंबईत राहूनही हे लोक बदलू का इच्छीत नाहीत, यांना मुंबई आपली अशी का वाटत नाही! काम करीत असताही नकळतपणे माझे मन याचे उत्तर शोधू पाहत असे.

एखाद्याला मोठ्या कष्टाने लावून दिलेले काम सोडून तो एकदम 'मुलखात' गेलेला ऐकला की वाटे, अरे, हे लोक असे वेडे कसे, हे का काम सोडून जाण्याचे दिवस आहेत! बरे, बदली वगैरे कोणी द्यायचा, ते सुद्धा नाही. असे कसे हे? यांना काय पैशाची गरज नाही? इकडे तर पै पै करता मारे प्राण टाकीत असतात आणि इकडे पाहावे तर अशी बेफिकिरी. का हे असे? यांना जरा कोणी शहाणपणाने वागायला कसे शिकवीत नाही?

पण माणसाचे सारे आयुष्य शहाणपणाचे–किंवा शुद्ध तर्कबुद्धीचे बोट धरूनच चालत असते काय? खास नाही. आणि मला वाटते, तसे ते नाही म्हणूनच त्यात इतकी मजा आलेली आहे. शुद्ध तर्काच्या पांढऱ्या रंगापेक्षा त्यात उठणाऱ्या भावनांच्या रंगीत छटानीच आयुष्य अधिक खुलून दिसते. मात्र आतापावेतो येथे कोणती छटा वावरते याचा शोध लागला नव्हता. त्यामुळे शिवीत असता दर टाक्याला नडत असलेल्या धाग्यातील बारीकशा गाठीप्रमाणे दर वेळी कोठे तरी खटकते, अडते,

असाच मला अनुभव येई. पण ती गाठ न सोडवता आल्याकारणाने मी केवळ त्रासून मात्र जात असे. पण आज मात्र तसे वाटत नाही. आपल्याला न सुटणारे एखादे गणित मनात घोळत असावे आणि मध्येच एकदम काही तरी करीत असता त्याचे उत्तर सुचावे तसे माझे झाले.

वास्तविक काशाबाला रामाला शाळेत घाल, रामाला शाळेत घाल, म्हणून मी किती वेळा सांगितले असेल. त्याच्यासारखा चलाख मुलगा शिकलासवरला तर तुझ्याच पुढे उपयोगी पडेल, इ० लालचीच्या गोष्टी सुद्धा समजून सांगितल्या असतील. पण त्याचे आपले एक उत्तर, "आम्ही येथे थोडीच राहायची आहोत! आज ना उद्या मुलखाला जाणार! तेथे कोठे हाये ती शाळा न बिळा; मग कशेला उगीच पाटी बुकाचा खर्च?" आजही प्रथम माझ्या त्याच गोष्टी चालल्या होत्या. पण हळूहळू मात्र त्या रामावरून मुलखावर केव्हा गेल्या हे आम्हाला कळलेच नाही. एवढे खरे की त्या सांगताना काशाबा जो रंगून गेला तो इतका की एरव्ही हाच तो रामाचा बाप काशाबा असे मला कोणी सांगितले असते तर मी खरे सुद्धा मानले नसते. त्याचा तो अकाली सुरकतलेला म्हाताऱ्यासारखा दिसणारा चेहरा पार पालटला. सदैव दबल्या व संशयी वृत्तीने जगाकडे पाहणारे त्याचे डोळे चमकू लागले.

काजूच्या डोंगरावर लहानपणी आपण मोकाटपणे कसे भटकत असू, एकदा सारेजण जमलो की एकदम कर्कश शिळा घालून आसपासचा तो प्रदेश कसा दणाणून सोडीत असू, याचे वर्णन करता करता त्याच्या चेहऱ्यावर स्वैरपणे रानात बागडणाऱ्या खेळकर मुलाचे पाणी चमकू लागले. एका झोपेवर उठून खोताच्या वाडीतले आंबे चोरून आणताना तेथल्या विहिरीजवळच्या बकुळीवर राहात असलेल्या हडळीचे त्याचे वर्णन ऐकत असताना तर ती दर्याच्या घनगंभीर आवाजाने निनादत असलेली, नारळी पोफळीच्या झाडांनी सळसळत असलेली, झाडांच्या दाट सावल्यांनी मनाला लहानपणी भेवडावून सोडणारी कोकणची रात्र खरोखरीच माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली. आपल्या बाळपणीच्या गोष्टी सांगत असता तो आज खरोखर इतका उमलला होता की तेथे चालत असता प्रतिक्षणी दूर सरक-

णाऱ्या क्षितिजरेषेप्रमाणे हळू हळू भोवतालचे परिस्थितीचे बांध त्याच्या मनांतून दूर होऊ लागले. क्षणभर तो भोवतालचे सारे विसरला व जणू काय पूर्वकालच्या त्या गंमतीचे प्रत्यक्ष सुख अनुभवीत असल्याप्रमाणे त्याचे डोळे चमकू लागले.

मी त्याच्याकडे किती तरी वेळ टक लावून पाहत होते! चाळीतली घाण, बजबजपुरी, गिरणीचा खडखडाट अशासारख्या घाणेरड्या पार्श्वभूमीतून काशाबाचे चित्र उचलून आज कोणी तरी कोकणच्या वनश्रीने गजबजलेल्या शांत व रम्य वातावरणात नेऊन ठेयले होते. आणि त्यामुळे आतापर्यंत कधी न दिसलेला आनंदकल्लोळ, मोकळेपणा त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेला मी पाहत होते.

काशाबाचा तो चेहरा पाहिल्यापासून मला माझे कोडे सुटले असे सारखे वाटत आहे. ज्या पार्श्वभूमीत हे चित्र इतके जिवंत व खुलून दिसते ती बदलली जात असल्यामुळे तर जिवंतपणा नष्ट होत नसेल ना?

काही झाडे दुसऱ्या जमिनीत वाढूं शकतात, मरून जात नाहीत, पण त्यांच्या मायभूमीत जी टवटवी, जे तेज त्यांच्या ठिकाणी दिसते ते मात्र तेथे येण्यास पिढ्यांचाच कालावधी लोटावा लागतो. त्याचप्रमाणे मुलखात शेतावर असताना शांतपणे, सावकाश, निर्बंधपणे काम करीत वाढलेले हे जीव मुंबईच्या कोंदट गजबजलेल्या वातावरणांत गेले की उबून जात असावेत. मुंबई चांगली असेल; त्यांत डांबरी रस्ते, सिनेमा, उंच उंच चाळी, गिरण्या, ट्राम, मोटारी, यांची मोठी गंमत असेल. पण काही असले तरी हे ठिकाण आपले नव्हे, असेच सारखे आतल्याआत त्यांना वाटत असावे. आणि मग काय होते हे सांगता न आल्यामुळे ज्याप्रमाणे आईवेगळे झालेले लहान मूल फक्त 'आईकडे' 'आईकडे' एवढे शब्द उच्चारूनच आतली खळबळ सांगू शकते, त्याप्रमाणे यांचे मनही 'मुलखाकडे—मुलखाकडे' असा धावा करीत राहते. मला काशाबाचे शेवटचे शब्द आठवताहेत, "बाई, माझी जमीन, घरदार सारे सावकाराच्या घशांत गेले नसते तर येथे कशापायी येत होतो? आपलं असं हाय काय या ममईत? पैका मिळतो म्हणून येथे यावयाचे." *

शेताचे काम जसे त्यांना आपले असे वाटते तसे गिरणीत होत नाही. ते केवळ मोलाचे काम करावयाचे म्हणून करावयाचे. मला वाटते स्वतःच्या कल्पनेचा अभाव हेच त्यांच्या मुलखाच्या ओढीचे कारण असावे. त्याखेरीज वेळी अवेळी काम सोडूनही जाण्याइतके त्यांचे मन मुलखाकडे का धाव घेते?

वास्तविक माझ्या माहितीप्रमाणे हा काशाबा आज उणीपुरी दहा वर्षे या मुंबईत आहे. आणि कदाचित यापुढची आणखी किती वर्षे त्याला येथे काढावी लागतील हे खरोखर एक त्या काळालाच माहीत. पण हा दहा वर्षांचा कालावधी त्याच्या खिजगणीत तरी आहे का? कालच गावाहून मुंबई बंदरावर उतरावा इतक्या ओल्या जिव्हाळ्याने तो मुलखाच्या गोष्टी सांगत आहे. पहिली चार पाच वर्षे कदाचित त्याने आपण पैसा जमवून लवकर परत जाऊ या आशेने सगेवाल्याकडे, गाववाल्याकडे अशी काढली असतील. पण आज त्याची बायकोपोरे, आई—जवळजवळ मुलखातील सारा संसार येथे आल्यासारखा झाला आहे. मात्र अजूनही काशाबाचे मन कोणते स्वप्न पाहत आहे? गिरणीत नोकरी करून मुंबईत स्थायिक होण्याच्या त्याच्या गोष्टी कधी कोणी ऐकल्या आहेत का! छत्, त्याच्यापाशी हे बोलले तरी त्याला आवडायचे नाही. परवाच रामाला तो म्हणाला, "राम्या लेका, शहरचे एकेक ढंग शिकतोस! पण काय तुला येथं राह्यचं हाय काय? आपली मुलखाची शेती." 'मरावे तर एक काशीत नाही तर आपल्या वेशीत' ही म्हण त्याच्या तोंडून मी कितीतरी वेळा ऐकली आहे! दुर्दैवाने तरुणपणी नाही तर नाही साधले, पण आपल्या जीवनाची

---

* आणि खरोखर खेड्यातून मुंबईत काम पाहावयाला येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचे हेच कारण नसते काय? पावसाचा रुसवा फुगवा, आधीच कार्याकरिता किंवा कारणाकरिता काढलेले कर्ज, त्यांत एखाद्या अवर्षणाच्या दुर्दैवाची भर व त्यामुळे सावकाराची करावी लागलेली घरभरणी, ही या लोकांची करुण कहाणी कोणाच्या परिचयाची नाही! सावकाराचे कर्ज फेडायला 'पैका' हवा आणि तो मुंबईत मिळतो म्हणून ते येथे येतात.

संध्याकाळ तरी आपल्या मुलखात, स्वतःच्या जमिनीत सत्तेच्या घरी-दारी घालवावी, अशी वेडी आशा बाळगून बिचारा आपले मुंबईचे मुशाफिर वाटणारे जीवन काढतो आहे. पण हे त्याचे गोड स्वप्न–वेडी आशा–कधी खरी ठरेल काय? काशाबासारखे मुलखाच्या धक्क्यावर आणखी किती तरी जीव हीच वेडी आशा धरून मुंबईत उपऱ्यासारखे राहत असतील.

कोकणच्या ह्या पहिल्या पिढीकडे पाहिले की त्यांचे शरीर येथे आले पण मन अजून तेथेच रेंगाळते आहे याची मला खात्री पटते. त्यांची ती घेरा ठेवलेली लांबच लांब शेंडी, कमरेला दुहेरी करून कसलेले धोतर, कानात हलक्या सोन्याची पोवळ्याची भिकबाळी इत्यादी साऱ्या गोष्टी त्याचीच मला साक्ष देतात. पण तरुण पिढी? तिला मुलखाची आठवण होत असली, त्याविषयी आपलेपणा वाटत असला, तरी त्यांच्या नजरेत मात्र मुलखाचे पाणी खेळत नाही.

परवाच काशाबाचा मुलगा रामा, आपल्याला ड्रायव्हर व्हावे असे वाटते, म्हणून मला सांगत होता. रामाला ड्रायव्हर होण्याची हौस असेल, दुसऱ्या कोणाला हविसातील लाल पट्टेवाला, ते नाही तर निदान साधा शिपाई तरी व्हावेसे वाटत असेल.

मी काशाबासारख्यांच्या घरात शिरून या तरुण पिढीला वळवण्याचा गनिमी कावा करू पाहत आहे. पण तोवर काशाबा व त्याच्यासारखेच कित्येक जीव मुलखाच्या वाटेकडे डोळे लावून आपले घर, जमीन यांचे स्वप्न पाहत आहेत त्यांची वाट काय!

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य नववे

श्रद्धानंद महिलाश्रमास भेट

* * * * * * * * * * * * * * *

जुन्या लोकात अशी एक समजूत आहे की, हिमालयावर विवक्षित ठिकाणी गेले असता यमलोकात यातना भोगीत असलेल्या जीवाचा आक्रोश ऐकू येतो व त्यामुळे ऐकणाऱ्याच्या मनास उपरति होते. मात्र त्या किंकाळ्या किंवा अक्रोश साऱ्यांनाच ऐकू येईल असे बिलकूल नाही. काही थोड्याच व्यक्ती अशा असतात की त्यांच्या कानी हे प्रकार पडावे व त्यायोगे अंतःकरण पिळवटून निघून त्यांनी स्वतःचा मार्ग जास्त सुलभ करण्यास झटावे.

ही समजूत खरी असो वा नसो, पण यात मनुष्यसमाजाचे एक सत्य मात्र फारच खुबीदार रीतीने व्यक्त केले आहे यात संशय नाही. हिमालयाच्या उंच शिखरावर भटकत राहून गत व अदृश्य जीवांच्या यातना ऐकणे बाजूस सारले, तरी सुद्धा आपल्या समाजात अशा किती व्यक्ती सापडतील की ज्यांना आपल्या डोळ्यासमोर प्रत्यही घडत असलेल्या अन्यायांनी, संकटांनी, दुःखानी गांजलेल्या लोकांचा हृदयभेदी आर्त स्वर ऐकू येत असेल ?

निरनिराळ्या राक्षसी रूढीनी, जुलमी कायद्यानी, हजारो वर्षे बद्धमूल होऊन बसलेल्या समजुतीने गांजलेले असहाय जीव फसून व हताश होत्साते आडमार्गाला लागत आहेत. आयुष्याची कष्टमय यात्रा रखरखीत वाळवंटातून चालत असता आपुलकीच्या प्रेमळ शब्दाची तहान लागलेले किती जीव खरे पाणी म्हणून मृगजळाच्या पाठीमागे लागून अंती फशी पडत आहेत ! यौवनाची कळी पुरती उमलली सुद्धा नसता, मनुष्याची स्वार्थी पाशवी वृत्ती त्यांच्या अजाणतेपणाचा फायदा घेऊन कोवळ्या कळ्या पायाखाली तुडवून टाकीत आहे. या असहाय गांजलेल्या, तुडवलेल्या जीवाचे करुण

विलाप मोठ्याने ऐकू येणे शक्य नाही. आले तरी, सर्वत्र दाट धुके पसरले असता मनोरची वस्तू दिसू नये त्याप्रमाणे डोळ्यादेखत प्रत्यही या गोष्टी घडत असता त्यांच्याकडे कळस वा नकळत डोळेझाक होत आहे. एकीकडून दुसरीकडे या गोष्टी हळूच कुजबुजल्या जात असता त्यांचे आधीच विकृत स्वरूप सामान्य जनदृष्टीला अधिकच विकृत दिसू लागते व पडलेल्या व्यक्तीला उठायला हात न देता समाज व सामाजिक कल्पना तिला उलट खोलात मात्र लाथाडून देतात. या पतित व्यक्तीच्या अंतःकरणाचे मुके कढ समाजाला कुठून ऐकू येणार ?

आज सहा कोटी समाज हिंदु म्हणवला जात असता हिंदुधर्माला—देवदर्शनाला सुद्धा—पारखा होऊन बसलेला आहे. उघड्या पडलेल्या खाद्य पदार्थांवर कावळ्यांनी चोहोकडून येऊन झडप मारावी, तद्वत् खिस्ती व मुसलमानी धर्म हजारोनी आमचे लोक लांबवीत असता आमच्यांतील धर्ममार्तंड उघड्या डोळ्यांनी निर्विकार नजरेने हे सारे पाहून अजून थंडच बसले आहेत. हजारो लाखो लोक निढळाच्या घामाने सुद्धा अन्न मिळत नाही म्हणून तडफडत असता त्याच शहरात हजारो लाखो रुपये शर्यतीच्या मैदानावर केवळ चैनीसाठी खर्च होत आहेत. परदेशांत आमच्या लोकांकडून ओतला जाणारा पैसा लक्षात घेतला तर अजूनही हिंदुस्थानात सोन्याचा धूर निघत आहे असेच त्या लोकांना वाटत असेल ! हिंदुधर्माच्या परिसरात बसलेल्या या सहा कोटी अस्पृश्यांच्या किंवा दाराबाहेर तळमळत असलेल्या भुकेकंगाल लोकांच्या गोष्टी सोडल्या, तरी शेजारी, तुमच्या घरात, कितीक वेळा प्रत्यक्ष तुमच्याकडून, कळत नकळत तुमच्या आयाबहिणींवर काय जुलूम होत आहे, काय अन्याय घडत आहेत, याचा आपण कधी विचार केला आहे काय ? एक वेळ युद्धात प्राणघातक शस्त्रास्त्रानी येणारा उघड मृत्यु पुरवला, पण अदृश्य शृंखलांच्या जाचणीने होणारे मृतवत् जीवन नको.

या ओसरीवरच्या सामाजिक अन्यायांची ओळख—चीड आणण्याइतकी—'**श्रद्धानंद महिलाश्रमा**–'कडे नुसती ओझरती नजर टाकली तरी होण्यासारखी आहे.

ही पहा ! मृगजळाच्या मागे धावत जाऊन फशी पडलेली हरिणी. नवऱ्याचे छत्र नाहीसे झालेले. हक्काचे, प्रेमाचे असे एकही माणूस राहिलेले नाही. सासरी, माहेरी लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या खस्ता खाव्या, पण त्याचा मोबदला म्हणून एक गोड शब्द सुद्धा कोणी बोलू नये, की खाल्ले प्यायले सुद्धा विचारू नये ! कल्पना करा, असे निष्प्रेम सहानुभूतीशून्य जिणे कंठणे किती जड आहे ते ! मनुष्याला मन आहे. शरिराला खाण्यापिण्याची आवश्यकता लागेल त्याप्रमाणे मनालाही सहानुभूतीची, प्रेमळ शब्दाची इच्छा असते; पण तिला वाव कोठून ? तिच्याविषयी आपलेपणा वाटायला ती पाहिजे आहे कोणाला ? "तिचे नशीब फुटले !" खरोखरच फुटले. पुरुष जात तिच्याकडे निराळ्या दृष्टीने पाहू लागली. तिच्याच भगिनी दयार्द्र कोमल अंतःकरणाच्या म्हणून प्रसिद्ध ! पण—? कावळ्याच्या विलाला इतरांनी स्पर्श केला म्हणजे कावळे सजातीय असताना सुद्धा टोचून मारतात, तद्वतच तिची अवस्था ! सजातीयांना तिच्याविषयी सहानुभूति वाटणे दूरच राहो, लाखो घरातून तिचे जीवन स्त्रीवर्गाकडून जास्त खडतर केले जाते. तापलेल्या रसरशीत शब्दांनी आधीच पोळलेल्या मनावर डागण्या देण्यात येतात. अशा स्थितीत मन शून्य होऊन ही असहाय अबला आपण कोणाचा आश्रय घेतो याचे भान न राहता, आम्रवृक्ष समजून नागफणीच्या सावलीला बसली.....

ही पहा भांडून रागाच्या भरात वैतागून घराबाहेर पडलेली स्त्री. रागाच्या झपाट्यात कसलेही भान राहिले नाही. "या घरापासून कोठे तरी दूर दूर जाऊ दे" ही एकच जाणीव ! ही बाहेर पडली खरी. पण जाणार कुठे ? पैसे नाहीत, कसली माहिती नाही. या अज्ञानाचा व रागाच्या आंधळेपणाचा फायदा घ्यायला काय कमी नराधम टपून बसले आहेत ? धर्माच्या नावाखाली परस्त्रीला भ्रष्ट करण्यात भूषण मानणारे भोंदू काही कमी नाहीत. धर्माकरिता, मदतीच्या मिषाने असहाय स्त्रीला घेरणारे काही कमी नाहीत. एका बेभान क्षणी हिने अविचाराने मदत तर घेतलीच.

मदतीचा मोबदला म्हणून हा नराधम आपल्या प्राणापलीकडे असलेल्या अब्रूवर घाला घालील असे तिच्या मनात सुद्धा आले नसेल. पण मग उपयोग काय! मांजराच्या तडाक्यात सापडलेला उंदीर कितीसा सुटू शकतो? आता ही पश्चात्तापाने नुसती जळते आहे. परपुरुषाचे चिंतन हिला कधी स्वप्नात सुद्धा शिवले नसता असहायपणे पाशवी वृत्तीला मारून मुटकून हा बळी पडला आहे. तिच्या मनाची साक्ष कोण घेणार! जन-दृष्टीने ती पतिता! तिच्या छळवाद्याला हे पक्के माहित आहे. कितीही पश्चात्ताप झाला तरी तिला स्वतःच्या घराचा आसरा परत कोण देणार?

ही पहा जुलमी कायद्यांनी व निर्दय आप्तस्वकीयांनी घडवलेली तिसरी करुण मूर्ति! चांगली कुलीन घराण्यातील दिसते आणि असे कसे, अशा बुचकळ्यात पडू नका! नुसती कुलीन घराण्यातीलच नाही, तर एके काळी तिने चांगले सुखात दिवस घालविले आहेत. पण आता पहा! रानात पडून राहिलेल्या सुंदर जुन्या पडक्या इमारतीप्रमाणे तिच्या वैभवाच्या काळातील अवशेष तिच्या चेहऱ्यावर दिसत आहेत. बाकी सारा येथून तेथून भयाण ओसाडपणा!

पतिनिधनानंतर पोटापुरते मिळण्याची आशा असता भाऊबंदानी फसवून नागवून तिला देशोधडीला लाविले. कायदा हा तिच्या बाजूचा नाही. मग तिची दाद कोण घेणार? घरी स्वयंपाकी ठेवण्याची ऐपत असता आता कवडीवर सुद्धा हक्क न राहिल्यामुळे स्वतःच पोळपाट लाटणे घेऊन लोकांच्या दाराशी राबते आहे. तरुण वय, सुखात घालविलेल्या दिवसानी राहिलेली अंगकांती आणि साधारण रूप, स्त्री-जन्माच्या जोडीला एवढी मिळकत असल्यावर कोण्या पापिष्टाची नजर तिच्यावर पडल्याशिवाय राहते आहे?

लोकांच्या घरी अब्रू संभाळून काम करीत असता तिला किती जड जात होते! दोन्हीकडून बोलण्याची चोरी. बरे, पोटासाठी उद्योग न करावा तर दुसरे काय करणार? लोकांच्या तडाक्यात न जाता दुसरे करण्याजोगे काम

माहीत नाही. काम केल्याखेरीज गत्यंतर नाही. अशा स्थितीत तिच्या निराधार स्थितीचा फायदा घेऊन कोणी दुष्टाने तिच्या जन्माचा नाश केला. पण लोक काय बोलणार? एका हाताने टाळी वाजत नाही, हेच की नाही? हा सारा प्रसंग टळला नसता का? अशी उवड्यावर पडण्याजोगी का हिची स्थिती होती? आज कायद्याने तिला पोटापुरती व्यवस्था करता आली असती तर हे अधःपतन टळले असते. पण कायदा कोठली दाद घ्यायला?

आमच्या सनातनप्रिय दुरभिमानी मतवाद्यांनो, तुमच्या सनातन म्हणविल्या जाणाऱ्या, देवधर्म-ब्राह्मण-संमत अग्निसाक्षीने झालेल्या, या असल्या विवाहाच्या जिवंत साक्षी लक्षात घ्या, म्हणजे तरी सनातन नावाखाली आपण काय अनाचार अत्याचार चालू देतो याची तुम्हांला कल्पना येईल.

विषम विवाहाचे इतके बोलके दुष्परिणाम इतरत्र सापडणे कठीणच. आज ह्या मुलीला नवऱ्याच्या घरी नांदली नाही म्हणून समाज दोष देतो आहे. पण असे का याचा विचार कोणी केला आहे का? लग्न झाले असता परक्या पुरुषाबरोबर पळणाऱ्या ह्या पोरीला समाज नाही ती दुर्विशेषणे देऊन उल्लेखितो आहे, समाजबंधनाकरिता ती सर्व योग्यच आहेत, असे कोणी समंजस माणूस सहज म्हणेल. पण बंधने पाळावी अशी इच्छा असते ती खरोखर पाळण्याजोगी आहेत की नाही ह्याकडे लक्ष देणे जरूर नाही का?

ज्या वेळी विवाह म्हणजे दागदागिने घालणे, नटणे-मुरडणे, नाव घ्यायला सांगितले की लाजणे, चार दिवस सर्वांच्या डोळ्यात भरेल असे नावीन्यपूर्ण महत्त्व प्राप्त होणे यापलीकडे काही नाही, असे वाटत होते, त्या वयात सारे ठीकच होते. म्हातारा काय नी तरुण काय, पण त्याच म्हाताऱ्याच्या कामचेष्टानी व वाढत्या वयाने उत्तेजित झालेल्या तरुण मनाला 'अंगं गलितं पलितं मुंडं' हे चित्र कितीसे मनोवेधक वाटणार! फुलपाखराप्रमाणे कोश फोडून नुकत्याच जाग्या झालेल्या मनाला असले

वैवाहिक आयुष्य नावाचे वैवाहिक वाटून मनाची जास्तच उपासमार होऊ लागली व चंचल मन इष्ट वस्तूच्या शोधार्थ अविचाराने धावू लागले. पोरी, हा अविचार तर खराच. पण त्यापेक्षा तुला ह्या अविचाराला वळविणाऱ्या तुझ्या स्थितीचीच मला जास्त कीव येते. पानावर बसवून भूक लागली असता जेऊ नको म्हणण्याइतकेच ते चमत्कारिक आहे. पण हे का कोण लक्षात घेणार आहे? स्त्रीला स्वतंत्र मनोभावना नाहीतच. म्हातारा, तरुण, कसाही असो, त्याची भोग्य वस्तु स्वतःचा विचार न करता होणे, एवढेच स्त्रीचे काम. खरंच, परमेश्वराने स्त्रीला उत्पन्न करताना स्वतंत्र मन घातले नसते तर—

ही पहा गरिबीला कंटाळलेली व सुखाच्या भपक्याने काटेरी शय्येचा आश्रय धरणारी स्त्री! तिच्याकडे पाहून नाक मुरडावे असे सहज वाटते आहे, पण जरा थांबा आणि विचार करा. तिचा दोष तर खराच, पण लग्न करून वैवाहिक सुखाचा सरळ धोपटमार्ग सर्वांस मोकळा असता तर तिची अशी स्थिती झाली असती का? पुनर्विवाह आता रूढ झाले आहेत हे खरे, पण अजून किती अपवादात्मक? पुनर्विवाहेच्छु स्त्रीला अजूनही धाडस करावे लागते. शहरासारख्या ठिकाणी ही स्थिती तर खेडेगावात इतरत्र विचारच करणे नको. खेडेगावात जन्म गेलेला. लग्न म्हणजे काय हे कळायच्या आधी कितीतरी लहानपणीच नवरा वारलेला, तारुण्यात पाऊल टाकताना मनात येणाऱ्या अनेक संमिश्र भावनांचे सुख-स्वप्न पाहणे सुद्धा जिला पारखे झालेले, घरची गरिबी, कसलीही हौस पुरण्याची आशा नाही, मन इतरत्र गुंतवायला कसलाही मार्ग मोकळा नाही, अशा स्थितीत विश्वामित्रासारख्या तपस्व्याला सुद्धा हजारो वर्षांच्या तपोभ्यासानेही जे साधणे कठीण गेले ते हिच्यासारख्या अनभ्यस्त व नुकतेच डोळे उघडून कुतूहलपूर्ण नजरेने पाहू लागलेल्या मनाला साधणे किती कठीण आहे! चोहोकडून कोंडमारा झालेला, गरिबीतच नुसती वेणीफणी नीटनेटकी करून राहिली तरी लोक हसणार, त्याचा हा परिणाम पहा.

बांध फोडून वाहू लागलेला हा ओघ कसलाही विचार न करता मुसलमानाचा हात धरून खाली नरकात खोल उडी घेत होता. आज आश्रमात येऊन तात्पुरती तिची सुटका झालेली आहे. पण पुढे काय ? खरोखरीच अशा स्त्रियांचे काय करायचे ? वैवाहिक सुखाची इच्छा असताना कोणत्याही कारणाने का होईना, त्याचा सरळ धोपटमार्ग बंद झालेला. मनावर तितका ताबा राहिलेला नाही. एकदा पाऊल चुकलेले. जन्माने स्त्री; त्यामुळे फिरून मान वर करून चालणे तिला या जन्मी शक्य नाही, ही जाणीव तिला नाही काय ? पुरी जाणीव आहे. समाज आज तिच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतो आहे ते तिला पुरं माहीत आहे. तिला पाहिजे ते सरळपणे मिळत नाही. किंबहुना म्हणूनच त्याविषयी अधिकच लालसा उत्पन्न होऊन तिची वृत्ती किती तरी वेळा बेफाम होते. तिचे बेफाम वृत्तीचे शब्द कधी तुम्ही ऐकले आहेत का ? "आता मी चांगली राहिले काय, वाईट राहिले काय, लोक माझ्याकडे कोणत्या दृष्टीने पाहणार ? असा कोण आहे की जो हात देऊन मला सरळ मार्गाने नेईल! मग मी माझ्या मनाला वाटेल तसे का करू नये ? एवी तेवी लोक हसणारच, मग भीड कोणाची ?" खरेच आहे. एकदा वस्त्र मलिन झाल्यावर आपण कुठे बसलो, काय बसलो याची कोण पर्वा बाळगते ?

आज जो समाज तिला पतित म्हणून लाथाडून बाहेर टाकतो आहे त्याच समाजाला तिचे आत्यंतिक पतन, तिच्या अब्रूचा बाजार उघड्या डोळ्यांनी पाहवतो! मग तिला समाजात व्यवस्थित स्थान मिळू शकते. पण त्यापूर्वी ? छे ! मग समाजाचा सोवळेपणा कोठे राहिला ?

या भडक चित्रावरून दृष्टी काढून हे दुसरे चित्र पहा. दुर्दैवाचा याहून कठोर घाला कोठे पहाल ? अजून तोंडावरचा पोरपणा सुद्धा गेला नाही अशा वयात—छे, कल्पनासुद्धा करवत नाही. क्षणी अल्लडपणे खेळावे बागडावे, क्षणात यौवनात प्रवेश करू लागलेल्या मुग्ध मनाची अस्फुट, गोड स्वप्ने पाहावी, लाजावे, हेच नव्हे का हे वय ? पण तो खेळकरपणा,

आनंद, कुठे दिसतो आहे ? या कोवळ्या चेहऱ्यावर अकालिक उदासीनतेची छाया का दिसते आहे ? अजून आयुष्याची कळी पुरती उमलली सुद्धा नाही तोच तीवर कीड कुठून पडली ?

बाल्यसहज निष्पाप मन असणे हा सुद्धा गुन्हाच का ? पण ज्या ठिकाणी विश्वासाने मान ठेवावी त्याच ठिकाणी गळा कापला गेला तर चौदा वर्षांची पोर करणार तरी काय ? जाणार कोठे ? पाहणार कोणाकडे ? "बाई, तुझे भावजयीचे नाते. आईबाप वारल्यावर तू या पोरीला आईच्या ठिकाणी. तू हे काय केलेस ? तुला पैसे मिळवायला या मुलीच्या अब्रूचा विक्रय करण्यापलिकडे दुसरा धंदा नव्हता का ? पैसेच हवे होते तर हिला चार कामे करायला का नाही सांगितलीस ? त्याने तिच्या जीविताचा असा सत्यानाश तरी झाला नसता ! पण हा भलता व्यापार तू कोठून आरंभलास ? लोकांच्या नांदत्या नंदनवनाचे भकास रान करून टाकावयाचे, निष्पाप कोवळ्या बालिकाना माया लावून फसवून त्यांचे आनंदमय जीवित विषवत करून टाकावयाचे, हाच एक धंदा तुला करता येतो ? तुझ्यासारख्या शिष्ट मायावी बायकांची समाज दाद तरी केव्हा लावून घेणार ? हा सर्रास चाललेला अनीतीचा व्यापार बंद तरी केव्हा करणार ? आणि तोपर्यंत अशा किती कोवळ्या कळ्या कुसकरल्या जाणार !"

पुरुषाच्या सैतानी वासनेला बळी पडलेल्या ह्या चित्रावरून डोळे फिरत असता दुर्धर्यताच्या दरबारी आलेल्या शाङ्र्गरवाप्रमाणे अपरिचित मन उबून जाते. स्त्रियांवर घडणाऱ्या सामाजिक अन्यायाच्या ह्या जिवंत साक्षी मृतात्म्याप्रमाणे ओसाडीतून एकाकी डोळ्यासमोर उभे राहून मनाला भेदरवून सोडतात. स्त्रीपुरुषसंबंधातील प्रेम, पावित्र्य, गांभीर्य, आनंद हे सारे स्वप्नातील शब्द तर नव्हेत ना, असे वाटू लागते. विषयवासना—मनाला मारून पावित्र्य, आनंद, याचा घोट करून नुसत्या जड कुडीवर धुडगुस घालणारी पाशवी वासना—हेच तर त्याचे अखेरचे उघडे स्वरूप नव्हे ना, अशी शंका यायला लागते ! सारा प्रकार कल्पनेत सुद्धा विचार करू नये–

इतका किळसवाणा वाटतो. पण ? बऱ्याचशा अशा गोष्टी आपण आंधळ्याचे सोंग घेऊन चालतो म्हणूनच चालत आल्या नाहीत काय ?

"पतित स्त्री" एकटीच गुन्हेगार असू शकेल काय ? पतितेविषयी विचार करणे इतके अशक्य नाही, तर खरोखर तिच्या बाबतीत समाजाची उपेक्षणीय, कुत्सित व अनुदार वृत्ती ही विचार सुद्धा करू नये इतकी अन्यायी जुलमी आहे !

पुरुषाने आपल्या क्षणिक भोगलालसेच्या तृप्ती साठी तिचा बळी घेऊन, काम संपताच तिला झिडकारून लाथाडून दिली ! आज सर्व स्त्रीजात जातिबहिष्कृताप्रमाणे तिची नुसती गोष्ट सुद्धा विचारात घ्यायला तयार नाही. देवादारी तिला टाव नाही. अशी स्त्री—पुरुषांनी टाकलेली, समाजाने उपहासिलेली, एकाकिनी, निःशब्द उच्छ्वासानी समाजाला आपल्या अन्यायाची जाणीव करून देत आहे.

विषयलालसेने निर्दय झालेल्या पुरुषाची ही कृती पहा. हिला निर्लज्ज व बेशरम या शब्दांनी डागण्या देत असता, तो काचेचा पेला कोणी फोडून टाकला ? खऱ्या प्रेमाला पारखी करून तिच्या मनावर रात्रंदिवस जळजळीत निखारे कोणी ठेवून दिले ? स्त्रीच्या ठिकाणी स्वाभाविक वसत असलेल्या मातृवात्सल्याला करपवून टाकून मातृत्वाच्या आनंदाचे सुखस्वप्न मृत्यूपेक्षाही भयंकर कोणी करून टाकले ?—याचा विचार कोणी करीत नाही. इतक्या साऱ्या गोष्टीना कारणीभूत होणारा तिच्या पापातील तिचा जोडीदार कोठे आहे ? का जन्माने पुरुष असल्यामुळे 'अपापानाम् कुले जाते मयि पापं न विद्यते' असे तर त्याला वाटत नाही ना ?

सामाजिक न्यायान्यायाचा खोटा एकांगी काटाच स्त्रीच्या या दुरवस्थेला कारणीभूत होत आहे. पतिता स्त्रीचा हा प्रश्न अनाथ-महिलाश्रामांनी सुटणार नाही. अनाथ बालकाश्रम काढून भागणार नाही. त्याला समाजाचा दृष्टिकोणच बदलला पाहिजे. पण तोवर ?

तोवर स्तब्ध बसून निर्दय कायदे, जुलमी रूढी, कुटिल आसुरी वृत्ती व खोट्या कल्पना यांचा नंगा नाच असाच चालू देणार !

• • •

* * * * * * * * * * * * * *

दृश्य दहावे

फिरून तुरुंगात

* * * * * * * * * * * * * *

सहनशील–सहनशील म्हणून नावाजलेल्या भूमातेच्या उदरातले मुके कढ भूकंपाचे धक्के बसल्याखेरीज आम्ही लक्षात घेणारच नाही का ? पण आयत्या वेळी सावरू पाहू तो वेळ निघून गेलेली असेल. आणि आजू बाजूला नाश–नाश–ह्याशिवाय एकही शब्द ऐकू येणार नाही— .

मी असे नाही म्हणत की ग्यानबाचा काही दोष नाही म्हणून. त्याने खुनाचा प्रयत्न केला—नव्हे तो खुनी असेल. आता दरोडेखोरीही केली असेल ! पण–पण–हे सारे करण्यापूर्वी त्याने शेवटच्या करुणार्त हाकेने समाजाच्या हृदयाला पाझर फोडण्याचा प्रयत्न केला. आणि त्याच्या आर्त हाकेला उत्तर काय मिळाले ? उपहास ! अपमान—! खोल दरीत घसरत जाण्यापूर्वी त्याने सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्याला लाथाडले गेले. आणि आता तो मेलेल्या नजरेने समाजाकडे पाहू लागला तर त्यात दोष कोणाचा ?

बाकी सागराच्या प्रचंड कल्लोळात दर लाटेबरोबर कितीतरी गाळ किनाऱ्यावर बाहेर टाकला जातो, पण त्याला त्याची कधी परवा वाटली आहे का ?

ग्यानबाला समाज हा शब्दसुद्धा कळत नाही, पण आजचे त्याचे उद्‌गार कंठरवाने काय सांगतात ? चार दिवसांपूर्वी ज्या समाजाची त्याने एवढी करुणा भाकली त्याच समाजाला लाथाडून तो आता समाजाचा शत्रू झाला आहे ! त्याने आपण होऊन तुरुंगवास पत्करला. ज्या स्वतंत्रतेची चारी खंडे मुक्तकंठाने स्तुतिस्तोत्रे गातात ती स्वतंत्रता आपल्या हाताने फेकून देऊन तो चोरी करून कैदीखान्यात येऊन दाखल झाला. यापेक्षा दुसरा पुरावा कशाला ? अजून त्याचे मन पूर्ण शिजून गेले नव्हते. आत थोडी घग होती,

म्हणूनच माझ्या सहानुभूतीने ते द्रवले व तो मला स्वतःची कहाणी सांगू लागला.

"बाई, मी काही जन्माने दरोडेखोर नाही. चांगल्या एका म्हराठ्याच्या कुळात माझा जन्म झालेला. थोडीफार घरची जमीन पण होती— पण ती गेली दुष्काळात, अन् रोजमुरा करू लागलो. पर अजून त्ये दिवसांची आठवण झाली की, वाटू लागतंया की ग्यानबा, अरं तू कुठं होतास अन् कुठं आलास ह्या नरकात! अरं तुला काय नव्हतं! अक्षी खुपसुरत घरधनीण होती! जवा का ती न्याहारी डोक्यावर ठेवून साऱ्या बायकांबरोबर टुमकत येई त्ये वेळेला मला कळतं की अरं, ही घरात नागीण र नागीण शिरली आहे, तर तवाच ठेचून काढली असती. पर झालं गेलं. आता काय त्येचं. पण तिचं नाही मला एवढं वाटत. एक गेली तर ग्येली, तिच्या उरावर छप्पन आणल्या असत्या! पर माझी येणू—माझी येणू मला कशी परत मिळेल?

"बाई, फार नाही बोलत, अशी नक्षत्रावाणी पोर होती. बामणाच्या पोरी तिच्यापुढे फिक्या पडायच्या! सांज झाली की तान्ह्या गाईवाणी मी घरी जावं. तिला जवळ घ्यावी, कुरवाळावं म्हणजे अक्षी दिवसाभराचा शीण हारपल्यासारखा वाटे. माझी येणू—तिलाबी लळा माझाच! अंगणात दिसलो की धावत येऊन गळ्याला मिठी घालायची. तिला उचलून घेतलं की आनंदानं आत कसंकसं उधाण येयाचं! खरोखरच त्ये दिवसात माझ्यापरस राजा बी सुखी नसंल.

"आणि बाई, तुम्हीच सांगा, अशी चिमणीवाणी माझी पोर आजारी पडली, लाहीसारखी तडफड करू लागली, तर कोण्या बापाला चैन पडंल? दहा दिवस झाले, डोळ्याला डोळा नाही; अशी मासळीवाणी तडफडे. देवी खेळवली, वैद्याला बोलावले, नवस केले, पर गूण नाही. लोकं म्हणू लागली अक्षी डाक्टरचा दवा करून पहा. तो डाक्टर दहा कोसावर. गेलो तिथं, त्याच्या पाया पडलो. न्हाईन्हाई त्या आराधना केल्या, पर त्यो

आपल्याच कामात. त्याला कशाला गरिबाची कीव येतीय्. रुपयं आण आणि मग माझ्याकडे ये; तोपर्यंत येऊ नकोस, हे त्याचे एक उत्तर. त्याच्या दाराशी धरणं धरून बसलो पर न्हाई आली त्याला कीव!

"जेथे दहा रुपयाचा कागुद वर्सांतून नाही नजरे पडायचा तेथं गरीबानं दहा रुपयं कुठून आणावं? नाविलाज झाला. घरी गावाला जायला निघालो पर तेथं तरी पैसे कोण देणार होतं? मला लई फिकीर पडली. आणि तवाच माझ्या दुर्दैवानं बघा, वाटंत फेरीवाला भेटला. आन खोटं न्हाई बोलत, जिवाला मोह पडला. पर बाई, एवढं बरीक सांगतो तुमच्या पायाला स्मरून, की त्यानं मला गोडीगुलाबीने पैसे दिले असते तर कवाच त्येच्या अंगावर हात टाकला नसता. त्येलाबी लई सांगितलं, त्येची आराधना केली. पाया पडलो. काय हवं ते कबूल केलं. खोटं नाही सांगत. त्यानंच कचेरीत सारं कबूल केलंन हे. बुकात सुद्धा लिवलाय तेथे—(मला त्याच्या सांगण्याचे हसू आले)—पर तो न्हाईच म्हणे. तुझ्याकडील आधीची रक्कम दे मग देतो–आणि त्येचं हे बोलणं ऐकून माझा राग लई अनावर झाला. डोस्क्यात अक्षी अंथरुनात पडलेली माझी पोर दिसू लागली. "बाबारं, मला बरं कर रे बाबा, बघ–रे" म्हणून तिचे शब्बुद ऐकू येऊ लागले. दुसरं मन बोले, अरं तुझ्याजवळ दहा रुपये कुठ ह्यायती–पैसे नाही मग कुठले पोरीचे प्राण! असं कोणी तरी आत बोलू लागलं. माझं मलाच भान राहिलं नाही–तेथल्या तेथे मारला फटका. नी त्यो काय, फटक्यासरशी बेसूध झाला. मला तर वाटलं मेलाच! एकदा बाटलं मारून टाकावा. पर येवढी सुद्ध होती कोणाला? त्यातून रस्ता रहदारीचा. कोणी यायचा! कमरेचा कसा काढून घेतला, त्याला दिला निवडुंगात टाकून नी पळालोच; पर असं पाप थोडंच लपून राह्यचं!

"थोडे दिवसानी त्यानं अक्षी मला कोडतात खेचलं. अब्रू गेली गावात. जो तो चोर चोर म्हणून छीःथू करू लागला. खून क्येला बोलू लागले, सा वर्षाची सजा बी झाली. पर माझी येणू बरी झाली येवढ्या आनंदातच मी सारं सारं गिळून टाकलं. आन कोठडीत जाऊन दडलो.

"बाई, पहिल्यानं वाटे, आज घरधनीण येणूला घेऊन येईल, उद्या

भेटायला घेऊन येईल, पर न्हाईच. एक दिस बी ती × × माझ्या पोरीला घेऊन न्हाई आली. लोकं समजूत घालीत. अरं ग्यानबा, येडा तर न्हवस तू? अरं तू कुठं, तुझं गाव कुठं, इतका गाडीचा प्रवास करून बाईमाणूस हतं कसं येईल? जरा श्येनपणा तर धरशील! काय करणार? आपला चूप बसून राहिलो. पर चैन पडेना. अक्षी एक एक दिवस नी रात मोजून काढली. जिवाला जरा ग्वाड वाटेना. येथं काय माणसानं राह्यचं काय! पर आपण केलं त्येचं फळ कोण दुसरं भोगणार? कसं तरी दिवस काढलं! केवढी कडक शिक्षा! केवढं काम! पर एक दिवस कधी बांधा नाही केला. मनाने इच्यार केला, ग्यानबा, केलंस तेवढं पुरं. पर आता करू नको.—एक दिवस वार्डाने येऊन सांगितलं, ग्यानबा, तुझी दोन म्हइनं शिक्षा कमी केलीय. मनात अक्षी अस्स बरं वाटलंय म्हणून सांगू! जणू सारं शेत फुलूनच आलंय. 'येणू, माझी येणू. आता भेटणार.' मनात बोललो. 'पोरी, तुझ्या बापाला वळखशील की न्हाई म्हणशील?'

"अख्खा दिवसरात चाललो सुटल्यावर. भाकर ग्वाड लागेना. काही सुचेना. अक्षी निघून आलो गावाला—गावाच्या शिवेशीबी आलो नी असं गाडीच्या बैलावाणी पाय घराकडं ओढ घेऊ लागलं. गावात शिरलो तो दिवेलागणीची वेळ झाली व्हती. कोणी बाया पाणी भरीत व्हत्या, कुठं पोरं आंगणात खेळत होती. पर त्येचं मला काय? तान्ह्या गाईच्या कासेला रग लागावी तसं माझं झालं व्हतं. त्येला आणखी पान्हा कशाला हवा. हकडं बघितलं न्हाई, तकडं बघितलं न्हाई, सरळ गोफणीच्या दगडावाणी भिरभिर घराकडे आलो. पर अंगणाशीच थबकलो! चार पोरंबाळं अंगणात कुत्र्याच्या पिल्लावाणी मस्त एकमेकाच्या अंगावर लोळत होती! घरातील घरधनीण चुलीपाशी करीत होती. सगळं कसं लई गोड दिसत होतं पर–पर–माझं न्हवं ये घर! चुकलो तर न्हाई! म्हणून एकदा खाणाखुणा नीट पटवून पाहिल्या. घर तर ह्येच! अक्षी धीर धरून इचारलं, "अरं येथं राधा म्हराठीण राहाती न्हवं"—घरातील बाई पुढं आली.

"राधा म्हराठीण—बाबा! येथे न्हाई राधा म्हराठीण."

"येथंच तर राहत व्हती. कुटं गेली बाई? सा वर्षापूर्वी येथंच तर

व्हती. तिला येणू येणू म्हणून एक चार वर्साची पोर व्हती बघा!''

''हा, हा ती व्हय—हात्तिच्या, ती तर कवाच गेली दुसरा नवरा करून—''

''बाई, अक्षी पाठीमागून येऊन कुणी उपट घातल्यावाणी मला झालं. मी तुरुंगात तिकडं कष्टात दिवस काढतोय आणि ही दुसरा नवरा करून गेली!

''अन् तिची पोर—''

''पोर तर कवाच मेली! त्येच्या बापास्नी ६ वर्षांची सजा झाली त्येच आखाडात तर प्वोर दगावली. असा पापाचा पैसा कुठं फळाला येतो व्हय!''

''बाई, तिचा सबूद तवा मी पुरा ऐकला बी न्हाई. सारं आभाळ माझ्यावर कोसळून पडलं, हातापायातला जीवच गेला. मी मटकन खाली बसलो, तिनं मला वळखलं नव्हतं. पर आता वळखलं.

''अरं तू तर ग्यानबा.''

''व्हय, होय मावशे, मी त्यो ग्यानबाच, पर तू कुठं वळखलंस—मी मनात म्हटलं!

''त्ये दिवसापासून असं डोकं भ्रमल्यावाणी झालं. कशावर जीवच लागेना. काही करावंसं बी वाटेना. अक्षी वेड्यावाणी गावभर भटक भटक भटकावं. मिळेल ते खावं. थकलं की निजावं. पाटलानं दोनदा बोलावूनबी सांगितलं, 'ग्यन्या, तू हजिरीबी देत नाहीस वेळेवर येऊन—भटकतोस. बघ, याद घरून राहा. नाही तर बघ!' सगेसोयरे बोलू लागले, ''तू असा गावभर भटकतोस नी गावात समद्यास्नी तुझी गोष्ट म्हाईत हाय. त्ये बोलतात नी आम्हास्नी कमीपणा येतो.''

''बाई, मी पर काय करणार? कितीक जागी काम शोधलं पर मला ठेवून कोण घेतो! कोणी म्हणे, अन्नावारी राहा, कोणी म्हणे काई, कोणी म्हणे काई, इतकं करून त्ये चांगली, अन् वाईट काय तो मी. शेतावर अक्षी धान्य कमी भरलं की बोलावं हा ग्याना आला ना! कुठं कोणाचं हरवलं की पाटलानं बोलवावं, हडसून खडसून विचारावं. जसा काही

जन्माचाच चोर व्हतो! त्येला ह्ये कळंना, अरं ज्यानं केल्या पापापायी पोरगी गमावली त्यो कशाला फिरून चोरी करील! अक्षी खरं सांगतो. बाई, मावशीचा त्यो शबुद या अंतरात खोदून ठेवला व्हता मी. अक्षी कोणाच्या सुतळीला बी हात लावला न्हाई. पण माझं कोण ऐकतो! शेतावर अक्षी गडी माणसानं चोऱ्या कराव्या आणि माझ्यावर घालावं. पर ते सच्चे, मी लुच्चा. जगात उलटा न्याव हाय. सापडला तर चोर न्हाई तर साव. आमच्या एका मामलतदाराच्या लेकानं एका बाईचा खून केला. अक्षी समद्या गावाला माहीत व्हतं! पर कोण बोलणार! सगळी गप्प. कायदा गरिबाचा काळ. शिरिमंतानी पैसे भरलं की कसा गप्प. बाई चोर झालो म्हणून काय मला मन न्हाई काय! त्येला सागावंसं वाटं, अरे त्येकानो तुमच्यासारखीच माझी कुळी ना. काय खरं खोटं कळत न्हाई व्हय....

"लई कायं सागूं, अगदी शनीच्या पोथीवाणी कथा.

"एकदा अक्षी पाटलाची पोर सजून दारात बसली व्हती. अक्षी गोड दिसत होती–मला माझ्या येणूचीच आठव झाली. हातात आंबा होता, म्या तिला दाखवला. पोर बिगी बिगी धावत आली. आंबा घेतला नी मला काय बुद्धी झाली पहा की, तिचा पापा घ्यावा! म्हटलं, माझी येणू असती तर तिनं पापा नसता का बापाला दिला! म्हणून पापा घ्यायला वर उचलली मात्र नी अशी तिने किंकाळी ठोकली की सारं घर धावून आलं. त्येना वाटलं, मी पोरीच्या दागिन्याकरताच पोरीला उचलली. आणि माझ्यावर त्यांनी जो गहजब केला म्हणून सांगू! मी लाख बोललो पण ऐकून घेतो कोण! बाई, माझ्या पोरीवाणी असणाऱ्या त्या लहान लेकराला का मी मारलं असतं? पर माझ्यावर विश्वास कोण ठेवतो! "चोर तो चोर आणि शिरजोर!" असंच साऱ्या लोकांना वाटलं. पाटील घरी आला. त्येला कळल्यावर तर रागानं लालच झाला. त्येच्या पायाची शपथ घेऊन सांगितलं. आईची शपथ घेतली, पर न्हाईच. चाबकाखाली त्यानं उभं फोडून काढलं, ते दोन दिवस आंग ठणकत व्हतं. तिसऱ्या दिवशी उठलो नी वैतागानं गाव सोडला. पर काय! दुसऱ्या गावी अक्षी शिपाई माझ्या मागोमागच. म्हनं गाव का सोडला–कुठं व्हतास–काय केलंस. चोर झाला

म्हून काय त्येच्या अंगाला लागत न्हाई की उराला बोल झोंबत न्हाई ! पण त्ये कोण लक्षात घेतं. असं एक ना दोन—जिथं दैवानंच दावा मांडला तिथं काय ! कोणी अक्षी मरुंबी देईना की जगू बी देईना.

"त्येथूनच पाटलाला सांगून आलो शहरात. येकानं सांगितलं की, येक बाबा तुरुंगातून सुटलेल्या लोकाना देतो नोकरी लावून. ग्येलो त्याचा पत्त्या काढीत. पर बाई, तेथंबी त्येच. त्ये बाबानं घरातच ठेवून घेतलं. दिवसभर अक्षी मरेपर्यंत काम करून घ्यावं, पर पोटभर अन्न सुद्धा देऊ नये. एक दिवस बोललो मालकिणीला. तिनं साह्यबाला काय सांगितलं कोणास माहीत. एका संध्याकाळी जवा का तो तर्र बनून आला आणि मला लाथाबुटाखाली बडव बडव बडवलं तवा अक्षी मनात निश्चय केला. आता बाहेर राह्यचं नाही. ग्यानबा, एकदा चोरी केलीस ना, दुसऱ्यांदा कर. अरं सापडली तर चोरी न्हाई तर हायच चंगळ. त्येका एवढा सारा छळ कशाचे पायी ! पर लगेच येणूची आठवण येई. देवानं मला शिक्षा क्येली–माझी बरी झालेली प्वोर काढून नेली–आता आणखी किती पापाचे रांजण भरशील?–चोरी करावीशी वाटेना. पर येकायेकाचं तोंड बी बघावंसं वाटेना. मनाचा धडा केला नी तस्सा तडक जेलर साहेबाकडे आलो. त्येच्या पाया पडलो. त्येच्या विनवण्या केल्या, साहेब, मला कैदेत ठेवून घ्या म्हणून. पर तो घेईना. त्येनं लाथाडलं. शिव्या दिल्या. सरकारनं काय अन्नछत्र उघडलं काय म्हणून बोलला. मग काय करू–गेलो बाहेर, घातला दरोडा, नी आलो येथं. सांगा बाई, येथं काय वाईट हाय ? निदान बाहेरच्यावाणी तरी न्हाई. येथे सारेच चोर ! बाहेर तसं न्हाई. लेकाचे चोर असतात, कसाब असतात. पर काय आणतात सावाचा अवतार. त्ये तरी येथं नाही."

त्याची हकीकत विलक्षण तर खरीच. असली उदाहरणे नेहमीच सापडतील असं नाही. पण त्याने मला कसे अस्वस्थ करून टाकले. जेलरने मला ही शेवटची हकीकत सांगितली होती, पण ती किती निराळ्या तऱ्हेने. आपल्या व्यवस्थेची तारीफ करताना पुरावा म्हणून त्याने सांगितले की सुटलेले कैदी इतके खूष असतात की परत तुरुंगात येऊ चाहतात ! • •

* * * * * * * * * * * * * *

दृश्य अकरावे

जुव्हेनाईल कोर्टात

* * * * * * * * * * * * * *

चला हे एक नवे खूळ पाहू या; याच भावनेने आम्ही सर्वजणी आज या कोर्टात पोचलो होतो.

वास्तविक नेहमीच्या कोर्टाप्रमाणे तेथले वातावरण पोलिसी दंडुक्याचे मुळीच नव्हते. तरी पण ते न्यायासन आहे आणि अपराधी म्हणून सापडलेली मुले त्या न्यायासनासमोर खेचली जातात ही जाणीव आम्हाला सुटत नव्हती.

कोर्टासमोर एक एक मुलगा येत होता. आम्ही बसलो होतो तेथल्या दाराच्या फटीतून दुसऱ्या एका खोलीत ज्यांची चवकशी व्हावयाची आहे अशी कमीत कमी वीस तीस मुले तरी दिसत होती. पलीकडल्या कोपऱ्यात काही मुली असाव्यात. पण त्या आम्हांला दिसत नव्हत्या. तरी दिसत असलेलीच संख्या काय कमी होती! एवढ्या कोवळ्या वयाची इतकी मुले कोणत्या ना कोणत्या अपराधावरून न्यायासनासमोर खेचली जातात, हे दृश्यच सुखी आयुष्याने स्थितप्रज्ञ बनलेल्या आमच्या मनाला धक्का द्यावयाला पुरेसे होते.

कोर्टासमोर केस आली की, त्या मुलाकडे आम्ही कुतूहलाने पाहत असू. फटीतून दिसत असलेल्या मुलांकडेही आम्ही किती वेळा नजर टाकली असेल. एखाद्या मुलाचा अपराध काय हे कोर्टाला समजावून देऊन जेव्हा त्याच्याविषयी पुकारा होई तेव्हा आत येणाऱ्या त्या वामन-मूर्तीकडे एखादी वस्तु जशी प्रत्येक कोपऱ्याने न्याहाळावी तशी त्याच्या बोलण्याचालण्यापासून प्रत्येक गोष्टीकडे आमची नजर वेधून राही. थोडक्यात म्हणजे खरोखर ही मुले आमच्यापैकीच आहेत का मानवजातीच्या दुसऱ्या कोणत्या प्रकारापैकी आहेत, हे आम्ही आमच्या मनाशीच न कळत

शोधून पाहत होतो. वास्तविक ती आमच्या मुलांच्यासारखीच मुले आहेत हे आम्ही जाणून होतो. पण त्यांच्यावर आलेला आरोप, त्यांचे कपडे, दैन्यावस्थेत वाढत असल्यामुळे जीवनकलहात अकालीच प्राप्त झालेली व्यवहारी नजर, झगडण्याकरता थोडासा कावेबाजपणा व उद्दामपणा—हे सारे पाहिले की आमच्यात त्यांना मिसळून घेण्याची तयारी होत नव्हती. समाजाच्या घाणीत वाढत असताही त्याने दबून न जाता पावसाळ्यात उकिरड्यावर उगवणाऱ्या हिरवळीप्रमाणे त्यातूनही जगण्याचा आनंद लुटण्याची टवटवी व हुशारी पाहिली की ती आम्हांला पाहवत नसे. तेथे परमेश्वर नसून सैतानच वावरतो आहे असे वाटे. याच दृष्टीने आम्ही त्यांच्याकडे पाहत होतो. इतक्यात एका चांगल्या पांढरपेशा वर्गातील मुलीचे नाव पुकारलेले मला ऐकू आले.

"अं, हे चांगले वरच्या वर्गातले आडनाव दिसते." मी हळूच शेजारच्या बाईजवळ उद्गारले.

"शांता, इकडे ये." वरच्या बाईनी हाक मारली व त्याबरोबर एक चांगली पांढरपेशा घराण्यातील दिसणारी १६–१७ वर्षांची मुलगी कोर्टासमोर येऊन उभी राहिली. त्या मुलीच्या न्यायासनासमोर येण्याने आमच्या कल्पनाना खरोखर चांगला जबरदस्त धक्का दिलेला होता. आतापर्यंत ही मुले अपराधी असली तरी आमच्यापैकी नव्हती म्हणून त्यांना त्यांच्या तऱ्हेने पहावयास आम्ही तयार होतो. पण आता तसे नव्हते.

ही पोरगी आम्ही बाजूला ढकलून काढू शकत नव्हतो. तिचा चेहरा, तिची राहणी, बोलणे, नवे पातळ, कानातील कुडी, बांगड्या, फार काय, केसांचे वळण सुद्धा ती आमच्यापैकीच एक आहे असे स्पष्ट सांगत होते. आणि इतके असूनही अपराधी मनाची लाज तिच्या नजरेत दिसत नव्हती. दोषी असताना चेहेऱ्यावरचा शिरजोरपणा बाकीच्या मुलांना शोभला. तीं तसलीच होतीं. पण...

न्यायाधीशाचा निकाल लागण्यापूर्वीच आम्ही तिला दोषी ठरवले.

हो, दोषी नसती तर तेथे का येती? काही तरी काळेबेरे असलेच पाहिजे—

"एका माणसाबरोबर घरातून पळून जात असताना पोलिसानी तिला पकडले—" वरून खाली माहिती येऊ लागली.

"दोषी!" असा आमचा तिच्यावरचा निर्णय आमच्या मनात ठरून गेला.

"इकडे तोंडावरची माशी सुद्धा जोराने मारून उडवणार नाही पण पाहावे तो धाडस कोण!" एकजण कुजबुजली.

"बहकली असेल कादंबऱ्या नाटके वाचून." दुसरीने साथ केली. वास्तविक तिच्यात विशेष असे काही नव्हते. पांढरपेशा वर्गातील चार-चौबींपेक्षा काही ती खास निराळी नव्हती. पण कोर्टासमोर आलेली आणि तीही एका दुसऱ्या जातीच्या माणसाबरोबर पळून जाताना—

आमची मने तिच्याविषयी वाटेल ते ऐकायला व त्यावर विश्वास ठेवायला अगदी पूर्ण तयार होती. घरातून मुलगी पळून जाते आणि ती सुद्धा इतर जातीच्या माणसाबरोबर—! मुलीच्या गैरवागणुकीचा यापेक्षा सबळ पुरावा तो कोणता असायला पाहिजे!

"शांताबाई, तुम्ही त्या इसमाबरोबर मुंबईला पळून येण्यापूर्वी मध्यंतरी त्याच्याजवळ कोठे राहिला होता काय?"

"नाही. आम्ही परवा घरून निघालो तशी तडक मुंबईलाच आलो. मी तर रात्री घरूनच स्टेशनवर टांगा करून आले आणि तेथून आम्ही निघालो."

"हां, पण घर का सोडले?"

"बाबा यांच्याशी मला लग्न करू देत नव्हते म्हणून!"

"लग्न करून देत नव्हते–ते का?"

"मला एक श्रीमंत, पैसे देणारे स्थळ सांगून आले होते. बाबांना पैशाची नेहमी अडचण असते, तेव्हा बाबांनी मला तेथे द्यायचे ठरवले."

"हां. पण तुमची यांची येवढी ओळख होती हे तुमच्या बापाला माहीत होते की नाही?"

"माहीत कसे नसेल? प्रथम तर मी यांच्याशी बोलत सुद्धा नसे, पण हेच घरी यायचे तेव्हा बाबा मला 'यांचा तुझ्यावर फार लोभ आहे' असे सांगत, चहा द्यायला सांगत."

"पुढे–"

"पुढे मला सुद्धा खरोखर त्यांच्याविषयी वाटू लागले."

"पण हे बाप जाणत होता?"

"का नसेल? बाबा तर कित्येक वेळा मला चिडवीत सुद्धा असत. 'जा तुझ्या घरून पैसे आण' म्हणून मला त्यांच्याकडून पैसे आणायला सुद्धा सांगत."

"ते का–?"

"बाबांचा पगार थोडा आणि आम्ही घरात भावंडे पुष्कळ. शिवाय आई, आत्याबाई. बाबांना नेहमीच पैशाची अडचण म्हणून ते सांगत."

"पण हे गृहस्थ तू मागितले की पैसे देत?"

"का नाही देणार? त्यांचे माझ्यावर खरे खरे प्रेम होते."

"बरं. जेव्हा तुम्ही घरून निघाला तेव्हा त्यांनी तुम्हाला 'आपण लगीन करू, मी दागिने देईन,' वगैरे कबूल केले?"

"लग्न करायचे आम्हा दोघांचे ठरलेच होते म्हणून तर घरातून निघालो."

"त्यांनी दागिन्यांचे काही नाही तुला सांगितले?"

आतापावेतो गरीबपणे खाली मान घालून उत्तरे देणाऱ्या शांतीचा चेहरा वर झाला. कोर्टाचा रोख ओळखून गंभीर मुद्रेने ती बोलू लागली,

"महाराज, त्यांनी मला दागिन्यांचे आमिष लावून पळवून आणलेली नाही. माझे खरोखर त्यांच्यावर प्रेम आहे म्हणून मी त्यांच्याबरोबर आले. आम्ही दोघे लग्न करणार आहोत."

आम्ही एकदम तिच्या धिटाईने आश्चर्यचकित झालो. अगदीच साधी पोरगी नाही—आहे तिच्यात काही तरी.

"पण हा गृहस्थ तुमच्या जातीचा, गोताचा नाही, याच्याशी तुम्ही लग्न करणार?"

"हो–मला लग्न करायचे तर ह्यांच्याशी, नाही तर करायचे नाही."

"तुमचा इतका निश्चय तुमच्या बापाला माहीत होता?"

"का नव्हता?" रागावून पण रुद्ध झालेल्या आवाजाने तिने प्रश्न

केला. "बाबांनी मला दुसऱ्या स्थळी द्यावयाचे ठरवले तेव्हा मी बाबांना स्पष्ट स्पष्ट सांगितले, विनवणी केली, पाय धरले. मला यांच्याशी इतकी कशाला ओळख वाढवू दिलीत—आणि आता नाही म्हणता—? पण त्यांचा आपला एकच हट्ट. ते काही केल्या ऐकेनातच. साहेब, सांगा, अशा वेळी मला धरून पळून जाण्याखेरीज काय इलाज होता? तुम्हीच सांगा, ज्याला एकदा कायावाचामनेकरून वरले त्याला सोडून दुसऱ्याशी लग्न करण्यात पाप नाही का होत?"

सात्विक संतापाने अगदी आतून उसळून येऊन ती बोलत होती. तिच्या त्या आवेशाने विस्मित होऊन आम्ही तिच्याकडे पाहतच राहिलो. तिचा अपराध काय, हे सुद्धा क्षणभर विसरलो. जिवंतपणाचा प्रभावच असा आहे. घाटातून खळाळत येणारे पाणी पाहिले की नकळत दृष्टी खिळून राहते. सहज भावनांचा असा जातिवंत उद्रेक दिसून आला की तो कोठेही असो, मनाला खेचून धरल्याखेरीज राहत नाही.

पण तिच्या शेवटच्या प्रश्नाने मात्र आम्हाला डंवचून चांगलेच जागे केले. लहानपणापासून पढलेल्या सीता सावित्रीच्या साऱ्या गोष्टी आठवू लागल्या.

अनुभवी खरी, पण या पोरीला दोषी कसे म्हणावयाचे? मनात विचार-तरंग उठू लागले.

"तिचे त्या माणसावर खरे खरे प्रेम आहे." एकजण कुजबुजली. आणि या तऱ्हेचे प्रेम करायलाच नाही का आमच्या कथा पुराणे–आमचे आदर्श–शिकवीत?

"भाबडी पोर!" दुसरी उद्गारली.

"वेडे पोरी, तू म्हणतेस ते अगदी खरे. पण जगाच्या दृष्टीने आज घरातून पळून जाणे शतपाप आहे." माझ्या मनात विचार येऊ लागले.

"तू म्हणशील, 'माझे शुद्ध प्रेम'—पण हे तुझे मन आज कोणाला कळणार आहे आणि त्याची कहाणी कोणाला ऐकत बसायला वेळ आहे? तुझ्या ओळखीच्या किंवा बिन ओळखीच्या लोकांत तुझी किंमत काय आहे? पळून गेलेली—एका दुसऱ्या जातीच्या इसमाबरोबर पळून गेलेली

बदफैली पोरगी. त्या संबंधात, हे असे कसे झाले याचा विचार करण्याची समाजाला जरूरी वाटत नाही. चूक झाली—चूक आहे की नाही हे सुद्धा पाहत बसण्याची समाजाला परवा नाही. जगाला तुझ्या शुद्ध मनाची पर्वा नाही, नव्हे, असे तुझे मन आहे हे ते ओळखीतच नाही. ते घरातून पळून गेलेली दुर्वर्तनी मुलगी म्हणून तुझ्याकडे पाहत आहे आणि तू जिवंत असेपर्यंत पाहात राहणार.

१५ मिनिटांपूर्वी आम्ही सुद्धा तुझ्याकडे तसेच पाहत नव्हतो काय? मला आता स्पष्ट दिसते आहे की तू दुर्वर्तनी नाहीस—वाईट नाहीसच नाहीस. खरी सद्वर्तनी आहेस. आणि तशी आहेस म्हणूनच पळून जाण्याचा गुन्हा तूं केलास. पण लोकांना फक्त तेवढेच दिसते.—

कोर्टाचे प्रश्न विचारणे चालू होतेच.

"पुढल्या खेपेला त्यांच्या जन्माचे सर्टिफिकेट सादर करावयाला सांगा, तोपर्यंत राहतील त्या आश्रमात—

"राहाल ना शांताबाई? काही भिऊ नका. तेथे सर्व चांगले आहे." कठोर म्हणविणाऱ्या कोर्टाने आश्वासन दिले व केस पुढे ढकलली. शांता परत आल्या जागी गेली. नवीन केस सुरू झाली.

आम्ही तेथे बसल्या बसल्या एका मागोमाग एक एक येणाऱ्या अपराधी मुलांचे निरीक्षण करू लागलो.

हा रतन चोरीच्या आरोपावरून पकडला गेला. याने दुकानातल्या दोन लेमनच्या बाटल्या लांबवल्या.

हा दशरथ एकाची चड्डी कुडते घेऊन पळाला.

रामीने चुलत्याचे पाकीट लांबवले व ती घरापासून दूर कोठेतरी भटकत असलेली सापडली.

महादू—आतापासूनच मवाली लोकांची संगत धरून त्यांचे अनुकरण करू लागला होता.

एक ना दोन, अशासारख्या किती तरी गोष्टी पुढे येत होत्या. त्या मुलांच्या गुन्ह्याबद्दल ऐकू लागले की कीव उत्पन्न होई. कोठे चड्डी तर कोठे पाकीट, कोठे सायकल तर कोठे आणखी काही. काय बिचारी! पण

'काय बिचारी' हे म्हणत असता त्यांच्या चेहऱ्यावर आपण काही वाईट केले आहे असा भंग सुद्धा नाही, हे पाहून मात्र मन जरा भांबावून जाई, काही नाही, तसलीच पोरे ही. होऊ द्या थोडीशी शिक्षा, येतील वठणीवर, असेही मनात आल्यावाचून राहत नसे.

पण दोन चारदा कोर्टात गेल्यावर मात्र ही वृत्ती पालटू लागली. कित्येक वेळा म्हणतात ते खरे आहे. स्वतःला थोडी फार आंच लागलेली असल्याशिवाय, मनुष्याला दुःखाची कल्पना येऊन जी खरी सहानुभूती उत्पन्न होते, ती होऊ शकत नाही. आणि एखादे वेळी झालेली दिसली तरी तिचे स्वरूप इतके मामुली, वरवरचे असते की त्या सहानुभूतीमुळे हसावे की रडावे तेच कळत नाही. अशा मामुली सहानुभूतीने 'भाकरी मिळत नाही तर पोळी का खात नाही' असा प्रश्न विचारला जातो. असल्या कोरड्या सहानुभूतीनेच कोर्टासमोर येणाऱ्या एवढ्या एवढ्या कोवळ्या पोरांनी असे आडमार्गास कसे प्रवृत्त व्हावे याचे आश्चर्य वाटते. प्रतिकूल परिस्थितीतही बेधडकपणे वागण्याचा त्यांचा अट्टाहास बेशरमपणाचा—बेफामपणाचा—वाटतो. पण शांतासारखे स्वतःच्या जवळ असणारे, आपल्याला पूर्णपणे आकलन करता येण्याजोगे, एकादे उदाहरण पाहिले की मात्र मन जागे होऊन विचार करू लागते.

शांताच्या पळून जाण्यात चूक घडली हे तर खरे. समजा, उद्या त्या माणसाने तिला फसविले आणि लग्न केले नाही, असे झाले तर? (अशी उदाहरणे जगात काही अगदी बोटावर मोजण्याजोगी नाहीत.) पण ही चूक खरोखर वाटते एवढी चूक आहे का? तिने इतकी अखेरची उडी घेण्याइतकी सबळ कारणे घडली नव्हती का?

पाण्याचा ओघ सरळ वाहू दिला तर नीट सरळ मार्गाने खाली जातो; पण त्याला चोहोकडून आडवून पहा. निसर्गनियमांच्या विरुद्ध जाऊन तेच पाणी शेकडो फूट उंच उंच धरणावरून बेफाम उड्या टाकीत वाहू लागेल. माणसाच्या मनाचे सुद्धा असेच नाही का? ज्याला आपण गैर-दोषी-असे म्हणतो त्याचा सुद्धा उगम अशाच अडचणीच्या प्रतिकूल परिस्थितीत होत नसेल कशावरून?

या कोर्टात दिवसानुदिवस बसून जी मी उदाहरणे पहाते त्यामुळे तर गैर–व दोषी–यांच्याकडे बघण्याचा माझा दृष्टिकोणच पालटतो आहे की काय असे मला वाटू लागले आहे.

परवा कोर्टासमोर एक दहा बारा वर्षांचा मुलगा खुनाच्या आरोपावरून आला.

वास्तविक आतापर्यंत येणारी बरीचशी मुले चोरी करण्याच्या, पळून जाण्याच्या किंवा मवाली लोकांची संगत धरण्याच्या अशा आरोपावरून तेथे आलेली होती. इतक्या भयंकर आरोपावरून आलेले असे हे माझ्या देखत तरी पहिलेच उदाहरण होते. पण त्यामुळे असल्या कोर्टाच्या उपयुक्ततेची मला जितकी तेव्हा खात्री पटली तितकी केव्हाच पटली नव्हती. मला वाटते, कित्येक वेळा अशा उदाहरणांनीच आपण जितके खटकन जागे होतो तितके साध्या मामुली गोष्टीनी होऊ शकत नाही. चोरी, चहाडी, मवालीपण इत्यादी गोष्टी नेहमीच्या पाहण्यातल्या व ऐकण्यातल्या असल्याने विचारशक्तीला तितके बोंचून जागे करीत नाहीत. पण असे एखादे अतिरिक्त उदाहरण आले की मात्र तंद्रीत असलेले मन खाडकन जागे होते व विचार करू लागते.

या एवढ्याशा पोराने एका माणसाचा खून केला! त्याची केस आल्या-बरोबर द्रुतगतीने बातमी पसरू लागली. कुतूहलयुक्त आश्चर्याने आम्ही अधिक ऐकू लागलो. त्याच्या केसविषयी अधिक शोधन करणाऱ्या गृहस्थानी आपली माहिती दिली. त्याची आई होती, पण बापाचा पत्ता नव्हता. त्याला सगळी मुले एकत्र जमली की तुझ्या बापाचे नाव काय, बापाचे नाव काय, म्हणून नेहमी भंडावीत. त्या दिवशी पोरांनी तसेच भंडावून सोडले. इतकेच नव्हे, तर बालवयानुसार अचकट विचकट बोलण्यास प्रारंभ केला. आणि थोड्याच वेळात आतापर्यंत रडत, शिव्या देत, प्रतिकार करीत असलेले ते कोवळे पोर संचार झाल्यासारखे थरथरू लागले. कर्मधर्मसंयोग. त्याला तेथेच एक सुरा पडलेला दिसला. तो घेऊन तो परजू लागला. एवढ्यात

त्याचा आवेश पाहून एका मोठ्या इसमाने फिरून त्याला बापावरून शिवी हासडून, 'रंडकीचा तर लेक आणि दिमाख किती' इतके म्हटल्याचे मात्र निमित्त झाले. त्याने सुरा फेकलाच ताबडतोब—त्याच्या अंगावर.

भलत्याच नाजूक ठिकाणी सुरा खुपसला गेल्या कारणाने तो इसम मरण पावला. त्या मुलाच्या हातून खून झाला.

थोड्या वेळाने नावाचा पुकारा होऊन आम्ही समोर पाहिले तो आमच्याचपुढे अगदी फाटक्या अंगाची, लुकडी, अस्थिर वृत्तीची एक लहानशी बटुमूर्ति उभी होती. आपण केवढा भयंकर गुन्हा केला आहे, याची जाणीव सुद्धा त्याला नसावी असे दिसले. आपल्याला बापावरून असे का बोलावे अशा रीतीने स्वतःच्या बावचळलेल्या मनोवृत्तीचेच त्याचे समर्थन चालू होते.

काहीही म्हटले तरी अखेर, मनुष्य बेफान झाला, त्याच्या मनाचा तोल सुटला, की अजाणतेपणी सुद्धा तो काय करायला उद्युक्त होतो, याचे एक नमुनेदार उदाहरण येथे आमच्या समोर होते.

शरीरात रोगबीज शिरले की दुखणे येते.

माणसाच्या मनात रोगबीज शिरले की त्याचा तोल जाऊन ते गैर वागू लागते.—

पण ही जाणीव आपण कितीशी बाळगतो?

देवी आल्या, टायफाइड इत्यादी दुखणी आली, म्हणजे काही आपण त्या माणसाला टाकून देत नाही. त्याच्या दुखण्याचे निदान करून कारण शोधून ते नाहीसे करण्याचा प्रयत्न करतो. पण मनाच्या बाबतीत–? अजून ही दृष्टी यावयाची आहे.

मानवी मनाचे द्रष्टे 'ला मिझराब्ल'सारख्या कादंबऱ्यांतून अट्टाहासाने ओरडून सांगताहेत की शिक्षा हेच काही गुन्ह्याला एकमेव दिलेले उत्तर नव्हे. गुन्हेगारी कमी करायची असेल तर माणुसकीने पाहावयाला शिकावयास पाहिजे.

एक वेळ मोठ्या माणसांच्या बाबतीत सोडा, पण लहान लहान मुलांच्या बाबतीत हे किती खरे आहे!

ज्या कोवळ्या वयात जगातील अंधाराचे-पापाचे-नाव सुद्धा माहीत नसावे, त्या वयात ही मुले कशी तेथे येऊन पडतात ? त्यांचा तोल कसा सुटतो ? याचे उत्तर पाहिजे असेल तर वास्तविक चोहोकडे म्युनिसिपाल-टीच्या दवाखान्याप्रमाणे मनाचे दुखणे ओळखून ते बरे करण्याचे दवाखाने उघडले पाहिजेत. असल्या रोगांची कारणे हटवणारी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. पण तोपर्यंत...?

तोपर्यंत लहान मुलांची मने खरोखर समजून घेऊन एखाद्या बापाप्रमाणे त्यांना वळण लावण्यास उद्युक्त झालेली ज्युव्हेनाईल कोर्टे निघाली तरी पुष्कळ. त्यामुळे निदान आजच्या आजच या कोवळ्या जीवांवर गुन्हेगारीचा -गैरवर्तणुकीचा—शिक्का बसून तीं फुकट तरी जाणार नाहीत.

• • •

* * * * * * * * * * * * * *

दृश्य बारावे

पीर महंमदाचा उद्योग

* * * * * * * * * * * * * *

"ते काही नाही. गावात रोग आला की कित्येक वेळा काही काही लोकांना तो रोग स्वतःला झाला नसताही झाल्याची भावना होऊ लागते, तसेच या बाबतीत आहे." मी आवेशाने उद्‌गारले.

"पाश्चात्य देशातले काही वाचले की जणू काय ते सुधारणेचे एक गमकच होऊन बसते व ते ते सर्व आपल्यातही आहे, निदान असावे, अशी काही लोकांची भावना होऊ लागते व ते उगाच नसती हुल्लड उठवतात. मला नाही वाटत आपल्याकडे पोरे पकडून त्यांना गुन्हेगार करण्याची –'ऑलिव्हर ट्विस्ट'मध्ये वर्णन केल्यासारखी–कृत्ये चालत असतील म्हणून. तसले प्रकार तिकडले तिकडे. आपल्याकडे ते आहेत अशी कल्पना करून बाऊ करण्यात काय हशील आहे?"

माझा जोरदार हल्ला ऐकून माझ्या बरोबरचे गृहस्थ नुसते हसले मात्र, व थोड्या वेळाने मान हलवून हळूच उद्‌गारले,

"तसं होत असेल, नाही असं नाही. पण या बाबतीत मात्र, तसं आपल्याकडे नाही, हे कबूल करण्यास मी मुळीच तयार नाही.

"ऑलिव्हर ट्विस्ट मधील वर्णनाना कदाचित् भडक रंग दिलेला आहे असे तुम्हांला वाटत असेल, पण तो तेवढा सोडला तर असे प्रकार येथे आहेत—एवढेच काय, या मुंबईत तुमच्या डोळ्यांदेखत चालत आहेत. फक्त त्यांचे तुम्हाला ज्ञान नाही एवढेच.

"मी उगीच नाही बोलत. आज दहा वर्षे मी सतत काम करतो आहे. आणि माझा सुद्धा विश्वास बसला नसता—पण अनुभवानेच माझी या बाबतीत खात्री करून दिलेली आहे.

"कालच आम्ही पीर महंमद नावाच्या मनुष्याला दोन वर्षांची शिक्षा दिली आणि त्याचा उद्योग काय होता असे तुम्हाला वाटते? मी सांगून खरे नाही वाटावयाचे; प्रत्यक्षच पाहा."

असे म्हणून त्यांनी पीर महंमदाची स्वतः तयार केलेली संशोधनपत्रिका माझ्यापुढे टाकली.

एका पाठोपाठ एक एक पाने चाळू लागले. मी नेहमी पाहत असलेला तोच 'महंमदअल्ली रोड.' त्या रस्त्याने मी हजारो वेळा गेले असेन, पण तेथल्या चित्रविचित्र मालानी भरलेल्या मोठ्या दुकानांशिवाय माझी नजर फारशी कोठेच गेली नाही. पण आज हे कागद वाचीत असता किती निराळ्या रूपाने तोच रस्ता माझ्यापुढे उभा राहात होता. त्याच रस्त्यावरची ही फारशी चटकन् न दिसणारी पोलिस चौकी व त्याच्या जवळची मशीद व विहीर. हे सर्व या आडमार्गातल्या रहस्यपूर्ण कथानकाचे बालेकिल्ले असतील असे मला कधी वाटले सुद्धा नसते. नार्थब्रूक गार्डन्स! बकाली वस्तीतून जात असताही गर्दीच्या ठिकाणी दुर्मिळ असणाऱ्या त्या झिरवळीच्या उघड्या मैदानाकडे मी क्षणभर नजर टाकल्यावाचून राहिले नसेन. तेथे अष्टौप्रहर बसत असलेले बकाली लोक मी पाहिले आहेत. पण तेथली लहान मुले मी कधी लक्ष्यात घेतली नाहीत. कधी दिसली असली तरी असतील बिचारी घरात जागा नाही म्हणून खेळायला आलेली, असे म्हणून त्यांच्याकडे डोळेझाकच केली असेल. पण तीच नार्थब्रूक गार्डन, महालक्ष्मीच्या खालचा पूल, कारनॅक ब्रिजच्या खालील जागा, ही सर्व ठिकाणे या दृष्टीआडच्या सृष्टीत इतकी महत्त्वाची ठाणी असतील याची मला बिलकूल कल्पना नव्हती!

ती पाने वाचता वाचता आजवर डोळे उघडून पाहात असूनही न दिसलेली मुंबई मी आज पाहते की काय असे मला वाटू लागले.

या मुंबईचे निर्माते टाटांसारखे धनाढ्य कल्पक नव्हते. मोठे मोठे नावाजलेले शिल्पशास्त्रज्ञ, दानशूर गिरणी मालक किंवा व्यापारी यांपैकी कोणीच नव्हते. तर कित्येक पोरांचे पोशिंदे पीर महंमदासारखे अभिजात कंगाल वीर होते. मला माहीत आहे की इतक्या पोरांचे पोशिंदे म्हणून

त्यांना कोणी दुवा देणार नाही, की त्यांच्या कल्पकतेची वाखाणणीही करणार नाही. त्यांच्यातील एकंदर विधायक कर्तृत्वाची देखील कोणालाच दखल असणार नाही. पण काहीही असले तरी हे सगळे गुण मात्र तेथे स्पष्ट दिसून येत होते यात शंकाच नाही. फक्त फरक एवढाच की, त्यांचा हा पराक्रम उजळ माथ्याने भर प्रकाशात वावरणाऱ्या लोकांकरिता नव्हता. काळोख्या जगालाच त्याची माहिती होती. पण तीही काही कमी मनोरंजक नव्हती.

ते कागद वाचल्यावर मला तर पीर महंमदाला पाहण्याची खरोखर उत्सुकता उत्पन्न झाली व प्रयत्न करून मी एकदा त्याला मुद्दाम पाह्यला सुद्धा गेले.

खरोखर वरवर पाहाणाराला त्याच्यात विशेष असे काहीच दिसले नसते. एवढेच नव्हे, तर तसे जाणवण्याजोगे व्यक्तिवैशिष्ट्य सुद्धा त्याच्यात नव्हते. त्याच्या फाटक्या अंगकाठीमुळे आधी तो कोणाच्याच नजरेत भरत नसे. त्यातही काळा वर्ण, मळके कपडे व बावळट चेहरेपट्टी यामुळे तर 'तो एक आहे साधा माणूस' असे म्हणून नजरेतून पारच सुटत असे. पण एकदा का तुमच्याशी तो बोलू लागला व बोलताना कधी त्याने वर नजर केली, तर मात्र त्याच्या कावेबाज डोळ्यांतील पक्के पाणी सहज दिसून येई. दोन वर्षे कशाला, दोन वर्षे नाही—आणखी कितीक वर्षे शिक्षा झाली तरी तो काय आपल्या कृत्याचा खरा थांग लागू देणार आहे काय!

पण ही अशी वरच्या जगाला बावळट भेदरट वाटणारी मूर्तीच या दृष्टीआडच्या सृष्टीतली बुद्धिमान व कल्पक नेती होती यात संशयच नाही.

वास्तविक त्याच्या जवळ काय होते? राहायला घर नाही, खायला पोटाचा धंदा नाही. पण इतके असूनही त्याने आपल्या चलाख मेंदूने आपले जग निर्माण केले; स्वतःची तरतूद केली; इतकेच नव्हे, तर जवळच्या पोलिस चौकीवरच्या पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकून आणखी किती तरी मुलांचा तो पोशिंदा बनला. त्यांना त्याने पोटाचा मार्ग दाखवून दिला. आणि हे सर्व सुद्धा किती शिताफीने! वास्तविक दिव्याखाली अंधार या म्हणीचा फायदा घेऊन त्याने आपले जाळे आज किती तरी वर्षे प्रत्यक्ष पोलिस

चौकीपाशी विणले होते. तेथे बसून तो आपली सावजे हेरीत असे. पण कधी तो कुणाला सापडला होता का? मुद्दाम होऊन हे गृहस्थ त्याच्या पाठीस लागलेच नसते तर अजूनही त्याच्या या कारभाराचा सुगावा कोणाला लागला असता काय?

"बाबा पैसा द्या ना" म्हणून हात पुढे करून दीनवाणीने पैसा मागणाऱ्या बालकाला पैसा देताना याचा 'बोलविता धनी वेगळाची' आहे, अशी कधी कोणाच्या मनाला पूर्वी शंका शिवली होती काय? गरीब बिचारे पोर! खायला नाही, काय करणार! मागते झाले भिक्षा! असेच तुम्हाला नेहमी वाटत आले. त्याच्या लोचटपणाचा कितीही राग आला तरी ते सारे नाइलाज म्हणून आहे असे वाटून अखेर दयार्द्र नजरेनेच तुम्ही त्याच्याकडे पाहू लागता. पण या तुमच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन त्यावर कोणी व्यापार करीत असेल असे बधी तुमच्या मनाला स्वप्नात तरी शिवून गेले आहे काय? निदान मला तरी असली शंका सुद्धा कधी काळी आली नाही.

पण ते कागद वाचीत असता, नुसती शंका नव्हे, प्रत्यक्षाचा पुरावा मी पाहत होते–वाचीत होते. तुमच्या दयार्द्र बुद्धीचा, लहान लहान कोवळ्या अर्भकांविषयी वसत असलेल्या सहज ओलाव्याचा फायदा घेण्यासाठी जागोजाग विणलेल्या जाळ्यांची मी प्रत्यक्ष माहिती वाचीत होते.

पीर महंमदाजवळ निदान त्या गृहस्थांना सुगावा लागलेली अशी वीस पंचवीस तरी पोरे होती—निदान एवढ्यांची तरी माहिती त्यांना पक्की मिळालेली होती. मग ज्यांची माहिती मिळाली नाही अशी किती होती कोण जाणे!

ह्या सर्वांना तो शहराच्या निरनिराळ्या भागात अशा शिताफीने पसरून ठेवी, की महंमदअल्ली रोडवर एक मशीद व पोलिस चौकी यांच्या मध्ये असलेल्या एका विहिरीजवळ अगदी साळसूदपणे बसणाऱ्या एखाद्या गरीब इसमाचा आणि त्यांचा काही संबंध आहे अशी शंका सुद्धा येऊ नये.

साऱ्यांनी दिवसभर किंवा रात्रभर–हे वयावर अवलंबून असे–केलेल्या कामाचा गल्ला गोळा करून याच्याजवळ आणून द्यायचा, की झाले त्यांचे

काम. मग हा त्यांची सोय करतोच आहे. खायला पाव रोटी व चहा, रात्री निजायला नार्थब्रूक गार्डन, चौपाटी, फूटपाथ, अथवा पुलाखालची कोणतीही आडसंधीची जागा. आणखी काय पाहिजे ? आणि इतके मिळत असल्यावर पोलिसांच्या सदैव धाकात व याच्या करड्या शिस्तीत वाढत असलेली मुले तरी आणखी काय मागणार ? शिवाय तो त्या पोरांना पोटाचा सुलभ मार्ग दाखवीत नव्हता काय ? त्यात कोठेच आडोसा, काळेबेरे नव्हते. निजण्यापासून मालक व मुले यांचे सारे व्यवहार पूर्ण उघड्यावर होते. पण इतक्यातही शिस्त आणि स्वतंत्रता याचे हृदयंगम मिश्रण म्हणतात ते जसे या ठिकाणी पाहावयास मिळत होते, तसे इतर कोठे दिसणे शक्य तरी आहे काय ?

काळजी करू नका; तो फक्त त्यांना काही भिक्षाच मागावयाला शिकवीत होता अशातला प्रकार नाही. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात जितक्या सर्व तऱ्हेने आपले ईप्सित साध्य करून घेणे शक्य आहे, तेवढे सारे मार्ग तो आपल्या मुलांना दाखवीत असे. आपल्या धंद्याची त्याने खरोखर शिक्षणसंस्थाच चालविली होती असे म्हणण्यास हरकत नाही. कान, नाक, डोळे उघडे ठेऊन आल्या संधीचा कौशल्यपूर्ण हातचलाखीने कसा फायदा घ्यावा याचे आपल्या विद्यार्थ्यांना तो संपूर्ण शिक्षण देत होता. नाना सोंगे धारण करणाऱ्या बहुरूप्याप्रमाणे त्याचे विद्यार्थी, वेळी तुमच्यापुढे अगदी दीन वाणीने पाझर फुटेल अशा आवाजात रडून पैसा मागतील, तर कधी तुमचे लक्ष नाही असे पाहून तुमचे पाकीट लांबवितील; वेळेनुसार तुमच्या घराची खिडकी उघडी राहिली असल्यास तुमच्या काही वस्तूंचा भार कमी करण्यासही त्यांना संकोच वाटणार नाही. पुढे दिसेल ती संधी घेऊन हाती येणारी वस्तू हातोहात कशी लांबवावी व फिरून आळ घेतलाच तर कपडे झाडून आपला खरेपणा सिद्ध करायला तयार अशी सची वृत्ती कशी दाखवावी, अशा प्रकारच्या सर्व कसबात तो आपल्या मुलांना खरोखरच वाकबगार करीत असे. पण इतके असून पीर महंमद कधी सापडला जाईल ? नाव कशाला काढता !

एक सातआठ वर्षांचे पोर एका घराच्या उघड्या खिडकीतून शिरून

वस्तू उचलताना सापडले, लहानच असल्यामुळे त्याने आपला पोशिंदा म्हणून पीर महंमदाकडे बोट केले. पीर महंमद साऱ्या आयुष्यात पहिल्यांदा कोर्टापुढे खेचला गेला. पण तो त्या पोराच्या सांगण्याला थोडाच भीक घालणार होता ? 'मला हा पोरगा माहीत सुद्धा नाही. रस्त्याने हा वणवण उचाशी भटकत असताना मी त्याला पाहिलं. मुसलमानाचा समजून चहापाणी दिले. जरा जवळ केले. पण मला काय माहीत, असे मवाली कारटे असेल म्हणून ? त्यावर जरा दया केली तर माझ्याशी संबंध चिकटवतो आहे. वास्तविक आपण याला ओळखीत सुद्धा नाही.' पीर महंमदाने चक्क सांगितले.

सापडले तर मूल सापडेल. त्याच्या वयाकडे पाहून त्याला कोण शिक्षा देणार ? फार तर ठेवतील लहान मुलांच्या तुरुंगशाळेत ! पण जर चोरी यशस्वी झाली तर–! खास गड्डा मिळेल.

थोडीशी जरब देऊन कोर्टाने पीर महंमदाला सोडले. पण फिरून एकदा असेच गमतीने पीर महंमदाचे नाव या गृहस्थांच्या नजरेसमोर आले.

चिंचपोकळीजवळून गाडी जाते तेथल्या कबरस्थानाजवळ दोनतीन पोरे सारखी भिंतीजवळ जाऊन काही भोकातून बोटे घालीत व फिरून भांडायला सुरुवात करीत.

"तू माझे पैसे घेतलेस. इथे ठेवले होते मी." असे म्हणून हळूहळू त्यांच्यात गुद्दागुद्दी सुरू झाली.

कारण काय म्हणून विचारता असे कळले की भिक्षा मागून जे काय दिवसाकाठी पैसे मिळतील त्यातले एक दोन आणे हळूच या भिंतीतल्या एका भोकात ठेवायला एका मुलाने सुरुवात केली. बरेच दिवस ते सोबत्याच्या ध्यानी आले नाही. पण एक दिवस लक्षात आल्याबरोबर त्याने हळूच भिंतीच्या पोकळपणाची खुबी समजावून आपला खाजगी गल्ला करायला किती छान जागा आहे त्याचे महत्त्व बाकीच्या सर्वांना पटवले. सगळेजण खुणा करून तेथे पैसे साठवू लागले. अर्थात भांडणाच्या दिवशी एका मुलाचा हिशेब बरोबर लागत नव्हता. तेव्हा त्यामुळे चिडून जाऊन या गुप्त संचयाची बातमी पीर महंमदाला देण्याची तो सोबत्यांना धमकी

घालीत होता. अर्थात् त्यालाही खरोखर पीर महंमदास सांगण्याची इच्छा नव्हती, ही गोष्ट निराळी.

त्या भांडणाचे पुढे काय झाले ते फारसे कळले नाही. पण पीर महंमद हे नाव मात्र फिरून एकदा त्यांच्या मनात ठसून गेले.

कोर्टात सुद्धा उडाणटप्पू भीक मागणारी म्हणून पकडून आणलेल्या वीस पंचवीस पोरांनी निरनिराळ्या वेळी या एकाच गृहस्थाचे नाव व पत्ता दिला. तेव्हा ही आहे तरी काय भानगड, अशा या नुसत्या संशयावर वरील गृहस्थांनी आपला तपास सुरू केला. तेव्हा कोठे एकेक गोष्टी हळूहळू त्यांच्या नजरेस येऊ लागल्या.

पीर महंमद असा काही साधासुधा कार्यकर्ता नव्हता. बरती रायबरेलीपासून खाली मद्रासपर्यंतची कितीक ठिकाणची मुले त्याच्या जवळ आली होती. ही काय नुसती सहजासहजीची गोष्ट होती काय?

हा पहा उन्हाने काळवंडलेला पण तरतरीत दहा-बारा वर्षांचा मुलगा कोर्टापुढे बोलतो आहे.

"काय रे, तुझे आईबाप कोठे असतात?" कोर्टाने हिंदीत विचारले. रायबरेलीच्या बाजूस असणाऱ्या एका लहानशा खेड्याचे पोराने नाव सांगितले. "मग तू इकडे कसा आलास?"

"असाच एका गृहस्थाबरोबर आलो."

"किस जात का है तू?"

"रजपूत मुसलमीन हूं." मुलाने अभिमानाने उत्तर दिले. रजपूत मुसलमान!–ते पहा त्याच्या हातावर 'लछमन' हे हिंदू नाव गोंदलेले आहे–एका प्रोबेशन ऑफिसराने मध्येच उठून कोर्टाच्या नजरेस आणले.

"तेरे हाथपर तो हिंदू नाम है."

"हां साब; पहले तो हिंदू था. पर अब मुसलमीन हूं."

"कैसे हुआ मुसलमीन?"

"घरसे भाग आनेपर मै महंमदके पासही था! उसने मुझे खाना

दिया, कपडा दिया. एक दिन महंमदने मुझे कहा कि 'तू मुसलमान है, और कहा की किसीने पूछा तो 'मुसलमान' करके कहना!"

"तेरेको काझीके सामने खडा किया था?" कोर्टाने विचारले.

"नही साब. मुझे तो मालूम नही!"

"फिर तुम मुसलमीन कैसे हो, देखो छोकरा. तुम मुसलमान नही! तुम्हारे हाथपर हिंदु नाम है! तुम हिंदु हो! अब तुझे कोई पूछे तो 'हिंदु हूं' करके कहना!"

"जी साब." मुलाने साहेबाच्या खेळकर सहानुभूतिपर मुद्रेकडे पाहून हसून कबुली दिली.

पुढे त्याच्यावरील उचलेगिरीच्या आरोपाचा खटला सुरू झाला.

हे एकच उदाहरण नव्हे; रायबरेलीपासून तो खाली मद्रासपर्यंत निरनिराळ्या भागातील मुले अशी अचूकपणे या महंमदच्या भोवती गोळा झाली असून जात, गोत, धर्म विसरून त्यांची कधीच ओळख न पटता कालक्रमण करीत आहेत. अशा स्थितीत पीर महंमदच्या कार्यक्षमतेची कोणाला शंका येईल!

• • •

२

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य तेरावे

टेम्स नदीवरील एक आठवण

* * * * * * * * * * * * * * *

'आर्मिस्टिस डे' चा दिवस! व्हाईट हॉल समोरीस सिनेटाफजवळ प्रचंड गर्दी जमली होती. सागराला भरती आली म्हणजे भोवतालच्या खाड्यांनाही पाणी चढावे, त्याप्रमाणे, पिकॅडिली, ट्राफलगार स्क्वेअर, एम्बँकमेंट इत्यादी चौकातही व्हाईटहॉलकडून येणाऱ्या रस्त्यांमध्ये माणसांची रहदारी सारखी वाढत होती. बसेस तर नाक्यापासून कुठल्याकुठे थांबून, लांबचे वळसे घेऊन जात होत्या. व्हाईटहॉलच्या त्या चौकातील साऱ्या इमारतींच्या खिडक्या व गॅलऱ्या प्रेक्षकानी नुसत्या फुलून निघाल्या होत्या. कधीही पादपथ न सोडता चालणारे लंडनचे लोक आज व्हाईटहॉलच्या प्रशस्त पादपथावरून खाली उतरून, कितीक फूट तरी रस्त्यात येऊन उभे राहिले होते. लहानथोर, गरीब-श्रीमंत, स्त्रीपुरुष सारे एकमेकांच्या खांद्याला खांदे घासून चिकार दाटीने उभे असून कशीबशी पायाखालची जागा सांभाळून तोल सावरीत होते. कारण पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे जिकडून माणसांचा लोंढा येई, तिकडून दर क्षणाला चेपाचेप सुरू होई आणि काही पावले मागे व काही पावले पुढे, अशा रीतीने सारा जनसंमर्द झुलू लागला की, तोल सांभाळण्याची सुद्धा मुष्कील पडे. त्यांना थोपवून धरता-धरता लंडनचे सहा फूट उंचीचे पोलिस सुद्धा खास थकून गेले असले पाहिजेत. पण इतके असूनही त्यांनी आपली साखळी कायम ठेवली व मधला रस्ता अगदी निर्मनुष्य राखला. त्या रस्त्यावर फिरण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. काय मधून मधून एकादा लष्करी घोडेस्वार आपला लालसर भपकेबाज युनिफार्म घालून हिंडेल तेवढाच.

साडे दहा झाले. त्या अभ्राच्छादित दिनप्रकाशातही चमकणारी शिरस्त्राणे दिसू लागली, संगिनी चमकू लागल्या, लाल पिवळ्या फितीनी शोभणारे

शिपाई दिसू लागले. फुरफुरत मान आखडून चालणाऱ्या घोड्यांवरचे घोडेस्वारही आले व सर्वांचे लक्ष सिनेटाफकडे लागले. सिनेटाफवर सोनेरी दांडीची निळी, तांबडी, पांढरी अशी निशाणे मस्तक अवनत करून फडकत होती. वरती युनियन जॅकचे भव्य निशाण अर्धवट सुटलेले होते, खाली तांबड्या पांढऱ्या पिवळ्या फुलांनी व पानानी शोभणारी गेंदेदार कुसुमवलये एकावर एक चढली असून खालचा चबुतरा केवळ फुलांचाच बनविला आहे की काय, असे नवशिक्या पाहणाराला वाटत होते. इतक्यात बादशहांची स्वारी आली. उरल्या सुरल्या सगळ्यांच्या टोप्या भराभर खाली गेल्या व व्हाईटहॉलकडे तोंड करून मांडलेल्या सिनेटाफजवळच्या व्यासपीठाकडे लोकांचे लक्ष केंद्रित झाले. बंदुका–तोफांची सलामी झाली. बादशहा, अमीरउमराव, मुत्सद्दी, राजेमहाराजे, धर्मोपदेशक सारे उठून उभे राहिले. त्यांच्या समवेत एवढा अफाट पसरलेला जनसंमर्द एकास्वराने प्रार्थनागीता गाऊ लागला.

एक कडवे संपले! दुसरे संपले. अकराला तीन मिनिटे राहिली. सबंध तो चौक एकदम झोपी गेल्यासारखा तटस्थ होऊन खाली मान घालून उभा राहिला. काय ऐकू येईल, तो जवळच्या माणसाचा श्वासोच्छ्वास; यापलीकडे काही नाही. इतकी एका क्षणार्धात तेथे गाढ शांतता पसरली. अरेबियन नाईटसमधील झोपी गेलेल्या नगराप्रमाणे, त्या शून्य व निस्तब्ध वातावरणात 'बिग बेन' चा आवाज घुमू लागला. बादशहा, प्रधानमंडळ, राजेरजवाडे, अमीरउमराव, धर्मोपदेशक, जनता, साऱ्यांनी प्रार्थना करून मृत वीरांच, गौरव केला. काही बाया बापड्यांच्या, वृद्ध माणसांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू ओघळू लागले. तरुण मनेही भरून आली.

एक! दोन! तीन! बरोबर अकरा ठोके! फिरून सारी जनता जागी होऊन लंडनची नेहमीची गडबड धामधूम सुरू झाली. लोक आपआपल्या ठिकाणी जाऊ लागले. मीही एम्बँकमेंटवरून कॉलेजकडे चालले.

त्या देखाव्याने मीही इतकी भारून गेले होते की, झोपेत चालणाऱ्या मनुष्याप्रमाणे मी पुन्हा तो चित्रपट पाहत पावले टाकीत होते. आणि खास याचे शब्द ऐकू आले नसते तर त्याची ती निरनिराळ्या रंगानी रेखाटलेली

पादपथावरील चित्रे पावलांनी पुसटून मी तशीच पुढे गेले असते.

"Please, Miss, Won't you step aside?" ("बाई, मेहरबानी करून अ पण बाजूस सरकणार नाही काय?") जरा रागीट स्वरात उच्चारलेले शब्द मला ऐकू आले आणि मी दचकून त्याच्याकडे पाहिले. पाहण्याजोगे असे त्याच्यात काहीच नव्हते. एक पाय तुटल्यामुळे फरफटणारा, ओव्हर कोटाच्या लकतऱ्या झाल्याने कुडकुडणारा, पंजाबातील दुआबाप्रमाणे हातावरच्या काळ्या निळ्या शिरांचा संगम वाहिन्या-उपवाहिन्या-सहित लाल हातावर उठून दिसतो आहे, असा तो भिकारी आपल्या चित्रांखालची शेवटची अक्षरे लिहीत होता. त्याची टोपी तेथेच चित्रांजवळच पडलेली दिसत होती.

"Sorry." ("दिलगीर आहे.") म्हणून मी त्याच्याकडे पाहिले.

"Excuse me Miss, I did not know." ("माफ करा बाई, मला माहीत नव्हते.")

मी परदेशी म्हणून माफी मागण्याच्या स्वरात त्याने वरील वाक्य उच्चारले आणि का कोण जाणे, त्याच्या त्या दिलगिरीच्या स्वरात मला किंचित नकळत आलेल्या सहानुभूतीचा भास झाला. जणू काय मी हिंदी म्हणूनच तो असे म्हणाला. मी त्याच्या चित्रांकडे पाहू लागले. एका वर्तुळातील, तरुण, दमदार, पदके चढवलेल्या शिपायाच्या टोपीतील चांदाकडे माझे लक्ष वेधले.

त्याच्याखाली एकच वाक्य लिहिले होते—"१९१८ साली हीच टोपी वीरचिन्हांनी विभूषित झाली होती आणि १९३२ साली—" असे म्हणून दुसऱ्या वर्तुळात त्याने पादपथावर प्रत्यही दिसत असलेल्या एका भिकाऱ्याच्या टोपीचे चित्र काढले होते.



* * * * * * * * * * * * * *

दृश्य चवदावे

विलायतचे पत्र

* * * * * * * * * * * * * *

चि. शशीस सप्रेम आशीर्वाद—

आज आता या वेळी माझ्या लहानशा खोलीत मी अगदी एकटी बसले आहे. ही खोली इतकी बाजूला आहे की, कसली गडबड मला एवढी सुद्धा ऐकू येत नाही. बाहेर थंडीच नाही नुसती, तर धुके व ढग यांनी संगनमत केल्यामुळे आता भर दुपारी १२ वाजता संध्याकाळ झाल्यासारखा अंधार पडला आहे. जरा धक्का लागला की एकदम सर्वे अंग आत ओढून घेणाऱ्या सुरवंटाप्रमाणे नुसता बाहेर जायचा विचार डोक्यात आला की, माझे मन येथे पेटलेल्या शेकोटीला चिकटू पहात आहे. शेगडीतील कोळसे रसरसून पेटले असून, त्यांच्यातून निघणाऱ्या सुवर्णरंगी, हसतमुखाने वरवर चढणाऱ्या ज्वालांकडे पहात बसले की, मला ही शेकोटी म्हणजे मनुष्याला अंतर्मुख बनविणाऱ्या, मायेची ऊब व प्रेमळ सान्निध्याचा आनंद ही सर्व एकवटून, बाहेरच्या जगाचा विसर पाडणाऱ्या गृहसौख्याचे प्रतीकच आहे असे वाटू लागते. म्हणूनच त्या शेकोटीच्या उबेत बसून, तिच्याच प्रकाशाने प्रकाशित होऊन, मी माझे घराचे चित्र रंगवीत आहे. दत्ताने गुरू केले तेव्हा सगळ्या वस्तुमात्रातला चांगला गुण घेतला. मी पण तसेच करणार आहे. आपल्यातील चांगले मला दिसत नाही असे नाही. तसेच येथील कुटुंबे पाहून एखादे वेळी मनाला धक्का बसत नाही असेही पण नाही. पण सगळ्यातले चांगले रंग उचलून त्यांच्या छटा बेमालूम मिसळविता नाही का येणार?

हो, या पाश्चात्य नवकल्पनांच्या क्षेत्रभूमीवर पाऊल टाकून सुद्धा माझ्या मनात अजून क्रांती झालेली नाही; 'घराविषयी' तिटकारा उत्पन्न झालेला

नाही. मला घर पाहिजे आहे. एवढेच नव्हे, तर मनुष्याच्या समजुतीचा विकास या घराच्या संशोधक भूमीत (Nursery) जसा होऊ शकतो तसा इतरत्र होईल की नाही याची मला शंका वाटते. छे, माझे मन अजून 'घरा'च्या कल्पनेला चांगलेच बिलगू पाहते. मुलांची जोपासना राष्ट्रीय शाळेत करून स्त्रीपुरुषाना सुविद्य करू पाहणाऱ्या संन्याशाच्या संसाराची गोडी मला अजून कळत नाही. ममत्वाची भावना ही सर्व जागतिक आपत्तीचे मूळ कारण म्हणून त्यावर गदा घालू पाहाणारे कुटुंबसंस्थेला चिरडू पाहतात. पण जोपर्यंत आई व मूल हा चमत्कार जगात आहे तोपर्यंत कुटुंबसंस्था नाहीशी होणे कठीण आहे. नव्हे, ते निसर्गाविरुद्धच आहे असे मला वाटू लागते.

काल अशीच मी एका घरी बसले होते. तेथे मला अगदी घरासारखे वाटत होते. अजूनही आठवण झाली की वाटते, हिंदुस्थानात अशी घरे का दिसत नाहीत? मी माझ्या मैत्रिणीकडे होते. नाताळचे दिवस असल्याने तिच्या घरची सारी मंडळी एकत्र जमली होती. गेले काही दिवस तर आमचे इतके मजेत गेले की खरोखर परक्या प्रदेशात मी राहते आहे हे काहीसे विसरलेच होते. ते घर म्हणजे गृहसौख्याचे एक अप्रतिम चित्रच असे मला वाटले. मुली, सुना, भावी सुना, मुलगे, सारी मंडळी एकत्र जमली होती. पण एवढी धुसफुस नाही, कुरकुर नाही की काही नाही. नव्हे, मला जर माहीत नसते तर या सुनाच म्हणून सुध्दा ओळखणे, मला हिंदुस्थानात पाहिलेल्या उदाहरणांवरून जड गेले असते. तेथे आपल्या मनाला चमत्कारिक वाटणाऱ्या किती तरी गोष्टी होत्या. एवढे चांगले प्रोफेसरांचे कुटुंब, पण मिळवत्या मुलीचे खाणावळीप्रमाणे घरात पैसे घेत असत. स्वतंत्र मिळवू लागलेल्या साऱ्या मुलांचा कारभार स्वतंत्र. ज्याचे त्याचे स्वतंत्र घर. सर्व स्वतंत्र! छे! अजूनही आपल्याला ही कल्पना कशी तरी वाटते नाही? पण इतके असून सुद्धा आपल्याकडे न आढळणारे असे काही तरी त्या घरात होते. आणि खरोखर त्यानेच माझे मन वेधले म्हणेनास!

तुला वाटेल मी इकडे येऊन बदलले; पाश्चात्य तेवढे सारे चांगले व आपले ते सारे वाईट अशी माझी साहेबी दृष्टी झाली. खरोखरच अशातला प्रकार माझ्या वाटण्यात आहे असे मला मुळीच वाटत नाही. 'मनुष्य-स्वभाव सगळीकडे सारखा आहे',—'भांड्याला भांडे जवळ असताना लागलेच पाहिजे',—इत्यादी व्यवहारशास्त्रातील नियम त्रिकालाबाधित आहेत, हे मी अगदी ताबडतोब कबूल करते. पण जे आपल्यात सापडत नाही, त्याचा इतका मनोहर संगम इतरत्र दृष्टीस पडला तर तो केवळ परकी म्हणून त्याच्याकडे पाहून नाक मुरडण्याइतकी मी अरसिक नाही. इतकी एकांगी देशभक्ती पण माझ्यात बाणलेली नाही.

मी काही थोडेथोडके दिवस त्यांच्या घरी नव्हते. पण तेवढ्यात मला असे वाटू लागले, की खरोखर हिंदुस्थानात अशी घरे होतील त्या दिवशी आमची गुलामगिरी संपलीच म्हणून समजा. गुलामगिरीच्या मनोवृत्तीचे बाळकडू केवळ राजकीय गुलामगिरीनेच आम्हांला मिळते असे नाही. जन्मापासून जातीने, घरातून चोहोकडे ते रक्तात भिजले जाते. त्यानंतर तो आमचा स्वभावच बनून गेला तर मोठे नवल ते काय ?

कुटुंबातील माणसे म्हणजे कित्येक वेळा मला हिंदुस्थानच्या शेजारी असणाऱ्या लक्षद्वीप मालद्वीप बेटांच्या समुद्राप्रमाणे दिसू लागतात. नाव एक खरे. पण प्रत्येक लहानसे बेट स्वतःभोवती समुद्राचा कोट करून इतरांपासून अलग असते. कुटुंबातील व्यक्ती सुद्धा कितीतरी घरातून स्वतः-भोवती असे मानसिक कडे घालून वावरताना आढळतात. एका घरात असताना प्रत्येका ची वाढ इतकी अलग व पृथकपणे होत असते की, खरो-खर त्यांच्या एकत्र राहण्यापलीकडे एकमेकांच्या मनाचा एकमेकाना पत्ता आहे की नाही याचीच मला शंका येते. ही स्थिती इकडेही असेल, नाही असे मी म्हणत नाही. पण प्रत्येकाच्या व्यक्तित्वाला मान मिळत असल्या-कारणाने त्यांच्या कुटुंबात जितका मोकळेपणा आढळतो तितका आपल्या कुटुंबात आढळत नाही. आपल्याकडे जर अशी सासू-सासरा, नणंदा-जावा,

दीर–भावजया या नात्याची मंडळी एकत्र जमली असती तर क्षणाक्षणाला कुणाचे कोण लागते याचा कधी विसर पडलाच नसता. सासूबाईंना विचारल्याशिवाय सुनेच्या घरी सुद्धा सून निराळी स्वतःच्या मताने वागू शकली नसती. मग सासूसासरा व सून यांच्यात इतका मोकळेपणा कुठला आढळायला ?

मला एका वेळचे संभाषण तर चांगलेच आठवते आहे.

"काय हे ! सगळी आरास अखेर अगदी ठराविक साच्याची ! काही वेगळे म्हणून तुम्हाला बायकांना करायला नकोच. बायकी बुद्धीला ते कुठले जमायला म्हणा, नाही तर माझ्याकडे पहा. मी बघ कसा ह्या स्कॉच (लोकांच्या) हुक्क्याची नळी तोंडात धरून आज मोगल बादशहा बनलो आहे तो."

"हो तर, म्हणूनच मी नेहमीची आरास केली. नाही तर लोकांचे लक्ष माझ्या आराशीकडे वेधल्यावर तुमचा हा मोगल बादशहाचा थाट फुकटच जायचा."

"मायकेलची आजी, हे पाहिले का बाबांचे रूप ? मोगल बादशहा बनले आहेत, आता तुम्हाला पट्टराणी म्हणूनच सजून यावे लागेल. बाकी मोगल बादशहांच्या राण्या बाहेर येत नसतात हो. तुम्ही आपल्या तिकडे पडद्यातच."

"Hallo Darling ! तुझ्या वडिलांकडे पाहिलेस ? बादशहाची स्वारी आली आहे आपल्या घरी." म्हणून झटकन् पौर्वात्य पद्धतीने कुर्निसात करून आपल्या नवऱ्याच्या खांद्यावर हात टाकून ती उभी राहिली.

हा वरचा संवाद सुरू झाला सून सासऱ्यांत व पुढचे सारे बोलणे सुनेचे आणि ती सुद्धा एखादी लहान पोरबीर नसून, चांगली एका पोराची आई आहे. पण तिचा कुर्निसात व हास्यविनोद इतका सरळ होता की खरोखर मजा वाटल्यावाचून राहीना. पण सवय नसल्यामुळे माझे हिंदी मन एक क्षण जरा चमकूनच गेले. मी काही तिचे नवऱ्याच्या खांद्यावर हात टाकण्याबद्दल किंवा Hallo Darling म्हणण्याबद्दल कौतुक करीत नाही. मुलखा

मुलखाच्या चालीरीती निराळ्या, वागण्याची पद्धत निराळी आणि तशीच तेथली माणसे वागतात. पण या भिन्नतेतून प्रतीत होणारी मनोवृत्ती बरेच वेळा एकच असते. एखादी आंग्ल युवती पतीला लाडाने हाक मारून, दारात दिसल्याबरोबर त्याच्या गळ्यास जाऊन मिठी मारील, तर एखादी हिंदी 'आर्य' स्त्री मधल्या घरातून हळूच डोकावून पाहून नजरभेट झाल्याबरोबर दृष्टी जमिनीकडे वळवील. पण दोहोतून व्यक्त होणारी प्रेमाची भावना काही निराळी होत नाही. म्हणूनच मला प्रश्न पडतो की, हाच मोकळेपणा आपल्याकडे सासूसासरा व सून या संबंधात सापडतो का? लग्न झाल्यानंतर मुलीच्या मनात पहिली कल्पना कोणती येत असेल तर, सासरी जावयाचे ही. पण सासर म्हणजे काही सदैव स्वतःचेच घर असे नव्हे. ही सासरची कल्पना काढून घराची कल्पना नाही का त्या ठिकाणी वाढविता येणार? नावाच्या संबंधाने आलेली आखाडातील सासूसुद्धा सासूपणा गाजवायला सोडीत नाही. मग खऱ्याखुऱ्या सासवेच्या हाताखाली किती प्रेमळपणाने वागवले तरी स्वतःच्या घराची भावना कशी येणार? आमची सासू, सासरा, सून इत्यादी नात्यांचा कारभार अगदी उत्तमातला उत्तम घेतला तरी त्याचे स्वरूप पितृवात्सल्याने राज्य चालविणाऱ्या संस्थानाप्रमाणे असते. तेथे चांगुलपणा असतो, चांगुलपणाच्या पोटी उत्पन्न होणारा मोकळेपणा येऊ लागतो, पण स्वतंत्रता व त्यामुळे येणारा मोकळेपणा दिसून येत नाही. आता हे मोकळेपणाचे पुराण सुरू झाले असे तू खास मनात म्हणत सुटशील.

बाकी मला सर्वांत पसंत पडली असेल तर पुरुषानी घरात मदत करण्याची पद्धत. जेवण संपले, चहा झाला, की लागली सर्वजण चटकन आवरायला. मग तेथे "तू मुलगा आहेस ना, तू नाही पानाजवळचे भांडे उचलायचे," असली शिकवण वगैरे काही नाही. तर सगळी कामाला लागतात. कुणी टेबलावरच्या बशा उचलील तर कुणी ग्लासे गोळा करील. एखादा सगळे रुमाल गोळा करून टेबलाच्या खणात ठेवील. चहाच्या वेळी तर किती तरी वेळा भाऊभाऊच सारी तयारी वरून चहा तयार झाला की आम्हाला बोलावीत. तो सगळा देखावा पहात असता माझ्या डोक्यात

एखादे वेळी येई, असे हिंदुस्थानात पुरुषानी केले तर ? छे, ते पुरुषानाही आवडायचे नाही, की बायकांनाही बरे वाटायचे नाही. मुंबईच्या चाळीतील जीवनक्रमात तर असे नमुने फार दिसतात. इकडे बायकोला घेऊन बाहेर फिरायला जायची किंवा नाटकाला जायची पतिराजाना हुक्की आलेली असता पत्नीला उष्टी खरकटी सासूबाईच्यावर टाकून जायला कसेसेच वाटते. पतिराजांचा जीव उशीर होत असल्यामुळे अगदी खाली वर होत असतो. पण अशा धांदलीत बायको असताना पतिराज पाट उभा करतील ? छे, मग झालंच. 'हीच सुधारणा बरं. सुधारणा करताना अशाच बायका डोक्यावर बसतात.' इत्यादी गोष्टी नुसत्या शेजाऱ्यापाजाऱ्यातच होऊन नाही भागायच्या, तर गणेशोत्सवात खड्या सुराने सुधारणेच्या पोवाड्यांची टाळ्यांच्या गजरात खुसखुशीत मजलस होईल, तेव्हा कुठे सारे थांबेल—

असो, पण खरं सांगू का ? माझे मन सगळ्याहून जास्त कशाने ओढले गेले असेल तर माझ्या मैत्रिणीच्या आईने वडिलांना दिलेला आरसा पाहून. त्या आरशाची निवड आरसा म्हणून झाली नव्हती. त्याच्या पाठीमागे असलेल्या कवितेने त्याला महत्त्व चढले होते.

"वय वाढत आहे. आपले तारुण्य नष्ट होत चालले आहे. म्हातारपणीची ध्वजा केसांवर केव्हाच फडकलेली आहे. चेहऱ्यावर तरुणपणची जवानीची कळा जाऊन जागोजाग सुरकुत्या पडू लागल्या आहेत. एके वेळी हातांखांद्यावर चढलेली, आपल्याशिवाय एक घटकाभरही चैन न पडणारी मुले बाळे आता मोठी होऊन स्वतःचा संसार करू लागली आहेत. त्यांच्यात तीं गुंग असतात, आपली जरूरी त्यांना इतकी भासणार नाही! एवढेच नव्हे, जगातले बाहेरचे व्यवहार संपले की, भोवतालचे जगसुद्धा आपल्याला विसरू लागेल. पण जोपर्यंत तू आणि मी एकमेकांच्या शेजारी हाताला हात धरून उभी आहोत तोपर्यंत यातल्या सगळ्या गोष्टींचे मला काही सुद्धा वाटणार नाही." या अर्थाची आरशाच्या मागली कविता वाचून माझे मन एकदम भरून आल्यासारखे झाले. आज त्या दोघांचे वय पाउणशेच्या घरात आहे. त्या कवितेत वर्णन केल्याप्रमाणे खरोखरीच त्यांची

स्थिती आहे. पण जीविताच्या या संध्याकाळी सुद्धा मावळत्या सूर्याची सोनेरी किरणे आकाशात फेकली गेल्यामुळे काळे ढग सुद्धा उजाळून जाऊन आकाशात सुवर्णसमुद्र फेसाळल्याचीच शोभा यावी तशी शोभा ह्या दोघांच्या जीवनावर पसरलेली आहे. आमचा संसार झाला. सुखाने झाला, असे म्हणण्याचा अधिकार दोघांनाही प्राप्त झाला आहे.

सगळ्यांच्याच आयुष्याच्या शेवटी सांज इतकी फुलून येत असेल का ?

मला पक्की जाणीव आहे की ही चित्रे जागोजाग दृष्टीस पडत नाहीत. पण एका इंग्रजी घराचे नजरेस पडलेले हे गोड चित्र पाहून, माझे मन खरोखरच मोहून गेले. या घराच्या घरपणात प्रेमळपणा, स्वतंत्रता, व्यक्तित्व यांचा हृदयंगम संगम मला दृष्टीस पडला. अशी चित्रे जर घरोघर दिसतील तर लोक स्वर्गसुखाला लाथाडून, पृथ्वीवर वारंवार जन्माला येऊ पाहतील.

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य पंधरावे

मॅन्चेस्टर व आसपास १

* * * * * * * * * * * * * * *

मी उन्हाळ्याच्या सुट्टीचा एक महिना मॅन्चेस्टरमध्ये काढणार हे ऐकून माझी हिंदी मित्रमंडळी अगदी हसू लागली. त्यांच्या मते वास्तविक या सुट्टीत युरोपखंडावर भटकायला जायचे. ते नाही तर निदान ब्राईटन तरी! बरे, मला अगदी वरच जायचे असेल तर स्कॉटलंड, लेक डिस्ट्रिक्ट. पण मॅन्चेस्टर कुठले काढले बोवा! त्यांना कल्पनाच करवेना. मी मात्र निघालेच होते. कारण एक तर मला माझे 'प्रॅक्टिकल' तेथे करायचे होते व इतरही कितीतरी गोष्टी तेथे पाहायच्या होत्या. शिवाय माझ्या ह्या मित्र-मंडळीइतकी ती कल्पना मला हास्यास्पद वाटत नव्हती. ब्रिटिश राष्ट्रांचे सारे डोके लंडनमध्ये असेल, पण ब्रिटनचा आत्मा मॅन्चेस्टर व त्याच्या आसपास असलेल्या भागातच धडधडत आहे. तेथल्या कोणत्याही व्यापाराला जरा पायबंद बसू द्या, लंडन ढवचल्यासारखे जागे होते व विचार करू लागते. सारे ब्रिटिश राष्ट्र हादरल्यासारखे होऊन पाहू लागते. अशा महत्त्वाच्या भागात मी जाणार, या एका कल्पनेनेच मी किती तरी भारून गेले होते. वास्तविक हिंदी मुलांना गिरण्यांच्या, कारखान्यांच्या आत प्रवेश सुद्धा करू देत नाहीत आणि ती संधी मला मिळणार, यामुळे तर माझी उत्सुकता अधिकच वाढली.

संध्याकाळच्या सुमारास मी मॅन्चेस्टरला उतरले. उतरताच, प्रथम-दर्शनी तरी माझा हिरमोड झाल्याशिवाय राहिला नाही. इंग्लंडचे पहिल्या प्रतीचे औद्योगिक शहर किती सुंदर असेल अशी माझी कल्पना होती, आणि येथे तर माझ्या दृष्टीसमोर दिसत असलेले शहर अगदी धुराने काळवंडलेले व नुकताच पाऊन पडून गेल्याने खरोखर अस्वच्छच दिसत होते. काय घाणेरडे शहर हे! इतका पैसा व इतकी यांत्रिक साधने सज्ज

असता सबंध शहराचे Spring Cleaning (वासंतिक शोधन) का नाही हे लोक करीत! खरोखर या शहराला पहिल्यांदा काही पाहिजे असेल तर एक मोठा ब्रश व साबू पाणी घेऊन धुवायला पाहिजे आहे. त्याशिवाय हा धुरकटलेल्या काळेपणा नाही जायचा.

एक दिवस दुकाने पाहत मी अशीच हिंडत होते. चांगले ऊन पडले असल्याकारणाने कोट वगैरे काही न घालता इकडल्याप्रमाणेच पायात वहाणा घालून मी हिंडत होते. माझे सर्व लक्ष दुकानाकडे होते. पण थोड्या वेळाने हळून मला मागे पाहण्याची इच्छा झाली आणि रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या बऱ्याच लोकांचे मी नयनकुतूहल होऊन बसले आहे असे माझ्या लक्षात आले. त्यांत मुले, थोर, सारी होती. कोणी माझ्या साडीकडे बोट दाखवीत होते, तर कोणी पायांतल्या चपलांकडे सोबत्याचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत होते. मी तोंड फिरवलेले पाहताच मात्र मोठी मंडळी लहानाना जरा दटावून चालू लागली. तरी पण त्यांची जिज्ञास पुरी झाली नसल्यामुळे एखाद्या 'पाईड पायपर' प्रमाणे मी पुढे चालले असता मुलांचा तांडाच्या तांडा माझ्या मागे किती वेळ येत होता. बस पकडून मी लवकरच तेथून पळ काढला म्हणून ठीक, नाहीतर ती जिज्ञासा कोठवर पोचली असती याचा नेम नव्हता. पण याहीपेक्षा खरा व चमत्कारिक अनुभव मला दुसऱ्याच दिवशी मी पार्कमध्ये हिंडता हिंडता अखेर एके ठिकाणी वाचीत बसले तेव्हा आला. माझे लक्ष नव्हते, पण मी मुलांच्या विभागाजवळून गेले असता काही मुलांनी मला पाहिले व त्यातलेच ६-७ जणांचे टोळके माझ्या मागोमाग मी बसले होते तेथे त्या झाडाजवळ येऊन उभे राहिले. वाचता वाचता त्यांचा संवाद मला ऐकू येऊ लागला.

"खास ती एक 'ब्लॅकी' आहे." एक उद्‌गारला.

"चल हट, ब्लॅकी नाही. ती इंडियन आहे. मला माहित आहे. माझ्या बापाजवळ इंडियाची चित्रे आहेत. तेथल्या बायका असाच पोषाक करतात." दुसऱ्याने अधिकारवाणीने माहिती दिली.

"ओ! तिच्या कपाळातून बघ काय आले आहे. ते बघ लाललाल रक्तासारखे."

"ती त्यांच्या धर्माची खूण आहे." एका मोठ्या मुलीने उत्तर दिले.

"किती गमतीचा पोषाख, नाही?"

"ती कायरे, तशीच सगळी काळी असेल काय?" एकाने प्रश्न केला.

"तिची काळी कातडी भाजल्यासारखी लागत असेल नाही?"

"कशी हाताला लागते कोण जाणे!" एक मुलगी उद्गारली.

मला मात्र आपल्याकडे एका युरोपिअन बाईला मी एका खेड्यात घेऊन गेले होते तेव्हाचा प्रसंग आठवला. तिची कातडी कशी लागते हे पाहण्याकरता आमच्याकडच्या एका पोरीने तिच्या पायमोज्यावरून हळूच हात फिरवला. न जाणो, तसाच माझ्यावर प्रसंग यायचा. तेव्हा आधीच उठलेले बरे असे समजून मी भराभरा चालू लागले. मला वाटते, या भागात हिंदी बायका फारशा दृष्टीस पडत नसाव्या. त्यामुळे एखादी आपल्याकडची बाई पाहिली की तिच्याविषयी लहानथोर, गरीब श्रीमंत सगळ्यांच्यात एकदमच कुतूहल उत्पन्न झालेले दिसते. लंडनमध्ये मात्र हा अनुभव फारसा येत नाही. एक तर तिथे आधी पृथ्वीवरचे सगळ्या तऱ्हेचे लोक पाहायला मिळतात. शिवाय हिंदी लोकही इतके वावरत असतात की थोडीशी कामगार वस्ती किंवा अशीच काही ठिकाणे सोडली तर लोकांचे विदेशीयांविषयीचे नाविन्यच नाहीसे झालेले असते.

अर्थात मला त्या लहान मुलांचे कुतूहल अगदी स्वाभाविक वाटते. पण विदेशात मोठ्या माणसांचे सुद्धा केव्हा केव्हा असे गमतीचे अनुभव येतात व मग बाकी आपल्याकडे येणाऱ्या युरोपियन बायकांच्या अनुभवांची आठवण होऊन मनुष्यस्वभाव सगळीकडे कसा सारखा असतो याची गंमत वाटते!

एक दिवस मी गडबडीने रस्ता ओलांडून जाण्याचा प्रयत्न करीत होते.

"हं, कृपा करून थांब. हा लाल दिवा आहे तोपर्यंत रस्ता ओलांडायचा प्रयत्न करू नको." कोणी तरी माझ्या खांद्यावर हात ठेवून मला थोपवून धरले. मागे वळून पाहते तो एका म्हाताऱ्या बाईने मला अडवल्याचे आढळून आले. तिचे ते करणे चमत्कारिक भासले तरी तिच्या चेहऱ्यावर व हसण्यात तिचा सज्जनपणा प्रतीत होत होता. मीही तिच्याकडे पाहून

हसले व आम्ही बरोबरच रस्ता ओलांडला.

"मला तुझ्या चपला भारी आवडल्या. येथे अशा चपला मिळत नसतील—नाही?"

"मला नाही वाटत मिळतील म्हणून. तिकडूनच मागवाव्या लागतील तुम्हांला पाहिजे असल्या तर!"

"किती छान व आरामशीर वाटतात तुमच्या वाहणा. नाहीतर आमचे बूट. माझी बोटं तर मुडपतात. त्यातून अलीकडे मला जास्त त्रास होतो म्हणून विशेष...बरं, तुला संस्कृत येतं का?"

एकाएकी विचारलेल्या या प्रश्नाचा मला अर्थच कळेना.

"हो येते तर. मी संस्कृत घेऊनच ग्रॅज्युएट झाले आहे."

"अस्सं!" तिच्या तोंडावर समाधानाचे स्मित पसरले.

"हे पाहा, तुला थोडी तसदी देते, माझं घर येथून जवळ आहे, तिथं येतेस का! माझी मुलगी तिथं आजारी आहे आणि तिला हिंदी लोकांना भेटायला फार आवडतं. ती कनी एकदा फार आजारी होती, त्या वेळी एका हिंदी पुरुषाने तिला एक संस्कृत पवित्र मंत्र लिहून दिला व त्याचे पठण करायला सांगितले. आणि तेव्हापासून तिला किती तरी बरं वाटलं. किती आश्चर्यकारक असला पाहिजे तो मंत्र!"

बोलता बोलता मी तिच्या घरी अनपेक्षित पाहुणचार घ्यायला गेले. तिची मुलगी खरोखरच आजारी दिसत असून एका आरामखुर्चीवर पडलेलीच होती.

"Oh! किटी, हे बघ कोणी तरी तुला भेटायला आले आहे." असे म्हणून तिने माझी कशी गाठ पडली त्याची हकीकत सांगितली व अखेर, 'तिला संस्कृत कळते, ती तुला त्या मंत्राचा अर्थ सांगू शकेल' म्हणून आनंदाने तो मंत्र मला दाखविण्याविषयी तिला आग्रह करू लागली.

'हे काय आई!' म्हणून मुलीने जरा आळंटाळं केली पण तिलाही त्या इतक्या पवित्र मंत्राचा अर्थ जाणण्याची उत्सुकता होतीच. अखेर दोघींनी मिळून एक चुरगळलेला असा बारीकसा कागद माझ्यापुढे केला. कागदा साफसूफ करून रोमन लिपीत लिहिलेला तो संस्कृत मंत्र मी वाचू

लागले. मलाही त्या मंत्राचा परिणाम ऐकून तो पाहण्याची उत्सुकता उत्पन्न झाली होतीच. पण वाचते तो काय, नेहमीचा संध्येतील गायत्री मंत्र!

"Oh! तो काही गूढ, पवित्र आश्चर्यकारक मंत्र असेल नाही?" विस्फारित डोळ्यांनी ती मला वाचताना पाहून उद्‌गारली.

आणि तो भाव पाहताच तिचा विश्वासभंग करणे माझ्या जिवावर आले. मीही तितक्याच गंभीरतेने उत्तर दिले,

"खरंच हा काही तरी गूढ पवित्र मंत्र आहे. मला त्याचा अर्थ कळत नाही!"

बाहेर पडल्यावर मात्र हसू आल्याशिवाय राहिले नाही.

मॅन्चेस्टरच्या कामकरी वर्गाच्या चळवळी पाहत असता त्यांची घरे कशी असतात हे पाहण्याची मला फार उत्कंठा होती. पुष्कळ मजुरांच्या-कडून कामकरी वर्गाकरिता कार्पोरेशनने बांधलेल्या वस्तीचा नाके मुरडून केलेला उल्लेख मी ऐकला होता. तेव्हा खरोखर ही घरे आहेत तरी कशी हे पाहण्याची माझी इच्छा होती.

लंडनमधल्या गरीब लोकांच्या अगदी घाणेरड्या वस्तीत जाऊन मी स्वतः पाहिले होते. आमच्या इकडील मजुरांच्या मानाने ती घरे किती जरी चांगली असली तरी लंडनच्या मानाने खासच गचाळ होती. त्यामुळे Down with slums अशी एकच हुल्लड चोहोकडे उठलेली होती. अर्थात् मॅन्चेस्टर तर आधीच गचाळ, असे माझे मत झालेले. त्यातून कधी कधी मॅन्चेस्टरच्या बाहेर जाण्यास शारमॅन्क गाठण्याकरिता म्हणून गरीब वस्तीत उभी असता तेथल्या घरांविषयी माझे मत तितकेसे अनुकूल झाले नव्हते. तेव्हा ही खास म्हणून बांधलेली घरे कशी आहेत, त्यात नाक मुरडण्याजोगे एवढे काय आहे, हे एकदा पाहावे तरी, म्हणून मी व एक अमेरिकन मुलगी अशा दोघी बरोबर निघालो.

इष्ट स्थळी आमची बस थांबली असता तेथून काही अंतरावर भोवती बगीचा असलेली लहान लहान घरे आम्हाला दिसू लागली. आम्ही

उतरलो त्या वेळी चोहोकडे अगदी मोत्यासारखे ऊन चमकत होते, त्यामुळे भोवतालची बाग व ती घरे फारच छान दिसत होती. पाटलाच्या मुंडाशाप्रमाणे त्यांची तांबडी छपरे त्या उन्हात तरी खालच्या हिरव्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होती. आम्ही जवळ आलो. आणि जवळ आल्यावर सुद्धा माझे त्या घरांविषयी बिलकुल वाईट मत झाले नाही. उलट त्या एकमजली लहान इमारती पाहून तर मला, मजूरवस्ती असावी तर अशी, असे वाटले. पण ह्या बाहेरच्या देखाव्याने आमचे समाधान होत नव्हते. आम्हाला दोघीनाही आतून ती घरे पाहण्याची दांडगी इच्छा होती.

मी माझ्या विदेशीपणाचा पुरेपुर फायदा घेऊन मनाचा धडा केला व एका दारावर टकटक केले. माझ्या अपरिचित पेहेरावामुळे बहुधा ती घराच्या खिडकीच्या पडद्याआडून माझ्याकडे पाहातच असावी. कारण ती ताबडतोब पुढे आली. मला ती प्रत्यक्ष आल्यावर मात्र जरा गोंधळल्यासारखे झाले. पण तिचा चेहरा पाहून धीर करून मी विचारलेच, "हे पहा, मी येथे एक कामकरी वर्गाच्या चळवळीची विद्यार्थिनी आहे. पुस्तकात मी कामकरी वर्गाविषयी पुष्कळ वाचते पण मला कधी प्रत्यक्ष पाहावयाला मिळाले नाही. तर तुमची हरकत नसल्यास—" "हो हो, या तर, छे छे, काही हरकत नाही." असे म्हणून अगदी हास्यमुखाने तिने आम्हाला आत नेले. "ही पहा पॅन्ट्री (कोठी), ही बैठकीची खोली आणि ह्या दोन बेडरूम्स. ओ! त्या जरा अस्ताव्यस्त आहेत, नाही तर..." "छे छे, मला कल्पना आलीय." मी चटकन् उत्तरले. "आणि ही आमची बाथरूम. येथे हा चांगला बाथ सुद्धा बसवला आहे." ती अभिमानाने दाखवू लागली व शेवटी आमच्या घरी आम्ही चांगला आठवड्यातून दोनदा बाथ घेतो म्हणून अगदी गंभीर चेहेऱ्याने आपली स्वच्छता व महत्व तिने माझ्या मनावर ठसविण्याचा यत्न केला. "Oh! किती छान! नाही?"

"हंहं. खरंच ही घरे छान आहेत नाही? मला तरी वाटतं. तुम्हालाही माझ्याप्रमाणं वाटतं हे ऐकून मला आनंद झाला."

"पण तुम्हाला माहीत आहे?"—हळू हळू ती गप्पा करण्याच्या

रंगांत येऊन आपल्या विशाल छातीवर हातवारे करीत माना मोडून बोलू लागली,

"काही लोक मोठे मजेचे असतात. Snobs असतात ते. हो, कामकरी वर्गात सुद्धा अशी काही मंडळी असतात. त्यांना ही घरे आवडत नाहीत. कारण गरिबांची घरे, गरिबांची वस्ती म्हणून ती वेगळी काढली जातात. पण मी म्हणते, आपण जर कामकरी आहोत तर कामगारांची वस्ती म्हटलं म्हणून बिघडलं कुठं? शिवाय जी गोष्ट चांगली ती वाईट थोडीच होऊ शकते?"

"हो, ते तर खरंच."

"शिवाय इतकी सोय असून भाडं कमी. मी माझ्या नवऱ्याला सांगितलं आणि आम्ही येथे आलो. माझा मुलगा, त्याला तर गेल्या दोन वर्षांपासून काम नाही! म्हणून कसं बसं पैशाकडे पाहिले पाहिजे ना!"

"हो हो, तर!" असे म्हणत मी इकडे तिकडे नजर टाकीत होते— कामकरी वर्गाची ही घरे!

माझ्या मनात विचार आला—आमच्या मुंबईच्या हिंदु कॉलनीतील व पुण्याच्या डेक्कन कॉलनीतील किती तरी लोक येथे राहायला आनंदाने तयार होतील! घरातील सामान, लहानसा घरीच तयार केलेला रेडियो, घरातील व्यवस्था—खरोखरच आमच्या मध्यम वर्गातील कुटुंबात सुद्धा एवढे सामान आढळेलच असे नाही. आणि तरी हे मजुराचे-कामकरी माणसाचे—घर आहे!

आम्ही दोघी तिचे आभार मानून बाहेर पडलो. "What a tedious uniformity!" माझ्या अमेरिकन मैत्रिणीने उद्‌गार काढले, "आणि घरात सोयी तर अगदीच नाहीत."

मी मात्र तिच्या उद्‌गाराने चकित झाले. आमच्याकडे एवढे तरी कोठे आहे? पण आम्ही कधी कुरकूर करणे शक्य आहे का? कसे तरी जन्माला आल्यासारखे दिवस काढायचे हे आमचे ध्येय. आमच्यात असंतोष धुमसणार कसा व सुखाची स्वप्ने आम्ही पाहणार कशी! आमच्या सर्व जीवनावर निराशात्मक मायावादाच्या तत्त्वज्ञानाची एवढी गडद छाया

पडलेली असते की सुखी आयुष्याची कल्पना सुद्धा करणे पाप असा आमचा समज होऊन बसतो. मग, मला माणसासारखे जगायला कमीत कमी इतके पाहिजे, ते न मिळाले तर मी मनुष्यत्वाला सुध्दा पारखा होईन, म्हणून तेवढे तरी मिळवणे हा माझा हक्क आहे आणि मी ते मिळविणार, असा इकडील लोकांप्रमाणे आग्रह धरणे आमच्याच्याने कसे होणार!

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य सोळावे

मॅन्चेस्टर व आसपास २

* * * * * * * * * * * * * * *

मी मॅन्चेस्टरच्या आसपास हिंडत होते, त्या वेळी केवळ असहकारितेनेच नव्हे, इतर जागतिक कारणांनीही मॅन्चेस्टर भागाच्या कापडाच्या व्यापाराला चांगला धक्का बसला होता. कित्येक ठिकाणी गिरण्या बंद असून कापडाचा उठाव होत नाही म्हणून माल पडून राहिला होता. मॅन्चेस्टरची तलम धोतरे हिंदी बाजारपेठेत विकली जात नाहीत म्हणून अखेर त्यांची Dustres करून विकण्यात येत होती. आपली असहकारितेची चळवळ हे त्या वेळेपुरते तरी दिखाऊ कारण झाल्यामुळे कामकरी वर्गातही म. गांधी व त्यांची चळवळ काय, हे जाणण्याची चांगलीच उत्सुकता उत्पन्न झाली होती. मी जेथे जेथे गिरण्यांतून जात असे तेथे तेथे बायका-पुरुष यांना माझ्याशी बोलण्याचा कधी प्रसंग आला की पहिल्या प्रथम म. गांधींविषयी व नंतर लगेच ही चळवळ काय आहे याविषयी ते मला प्रश्न करीत !

ज्या बाईंनी मला पाठविले होते त्यांना अशा वेळी जरा भीती वाटे. पण त्यांनी काहीही प्रश्न विचारले तरी मला त्याचे काही वाटायचे नाही, असे मी त्यांना आश्वासन दिल्यामुळे मला थोडा वेळ का होईना, मजुरांशी मोकळं बोलता येई. विशेषतः एखाद्या ठिकाणी जेवणाची वेळ असली की फारच मोकळे वाटे. कारण त्या वेळी बऱ्याच बायका किंवा पुरुष माझ्याभोवती जमून माझ्यावर प्रश्नांची एवढी सरबत्ती करीत की अशा वेळी मला उत्तरे देणे सुद्धा जड जाई. पण इतक्यातही माझा अपमान करण्याची वृत्ती मला कोठेही दिसून आली नाही. इतक्या गिरण्यातून व कारखान्यांतून फिरले; काही ठिकाणच्या Welfare च्या मुख्य बाईंनी वेळ असेल त्याप्रमाणे कामकऱ्यांना मला प्रश्न विचारण्याची

संधी सुद्धा दिली. पण कोठेही मला ब्रिटिश मालावरील बहिष्काराच्या धोरणामुळे अपमानित होण्याचा प्रसंग आला नाही. जवळ जवळ प्रत्येक ठिकाणी नीट, सरळ, अंतःकरणपूर्वक उत्तरे दिली की आपली असहकारितेची चळवळ सुद्धा त्यांना पटू शके, असेच माझ्या अनुभवास आले. वास्तविक त्या चळवळीत खरा धक्का कोणाला बसला असेल तर त्यांनाच होय. पण त्यांच्यातील जागृती व राष्ट्राभिमान ही आपल्यापेक्षा कितीतरी पटीने प्रखर आहेत. यामुळे दुसऱ्या राष्ट्राची तीच भावना व तोच प्रयत्न जरी त्यांना वस सोसावयास लावणारा असला तरी सुद्धा त्यांना समजू शकतो. अशा वेळी प्रश्नोत्तरे मात्र कित्येक वेळा मजेची होत.

"पण तुम्हांला वाटते, तकलीने सूत काढून तुम्ही सर्वांना कापड पुरवू शकाल ?" एका फोरमनने मला विचारले.

"छे. तसे करणे शक्यच नाही. पण आमच्याकडे सुद्धा गिरण्या आहेत की!"

"हं, पण महात्मा गांधींचा जोर हातविणीचे, हाताने कातलेले कापड यावर आहेना ?"

मला जरा उत्तर सुचेनाच, कारण ते खरे होते.

"हो, आहे. पण त्यांची तकली म्हणजे काही हातकातीचे व हातविणीचे कापड प्रत्येकाने पुढेही घेतले पाहिजे याकरता नव्हे. ते एक प्रतीक आहे. हिंदी माल, हिंदी उद्योगधंदे व यंत्रे, कारखाने हिंदी असायला पाहिजेत या अर्थाने त्यांनी हिंदी जनतेपुढे ठेवलेली ही एक निशाणी आहे एवढेच!"

खुद्द महात्मा गांधींना माझा हा युक्तिवाद किती नापसंत होईल याची मला कल्पना होती. पण माझ्या समर्थनाने त्याचे मात्र समाधान झाले खरे. तेथला मजूरवर्ग आपल्या मानाने कितीतरी सुशिक्षित, जागृत व संघटित आहे. मी मॅन्चेस्टर, पार्क, या भागात हिंडत असता मला किती तरी वेळा कमालीचे आश्चर्य वाटे, गिरणीभोवती जागा असली की लगेच तेथे टेनिसकोर्ट, एखादी लहानशी क्लबरूम, लायब्ररी, हे पाहिले की मला आमच्याकडच्या मजुरांची आठवण येई. बिचाऱ्यांना जेवण्याकरता धड

जागा नाही, तर बाकी गोष्टी कोठल्या ? येथे प्रत्येक गिरणीचा कँटीन म्हणजे जेवण्याखाण्याची व्यवस्था—हा एक मोठाच व महत्वाचा भाग असतो. त्यावर स्वतंत्र देखरेख करणारी माणसे असतात. जेवायची मधली वेळ झाली म्हणजे जेव्हा आपली लहानशी किटली व जेवण घेऊन शेकडो बायका किंवा पुरुष रांगेने एकत्र खातात, तेव्हा फारच गंमत दिसते. शिवाय किती तरी गिरण्यातून औषधपाण्याची तर सोय आहेच; पण त्या शिवाय मजुरांना आजारीपणांतून उठल्यावर चांगल्या हवेवर पाठविण्याची सोय सुद्धा केलेली आहे. पण ह्या सर्व गोष्टी त्यांना सहजासहजी मात्र मिळालेल्या नाहीत. त्याकरिता येथल्या मजुरांना संघटित होऊन किती तरी लढा करावा लागला आहे. तेव्हाच आता कोठे इतक्या सोयी होऊ शकत आहेत. संघटितपणा हा येथला मजूर चळवळीचा विशेष आहे. शिवाय त्याला राजकीय जागृतीचे अस्सल पाणी दिलेले आहे ते वेगळेच. एंजिनिअर्स गिल्ड किंवा स्पिनर्स युनियन यांसारख्या संस्था इतक्या बलवान व संघटित असतात की मालकांची त्याविरुद्ध जावयाची छाती होत नाही. मी एका ट्रेड युनियनच्या ऑफिसचे काम पाहावयास गेले असता तेथल्या तरुण सेक्रेटरीने मला विशेष जिज्ञासा आहे असे पाहून, जवळ जवळ ५० वर्षे संघटना करून, भांडणे करून, त्यांनी काय काय मिळवले हे सांगितले. "तुम्हाला माहीत आहे ? येथल्या मालकांच्या मनात आले तर अजूनही ते बारा तास गिरणी चालवू शकतील. कायदा अजून बदललेला नसल्याने त्यांना कायदेशीर विरोध होऊ शकत नाही. पण आम्ही येथल्या मजूरवर्गाने आमचा दिवस आठ तासावर आणला आहे. तथापि आमचे एवढ्यावर समाधान नाही. अजून किती तरी पुढे जायला पाहिजे आहे!" त्याचा तो आवेश, आत्मविश्वास पाहून मला किती हेवा वाटला!

पुरुष मजुरांची इतकी संघटना असली तरी त्या मानाने बायकांच्यात मात्र संघटनेची तितकी आस्था येथेही दिसत नाही.

"मला तर त्या कधी जाग्या होतील असे वाटतच नाही." एक मध्यमवयीन गिरणी कामगार माझ्याजवळ, बायकांसंबंधी बोलत असता, उद्गारली.

"पहिल्या प्रथम नवीन कामाला लागतात तेव्हा ठीक असते. यूनि-

यनच्या मेंबर होतात. सारे होते. विशेषतः सोशलच्या दिवशी पार्टनर घेऊन नाचण्याची कोण हौस. पण एकदा लग्न झाले की त्यांच्यात रामराहतच नाही. लग्न झाले की लागल्या अळंटळं करायला. मग तितके युनियनच्या कामात त्यांचे लक्षच राहात नाही." ती बाई चांगली अनुभविक असून ट्रेड यूनियनच्या चळवळीत प्रामुख्याने भाग घेत असे. शिवाय चांगली हुषार पण होती. अगदी एका साध्या कामकरी मुलीपासून तिने गिरणीत बराच चांगला दर्जा संपादन केला होता. शिवाय तिला यूनियनच्या कामाची हौस असल्याने तो पुढे चांगलेच नाव काढील असे वाटते आहे, असे माझ्या बरोबरीच्या बाईने सांगितले. तेव्हा मी तिच्याकडे खरोखरच आश्चर्याने पाहू लागले. कारण आमच्याकडे हा देखावा पुरुष कामगारांत सुद्धा दिसत नाही, मग बायकांत कोठून! स्वतःच्या हिंमतीवर आपला मार्ग शोधणारी ही बाई शिडीच्या वरच्या टोकाला नाही पोचली तरी एक दिवस खासच वर जाईल –एला विल्किन्सनसारखी होईल. पण अशा बायका किती असतात!

"आमचे आज रात्री सोशल आहे. याल का?" तिने मोठ्या उत्साहाने मला विचारले व एकदा मजुरांचा सोशल हा काय प्रकार असतो हे पाहावे म्हणून मी कबूल केले.

रात्री तेथे जाते तो किती भिन्न व रंगेल जमाव तो! या सगळ्या कामकरी वर्गाच्या मुली असे म्हणायची माझी तरी छाती नव्हती. अगदी नव्या, अद्यावत फॅशनच्या नाचायच्या पोषाखात एकएक चमकत होती. दिवसा दिसणारी थोडीफार उदासीनता पार मावळून स्त्रीपुरुषांचे चेहरे नुसते फुलले होते. तरुण मुलामुलींचे पाय तर नुसते नाचायकरता वळवळत होते! झाले. एकदाचा पियानो सुरू झाला व कितीतरी जोडपी पटापट एकमेकांचे हात धरून नाचू लागली. बसल्या असतील तर काय त्या म्हाताऱ्या बाया, पुरुष व मी. बाकी सर्व आनंदाच्या, उत्साहाच्या भरात कैफ आल्यासारखी होऊन भराभर एका पाठोपाठ एक सूर झाले की नाचत होती. पण आमचीही मने तेथे उसळलेल्या लाटांनी स्वस्थ बसत नव्हती. कानात सूर घुमत होते व पायही न कळता आपोआप ताल देत होते.

चित्रविचित्र रंगीत कागद व दिवे यानी सजवलेल्या त्या हॉलमध्ये बस-

त्याबरोबर माझ्या मनात येऊ लागले, मजुरांच्या चळवळीचे हे अंग कदाचित् तितके महत्त्वपूर्ण व गंभीर नसेल, पण बाकीच्या खडतर जीवनात असले समारंभ व ठिकाणे म्हणजे खरोखर विसाव्याचीच ठिकाणे होत. त्यांनी जीवनात किती रंग भरला जातो. आपल्या यूनियनने काय केले हे कदाचित् या पोरी पुढे विसरून जातील. पण येथे घालविलेले दिवस त्यांच्या आयुष्यातील एक रम्य काल म्हणून त्यांच्या स्मरणात राहतील—नव्हे त्याकरताच ह्यातील किती तरी यूनियनच्या मेंबर होत असतील!

• • •

* * * * * * * * * * * * * * *

दृश्य सतरावे

मॅन्चेस्टर व आसपास ३

* * * * * * * * * * * * * * *

मनुष्याचे मन मोठे विचित्र असते. या भागात हिंडत असता मला गरीब लोक पाहायला मिळत होते, कामकरी वर्ग मी पाहत होते, पण अजून आपल्याकडल्यासारख्या अगदी अडाणी बायका मला पाहायला मिळाल्या नव्हत्या; त्याकारणाने मला जरा चुकल्यासारखे वाटे. कोठेही गेले तरी विसाव्या शतकाचा मला विसर पडू शकत नसे. स्वित्झरलंडमध्ये असेच झाले. जगद्विख्यात आल्प्सची हिमाच्छादित शिखरे पाहत असताही माझे समाधान होऊ शकले नाही. अगदी उंचातल्या उंच ठिकाणी जा, तेथे सुद्धा हाटेले व बर्फातील खेळायची साधने अगदी हजर. तुम्हाला कधी निसर्गाच्या जवळ असे वाटूच शकत नाही. तसेच येथे झाले.

कापडाच्या किंमतीत फरक असेल, पण तेच ठराविक फॅशनच्या साच्याचे पोषाख, केसांची हजार तऱ्हांची वळणे—यात गंमत असेल, नाही असे नाही, पण यापेक्षा मला काही तरी निराळे पाहायला पाहिजे होते आणि खरोखर ही गोष्ट माझी मलाच मी पाहीपर्यंत कळली नाही.

एके दिवशी अशीच मी एक गिरणी पहायला गेले होते. ती अगदी एका खेड्यात वसली असून तो गावही अजून फारसा वाढला नव्हता. त्यामुळे खेड्यातील जीवन व वातावरण येथे अजून ऐंशी टक्क्यांनी तरी अस्तित्वात होते.

गिरणी लहानशीच होती पण गिरणीत गेल्याबरोबर मला नेहमीच्या वातावरणापेक्षा किती तरी निराळे वातावरण दिसू लागले. तेथे फारशा बायका नव्हत्या. शंभर दीडशे असतील नसतील. पण त्यांच्या पायातील बूट अजून बदललेले नसून जाड चढावासारखे खाडखाड वाजणारे बूट वाजवीतच त्या गोष्यांनी बनविलेल्या रस्त्यांवरून चालत होत्या. चांगले

जाड उबदार कपडे, पांघरायला एक शाल, केसांची वळणेवाकणे नसून सरळ मागे बांधलेले, डोक्याला एक लहानसा उबदार रुमाल बांधलेला— अशा थाटात काम करीत असलेल्या त्या बायकांना पाहून मला भारी मजा वाटली.

मी तेथल्या बाईला म्हटले सुद्धा, "हे अगदीच लहान खेडे आहे वाटते?"

"हो. अगदीच खेडे आहे. शिवाय गिरणी पण अगदी नवीन आहे."

"तरीच इतके दिवस इकडील भागात हिंडत असता आज मला लंडन-मधल्या कपड्यांच्या व बुटांच्या दुकानांचा विसर पडलेला आहे. नाही तर सगळीकडे पोषाख पाहत असता कोणत्या तरी स्टोअर्सचा किंवा हाऊसचा अदृश्य हात मला त्या पोषाखात दिसून येतो."

"छे छे! असला पोषाख! असला पोषाख करायला अजून या बायकांना एक पिढी जावी लागेल! आज तुम्ही अगदी खरे खेडवळ इंग्लंड पाहता आहात!"

आम्ही बोलत होतो एवढ्यात मधली जेवायची सुट्टी झाली. येथे कॅन्टीन वगैरे काही नव्हते. फक्त प्रत्येकीच्या किटलीत चहाचे आधण मात्र एका बाईने ओतले व बायका जेवायला बसल्या. माझ्या बरोबरच्या बाईने मला सांगितले, "या सगळ्या बायकांना नुसते एकत्र जेवायला बसवायला सुद्धा मला जवळ जवळ एक वर्ष लागले. त्या तयारच होत नसत. शिवाय काटे चमचे कोठले! भराभर हातांनी खायच्या. अजून सुद्धा ती पहा, तिला काही काटा धरता येत नाही." म्हणून हळूच तिने मला खूण केली.

मला मात्र गंमत वाटली. आमच्याकडील लोकांप्रमाणेच त्यांचे काम धीरे धीरे चालले होते. घरची शिदोरी पुढे पसरून त्या खात होत्या. तेथेच घरच्या गप्पागोष्टी चालत असाव्यात. "यांना लिहितावाचता येते?" मी विचारले. "हो, तरुण पोरीना येते. पण त्या म्हाताऱ्यांना नाही येत. त्या आपल्या नावाच्या जागी क्रॉसच काढतात!" इंग्लंडातील अशिक्षित गांवढळ भाग पाहण्यात मला मजा वाटत होती! आपण या देशातील

चांगले पाह्यला व ऐकायला इतके सरावलेले असतो की तेथेही असा प्रकार असू शकेल ही कल्पना होत नाही. मी गिरणीच्या बाहेर आले. बाहेरून काही मुली आपल्या आयांचे जेवण घेऊन येत होत्या. थंडीने गाल लाल झालेले, पायात जाडे बूट, अंगात जाड गरम कफनीसारखे अंगातले, केस स्वैर उडत असलेले—मला वर्डस्वर्थच्या कवितेची आठवण झाली.

मी मोटरमध्ये बसून हळूहळू जाऊ लागले. चांगले ऊन्ह चमकत होते. भोवतालच्या भागातून काही म्हाताऱ्या बायका काटक्या जमा करीत हिंडत होत्या—

मला गिरणीच्या दृष्टीने तेथे फारसे पाहण्याजोगे नव्हते. पण तेथला तो शांत देखावा व खेडवळ वातावरण मला अजून दिसते आहे.

• • •

* * * * * * * * * * * * * *

दृश्य अठरावे

हेल्सनोर !

* * * * * * * * * * * * * *

वास्तविक वाळवीने खाल्लेल्या पिवळ्या लहानशा कापडाच्या तुकड्याप्रमाणे नकाशांत दिसणारा जर्मनीच्या उत्तरेस असलेला एक बेटांचा समूह यापलीकडे डेन्मार्कची काही सुद्धा कल्पना माझ्या डोळ्यापुढे येत नसे. पण लंडन स्कूलमध्ये अभ्यास करीत असताना मात्र माझे डेन्मार्कविषयी बरेच कुतूहल वाढले. औद्योगिक क्रांतीच्या तडाक्यात सारे युरोप बदलत असता लहान दुकानदार, लहान कारखानदार, लहान शेतकरी सर्व नाहीसे होऊन सर्व बड्या गोष्टींचे साम्राज्य चालू असता, जुने व नवे यातला बरोबर मध्य गाठून मोठ्या जोमाने टिकाव धरणारे चिमुकले आदर्श राष्ट्र म्हणून मी त्याकडे पाहू लागले. त्यामुळे युरोपच्या यात्रेत डेन्मार्कमध्ये पण थोडे दिवस घालवायचे असे मी ठरवले.

सरते शेवटी उन्हाळ्यामध्ये मी आणि आणखी दोघी हिंदी विद्यार्थिनी एके दिवशी कोपनहेगनला उतरलो.

रात्री प्रवास करताना मध्येच गाडी बोटीवर चढली कशी आणि आम्हाला अलगद डेन्मार्कमध्ये उतरवून घेऊन चालली कशी हा चमत्कार पाहाण्याची मला भारी उत्कंठा होती. पण प्रवासाच्या शिणाने हा सर्व प्रकार पाहून सुद्धा झोपेत अर्धवट पाहिल्यासारखाच वाटला. मात्र सकाळी चांगली उन्हे पडल्यावर आमची गाडी कोपनहेगनला पोचली व आम्ही अगदी पुऱ्या जाग्या झालो.

प्लॅटफार्मवर उतरताच आता हेल्सनोरला जाणारी गाडी कोठे व कशी गाठायची हा आमच्यापुढे प्रश्नच पडला. 'हेल्सनोर-हेल्सनोर' म्हणून विचारावे तर आमच्या उच्चारामुळे त्यांना कळत नसे व कळून त्यांनी काही सांगितले तरी आम्हाला त्याचा बोध होत नसे. आता काय करावे या

विवंचनेत आम्ही असता एक कॅमेरा घेतलेला गृहस्थ व बाई आम्हाला परकी असे पाहून आमच्याच रोखाने येत असलेली दिसली.

"महाराज, आपल्याला इंग्रजी कळते का?"

"हो समजते, कां?"

"आपण हेल्सनोरला जाणारी गाडी कोणत्या प्लॅटफार्मवर थांबते ते कृपा करून सांगाल काय?"

"माझे जर एक काम केलेत तर सांगेन."

परक्या देशात एका तिऱ्हाईत गृहस्थाची अशा प्रकारची विनंती ऐकून जरा गंमत वाटली. पण त्याला कोठला धीर निघायला. "मला तुमची मुलाखत पाहिजे आहे." त्याने एकदम सांगून टाकले.

उभ्या जन्मात आमच्यावर आलेला मुलाखतीचा हा पहिलाच प्रसंग होता. पण युरोपच्या उन्हाळ्यांतले मजेदार दिवस, त्यातून रोज नवी ठिकाणे, नवे चेहरे व नवे मासले पाहता पाहता आमच्या विनोदाला एक प्रकारची चांगलीच धार चढली होती. त्यांतही डेन्मार्कमधले सुखकर उत्साहवर्धक वारे सकाळच्या प्रहरी अंगावर खेळत असता आम्ही काय वाटेल ते साहस करायला तयार झालो असतो. मग हे तर काय! आम्ही हसून म्हटले, "विचारा काय हवे ते!"

"तुम्ही हिंदी आहात—नाही?"

"हो. आम्ही हिंदुस्थानातल्याच आहो."

पुढच्या प्रश्नाने मात्र आम्ही गार झालो.

"तुम्ही राजकन्या आहात काय?"

आता मात्र आमच्याने हंसल्यावाचून राहवेना.

"राजकन्या असतो तर अशा लहानशा बॅग्ज घेऊन कशा उतरलो असतो? मोठा लवाजमा, हत्ती, उंट, निदान सामानाच्या शंभर पेट्या तरी खास बरोबर आणल्या असत्या." आमच्यापैकी एकीने उत्तर दिले.

"आम्ही अगदी साध्या विद्यार्थिनी आहोत."

"अस्सं! मग येथे काय उद्देशाने आला?" त्यानेही हसत हसत विचारले.

"तुमच्या देशातील फोक स्कूल, सहकारी तत्वावर चाललेले शेतकरी संघ वगैरेविषयी आम्ही पुष्कळसे वाचले म्हणून ते पाहण्याकरता मुद्दाम आलो आहो."

"फार चांगले. तुम्ही हेल्सनोरला जाणार काय? तेथल्या आंतर—राष्ट्रीय संस्थेतील मंडळी तुम्हाला हे चांगले दाखवतील. 'बरं, महात्मा गांधींविषयी मला थोडं सांगता का? त्यांची शेळी कशी आहे?"

"शेळीबद्दल माहिती नाही." एकीने हंसत उत्तर दिले. "मात्र त्यांची प्रकृती चांगली आहे."

"तुम्हाला त्यांचे शांततामय प्रतिकाराचे तत्व पटते काय?"

आपण राजकारणांत तर शिरत नाहीना? एकीला शंका आली व ती गप्प बसली.

"हो. न पटायला काय झाले? दुसरा आम्हाला इलाजच नाही." मी उत्तर दिले.

"पण ब्रिटन त्याने बधेल असे तुम्हाला वाटते?"

"आम्हांला फार असंतुष्ट करूनही त्यांना चालावयाचे नाही. त्यामुळे बधावेच लागेल."

"अच्छा, तुमची वेळ होत आली, तुमची गाडी मी चुकवू इच्छीत नाही." असे म्हणून त्याने आम्हाला गाडीत बसवून दिले, आमचे आभार मानले व तो चालता झाला.

आम्ही मात्र मुलाखतीची—विशेषतः राजकन्यांविषयी त्याच्या कल्पनेची —आठवण करीत हसत हसत हेल्सनोरची वाट चालू लागलो.

तेथे गेल्यावर जेव्हा का 'तीन हिंदी सौंदर्यदेवता' म्हणून आमच्या चमकणाऱ्या दातांचे, कुड्यांचे व पोषाखाचे वर्णन करून काढलेला फोटो आम्ही पाहिला, तेव्हा मात्र आम्ही पोट धरधरून हसलो.

मिस मेयोच्या पुस्तकातील दोन चार महिन्यांच्या अनुभवाने रेखाटलेली हिंदुस्थानची हिडीस चित्रे पाहून, चार आठ दिवसांच्या वरवरच्या पाहाण्याने, भाषा समजत नसता, आम्ही एखादा देश पाहिला अशी कोण फुशारकी मारू शकेल? निदान मला तरी तसे म्हणता येत नाही.

अर्थात् एक फरक मोठाच आहे. आम्ही पाश्चात्य देशातून गेलो की तेथे प्रेक्षणीय तेवढेच पाहून येतो. पण पाश्चात्य स्त्री-पुरुष मात्र जेव्हा आमच्या देशात येतात तेव्हा प्रेक्षणीय असेल ते तर पाहतातच, पण त्याहीपेक्षा जे अप्रेक्षणीय असेल ते पाहण्याची त्यांची खरी उत्कंठा असते. सुधारलेले हिंदुस्थान त्यांना पहायला नकोच असते. रानटी, अप्रागतिक असेच हिंदुस्थान पाहण्यासाठी त्यांचे डोळे तहानेलेले असतात व आपल्याकडल्या मिशनरी संस्था किंवा दुसरे असेच इतर सेवासंघ त्यांना असल्या गोष्टी भरपूर दाखवून त्यांचे समाधान करतात.

मी काम करीत असता असले प्रसंग माझ्यावर पुष्कळ वेळा आले आहेत.

एखाद्या महिना दीड महिन्याच्या यात्रेकरिता या बायका हिंदुस्थानात यावयाच्या. आम्ही त्यांना शहरातील अगदी घाणेरड्या भागात घेऊन जावयाचे व मग ते पाहत असता त्यांनी 'Oh! How lovely! Charming!' असे उद्‌गार काढावयाचे. खरे म्हणजे अशा रीतीने आमच्यातील गटारघाण त्यांना दाखवायचे माझ्या जिवावर येई. पण नाइलाज असे. त्यातून असे उद्‌गार ऐकले की माझा संतापच होई. एकदा माझ्या एका सहकारी भगिनीने 'केवळ सवयीमुळे त्या असले उद्‌गार काढतात झाले!' असे सांगितल्यापासून मी जरा शांत झाले होते. पण लंडनला आल्यावर हिंदुस्थानातून आलेल्या असल्या बायकांची व्याख्याने ऐकण्याचा मला प्रसंग आला आणि मला जी शंका होती तीच अगदी बरोबर ठरली.

बाकी पाहिलेला सुधारलेला हिंदुस्थान त्यांच्या स्मृतीतून केव्हाच गळून पडला होता. त्यांच्या व्याख्यानाचा सारा भर, सर्व हिंदुस्थानात अजून इतक्या तऱ्हेची परिस्थिती नांदते आहे व सरकार आणि मिशनरी ती सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत, या मुद्यावर होता. या एका सुरावरून अशी व्याख्याने पुढे कशी होत असतील याची कल्पना येईलच. त्यामुळे कित्येक वेळा आमच्याबरोबर शिकणाऱ्या इंग्रज विद्यार्थिनीही अगदी गार होऊन 'तुमच्या देशातील तुम्ही कोणी तरी अत्यंत पुढारलेल्या, पाश्चात्य बनलेल्या वर्गातल्या असाल, नाही?' असे विचारीत!

असो. अर्थात् डेन्मार्कला असे काही पाहावयास मी गेले नव्हते व गेले असते तरी ते फारसे दिसले नसते. त्यामुळे डेन्मार्कला मी गेले म्हटले की एखाद्या चित्रफलकाप्रमाणे तेथल्या लहानमोठ्या काही प्रसंगांची दृश्ये माझ्या मनश्चक्षूंसमोर उभी राहतात व त्यांनाच मी डेन्मार्क म्हणते.

हेल्सनोरच्या आश्रमात आम्ही उतरलो. तेथल्या मंडळीच्या किंचित् गावठी पण मनमोकळ्या व प्रेमळ वागणुकीने आल्याबरोबरच आम्हाला फार बरे वाटले. अगदी हिंदुस्थानात असल्यासारखे वाटत होते.

पहिल्याच दिवशीची गोष्ट. मी माझ्या खोलीच्या खिडकीतून बाहेर पाहात होते. तेथल्या शांत, रम्य, हिरवळीने प्रसन्न झालेल्या वातावरणाने मला किती तरी आनंद होत होता. सभोवार खरोखर पाचूप्रमाणे उन्हात चमकत असलेली हिरवळ, मध्येच रंगीत फुलांची शोभा. विशेषतः वायु-लहरीनी फुले खाली वर करू लागली की नाकातील नथ उडवीत चालणाऱ्या बायकांप्रमाणे फारच गंमत येई. त्यातही तीन पांढरी शुभ्र करडे त्याच हिरवळीवर खेळत असलेली पाहून मला त्यांच्याबरोबर खेळण्याची फार इच्छा झाली. पण एवढ्यात अगदी जवळ एकदम दिसू लागलेल्या मनोहर दृश्यामुळे मी जागच्या जागी थबकले. उन्हात चमकणारी हिरवळ, त्यातून केलेली रंगीबेरंगी फुलांची पखरण व अशा रम्य पार्श्वभूमीवर तिघी तरुण डॅनिश मुली हातातल्या टोपलीत कसलीशी फळे घेऊन संस्थेकडे येत होत्या. मला वाटते, त्यांचे वयही अठरा, एकोणीसच्या पुढे नसेल. पण त्यांची ती उंची, भरदार सतेज आंगकाठी, अत्यंत गौरवर्ण, स्वैर उडत असलेले सोनेरी केस, सकाळच्या दंवाच्छादित अर्धस्फुट गुलाबपुष्पाप्रमाणे सतेज गुलाबी गाल आणि खरोखर आकाशाशी स्पर्धा करणारे निळे डोळे—मी त्या मनोरम दृश्याकडे पाहातच राहिले.

फ्रान्स, इंग्लंड, या देशातून मी सौंदर्याची परेड पाहिली होती. वेषभूषेच्या आधुनिक सर्व साधनानी सज्ज होऊन जणू कुसुमधनू रोखल्याप्रमाणेच त्या आमच्याकडे पाहत पाहत स्टेजवरून मिरवत. पण त्यातल्या एकीतही

ह्या सौंदर्यातील सहजपणा, ताजेपणा, टवटवी दिसून आली नव्हती. एखादे ताजे फूल खुडून पुढे धरावे इतका ताजेपणा, टवटवी त्यांच्या सर्वांगावर दिसत होती.

त्यांचे झगे अगदी साधे होते. नव्हे खेडवळच असतील. पण त्यांना पाहून मात्र 'दूरीकृताः खलु गुणैः उद्यानलताः वनलताभिः' या दुष्यंतवचनाची मला आठवण झाली.

पुढे मला आढळून आले की असे दृश्य काही येथे दुर्मिळ नाही. भोवतालच्या फुलात आणखी हीही कित्येक फुले आपल्या तेजाने ओसंडत येथे चोहोकडे विहरत आहेत!

मला वाटते मी पुरुष असते तर खरोखर एखाद्या डॅनिश मुलीशीच लग्न केले असते.

शेतकरी आणि सुखी हा शब्दप्रयोगच आपल्याकडे किती दुर्मिळ झाला आहे. गरीब बिचारा रात्रंदिवस कष्ट करून काळ कंठीत असताही दरवर्षी कर्जात खचतच जाणारा एक मनुष्यप्राणी अशीच आपली त्याविषयी समजूत होऊन बसली आहे. आणि ती खरीही आहे. त्यामुळे सुखी शेतकऱ्याचे कुटुंब पाहणे म्हणजे खरोखर एक अदभुत प्रकार पाहत असल्यासारखे मला वाटत होते.

आम्ही ज्याच्याकडे गेलो होतो तो काही फारसा मोठा शेतकरी नव्हता, लहानच होता. पण आमच्याकडे शेतकऱ्याच्या तोंडावर दिसणारे दैन्याचे दीन, उदासवाणे चित्र त्याच्या तोंडावर दिसत होते काय! बाकी का दिसावे? त्याचे जीवन आमच्याकडील शेतकऱ्याप्रमाणे परिस्थितीने करपून गेलेले नव्हते. लहानशा पण जोमाने वाढणाऱ्या रोपट्याप्रमाणे त्याचे आयुष्य सुखाने व जोमाने वाढत होते. मग त्याच्या तोंडावर उदासपणाची कळा कशी दिसणार? मोठ्या अभिमानाने त्याने आपल्या गाई, कोंबड्या, डुकरे आम्हाला दाखविली व हसत म्हणाला, "तुम्ही ब्रिटनमधून आला— नाही?"

"मग तुम्ही आमचे लोणी, अंडी आणि बेकन खाल्लेच असेल! तुम्हाला माहीत आहे..." असे म्हणत एक लहानसे पांढरे, गुलाबी दिसणारे डुकराचे पिलू पटकन त्याने हातात उचलले व गोंजारीत आमच्याकडे पाहून डोळे मिचकावीत हसत हसत म्हणू लागला, "ब्रिटनला सकाळचा ब्रेकफास्ट आम्ही पुरवतो. Oh! पण ते लबाड लोक आहेत. ते अलीकडे आमचा व्यापार कमी करून स्वतःचा खप वाढावा म्हणून तेथल्या शेतकऱ्यांना किती मदत करीत आहेत! लबाड, पक्के कावेबाज लोक!' असे म्हणत त्याने पिलू खाली ठेवले.

जशा गाई, म्हशी, कोंबड्या, बकऱ्या, तशीच डुकरे पाळावयाची ही कल्पनाच आपल्याकडील डुकरांच्या आठवणीने मला कशीशीच वाटली होती. त्यामुळे डुकरांच्या गोठ्यात लहान लहान छोटीशी पांढरट गुलाबी डुकरे पाहून मला खूप गंमत वाटली. मात्र एवढे खरे की डुकरे अत्यंत स्वच्छ राखलेली होती. पण याहीपेक्षा खरी गंमत कोंबडवाड्यात दिसली. चोहोबाजूला जाळी लावून एक लहानसे आवारच तयार केले होते व त्यात निदान शे दोनशे कोंबडी तरी दिसत होती. मध्यभागी एक तरुण मुलगी हातात मक्याचे टोपले घेऊन मोठ्या शिताफीने चारी बाजूल दाणे भिरकावी व तिने फेकल्याबरोबर साऱ्या कोंबड्या त्या बाजूला धावत जाऊन दाणे टिपण्याकरिता एकमेकींवर 'कुक-कुक' करीत तुटून पडत. कोंबडे मात्र मध्येच दिमाखाने उभे राहून एक पाय व मान वर उचलून मध्येच या भांडणात लक्ष घालून एखादीला नीट ताळ्यावर आणून, जणू काय खाऊ द्या साऱ्या पोरीबाळींना, असे म्हणताहेत, अशा दिमाखाने प्रथम इकडे तिकडे पाहात व मग एखादा दुसरा दाणा टिपीत. "पहा, पहा, त्याची ऐट पहा!" मी एकदम उद्गारले.

त्यासरशी, "तो स्त्रीदाक्षिण्य दाखवतो आहे!" तोडक्या मोडक्या इंग्रजीत त्या मुलीने उत्तर दिले.

"ही माझी मोठी मुलगी." शेतकऱ्याने आम्हांला तिची ओळख करून दिली. एका हाताने आपले केस बाजूला करीत लाल लाल झालेल्या हसऱ्या चेहऱ्याने तिने आम्हांला अभिवादन केले.

"तुमची मुलगी इंग्रजी बोलते अं!"

"होय मिस. ती शाळेत शिकते. तुम्ही पहा, आमचा देश इतका लहान आहे की आम्हांला आमच्या भाषेखेरीज दोन तरी आणखी भाषा माहीत व्हाव्या लागतात; त्याशिवाय आमचे चालायचेच नाही." त्याच्या या उत्तराने मात्र फ्रांस किंवा जर्मनी या देशांपेक्षा येथे बऱ्याच लोकांना थोडेथोडके का होईना, इंग्रजी कसे कळते याचा मला उलगडा झाला.

थोड्या वेळाने गाईचा गोठा पाहून आम्ही घरात आलो. घर पाहून मात्र माझे आश्चर्य फारच दुणावले. चांगल्या जाडजूड पण जुन्या तऱ्हेच्या फर्निचरने ते घर फारच व्यवस्थित शृंगारले होते. शेतकऱ्याच्या घरात आणि एवढे सामान! असे वारंवार माझ्या मनात येत होते. अखेर माझ्याने राहवेना.

"तुमच्यातील अगदी गरीब लोकांच्या घरातून सुद्धा एवढे सामान असते काय?" माझ्या बरोबरच्या एक डॅनिश गृहस्थाला मी विचारले, ते शेतकऱ्याने ऐकले.

"Certainly Miss! यात जास्त असे काहीच नाही. मी काही श्रीमंत नव्हे. अगदी साधा शेतकरी आहे."

"मग तुम्हांला मधले दलाल पिळून काढीत नाहीत? आमच्याकडे तर शेतकरी म्हणजे दारिद्र्याचे व फोल कष्टाचे एक गमक होऊन बसला आहे."

"पण आम्ही इंग्लंडप्रमाणे लहान शेतकऱ्याला नाहीसा करून मोठ्या जमीनदाराची घरभरणी केलेली नाही. आम्ही लहान लहान आहोत खरे, पण लहानमोठे सारे एकत्र जमून संघटनेच्या तत्त्वावर आमच्या हक्कांना व हितसंबंधाना जपत असतो. आमचा माल कोठे कसा पाठवायचा, भाव काय ठेवायचे हे सारे आमचे लोक ठरवतात. आमच्या सर्वांचा माल एकत्र येतो व नंतर विकला जातो, पण त्यामुळे आमचा नफा एकाच्या खिशात जात नाही. लहान मोठे सारे यथाशक्ती फायदा खातो आणि फिरून चांगले जगतो.

"तुम्हाला माहीत आहे? माझ्या देशात नवकोटनारायण रॉकफेलर

नसतील, नव्हे नाहीतच. पण जिवंतपणी करपून टाकणारी गरीबी पण फारशी आढळणार नाही."

त्याचे वाक्य अगदी साधे होते. पण त्यात किती अभिमान भरला होता! आणि का भरू नये? आज आमच्यात भुकेने मरणारे गरीब नाहीत, असे संपन्न व सर्वशक्तिमान् युरोपियन राष्ट्रांपैकी एखादे राष्ट्र किंवा अमेरिका सुद्धा म्हणू शकेल काय? खरोखर हिंदुस्थानातल्या लहानशा प्रांताएवढे सुद्धा ते राष्ट्र नसेल. पण आपसातील संघटना व सहकार्य यांच्या जोरावर तेथला शेतकरी वर्ग आज सुखी आहे. सगळ्या जगात 'गरीब बिचारा लहान शेतकरी' असे उद्गार ऐकू येत असता हे काय कमी आहे?

आज माझ्यापुढे दिसणाऱ्या या शेतकऱ्याच्या मागे सारी संघशक्ती उभी आहे. त्यामुळे त्याची मुद्रा दीन, असहाय्य तर नाहीच; उलट अभिमानाने व ताठ्याने तो वावरू शकत आहे. आमच्याकडे कधी असे होईल काय!

थोड्या वेळाने संध्याकाळ टळली. आकाशात सुवर्ण (मधु?) चंद्राची प्रभा फाकली. जाता जाता शेताच्या मधून लहान लहान बैठ्या घरांच्या खिडकीतून चौकटीत बसवल्याप्रमाणे कौटुंबिक जीवनाचे निरनिराळे देखावे दिसू लागले. माझ्या डोळ्यापुढे मात्र शेतकऱ्याचे सुखी कुटुंब, कोंबड-वाड्यातील ती मुलगी हीच किती वेळ दिसत होती!

आईच्या मऊ मऊ कुशीत एखादे मूल आंग घाशीत पडावे–अगदी तसे त्या हिरवळीवर उठपड उठपड करता करता मला वाटत होते. भोवती कितीतरी स्त्रीपुरुष अर्धवट पडून, अर्धवट बसून एकमेकाशी गप्पा करण्यात दंग झाले होते. काहीजण तर हिरवळीवर संपूर्ण पडून तिचा मनमुराद आस्वाद घेत होते. मलाही तसे करण्याची इच्छा होती, पण हिंमत मात्र होत नव्हती. त्यामुळेच पाय पसरीत, अर्धवट रेलून पुनः पुनः मऊ मऊ हिरवळी-वर गाल ठेवून पडण्याच्या मोहापासून स्वतःला सावरीत मी एक गवताची काडी चावीत इकडे तिकडे पाहत होते, ऐकत होते. माझ्या हिंदी मैत्रिणींच्या भोवती चांगलाच गराडा पडला असून एखाद्या किल्ली दिलेल्या यंत्राप्रमाणे

त्यांचा शब्द एकसारखा मला ऐकू येत होता. माझ्याही भोवती प्रथम माणसे जमली होती. पण त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यापेक्षा मला अगदी अबोलपणे नुसते एकटे हिरवळीवर पडून राहणे बरे वाटत होते.

हिंदुस्थानात मी वाढलेल्या ठिकाणच्या गावठी पण शांत वातावरणाकरता माझे मन किती भुकेले आहे याची मला त्या वेळी कल्पना आली. मी प्रश्नांची उत्तरे देण्याचे सहजपणे टाळता यावे म्हणून दातानी गवताचे एक पान चावीत चावीत माझ्या मैत्रिणींच्या पाठीशीच पडून राहिले.

माझे डोळे वरच्या आकाशाच्या नीलिम्याकडे लागले होते. सर्व शरीर भोवतालच्या थंड, सुखकर वायुलहरीनी व खालच्या हिरवळीने आईच्या मांडीवर निजलेल्या मुलाप्रमाणे सुस्तावले होते. कान मात्र सभोवार होत असलेला नादध्वनी श्रवण करीत होते.

"मिस मेयोने लिहिलेले ते सारे खरे आहे का? हिंदुस्थानात रस्त्याने सर्प हिंडत असले तर तुम्हांला फिरायला मोठी भीती वाटत असेल नाही? महात्मा गांधीना हिंदुस्थानात काय समजतात? तुमच्याकडे बालपणी लग्ने होतात ना? मग मोठ्या कुमारिका फारच थोड्या दृष्टीस पडत असतील. तुम्ही काय सारे शिक्षण इंग्लंडात घेतले? तुम्ही आता बुरखा वापरीत नाही, पण घरी तुम्हांला बुरखा घेऊन चालावे लागत असेल नाही? ही तुमच्या कपाळावरची तांबडी खूण काय तुमच्या धर्मपंथाची निदर्शक आहे?—" अत्यंत कुतूहलाने विचारलेले असे, एक की दोन, अनेक प्रश्न सारखे इकडून तिकडून माझ्या कानावर पडत होते. त्यांना उत्तरे देणे शक्यच नव्हते. कारण खरोखर प्रश्नांची सरबत्तीच होती ती. इतक्यात—"Miss, तुम्ही फार शांत, प्रसन्न दिसता आहा." एका वयस्क डॅनिश गृहस्थाने मला उद्देशून काढलेले उद्गार मला ऐकू आले.

"हो खरंच. आज मला अगदी प्रसन्न वाटत आहे. शिवाय येथल्या प्रेमळ व शांत वातावरणाने घरची पण आठवण होत आहे."

"तुम्हाला आमचा देश आवडला?"

"खरंच, फार आवडला."

"मला तुमचे लोक आवडतात. शिवाय हे पहा, महात्मा गांधीना

माझ्या वतीने सांगा, की तुमच्या प्रयत्नाविषयी आमची पूर्ण सहानुभूती आहे!"

"भेटले तर अवश्य सांगेन." किंचित हसत मी उत्तर दिले.

"पण हे पहा, तुम्ही म्हणता, तुमचे राष्ट्र तर जवळ जवळ अर्ध्या युरोप खंडाएवढे आहे. तर तुमच्या देशात असले तरी असे इंग्रज किती असतील? तुम्ही बंड करून त्यांना फेकून का देत नाही?"

"सारे खरे. पण... बंड केले तरी आम्हाला एखादा मोठा चाकू किंवा जाड काठी सुद्धा परवानगीशिवाय वापरता येत नाही. आम्ही शस्त्रहीन लोक आहो. अशा वेळी सशस्त्र बंडाचा काय उपयोग! सगळे लष्कर त्यांच्या ताब्यात."

"होय. तेही खरंच." असं म्हणून किंचित् मात्र तोही माझ्यासारखाच समोरच्या क्षितिजाकडे पाहू लागला.

थोड्या वेळाने त्याने आपल्या खिशातून कायसे काढले.

"तुम्ही आपले नाव मला माझ्या बायबलमध्ये लिहून देता का?"

"हो. त्यात काय आहे?"

मी त्याच्या हातातले बायबल घेतले व माझे नाव लिहिले. त्यानेही त्याचा उच्चार शिकून घेतला व हळूच बायबल खिशात ठेवीत त्याने खिशातून एक लहानसे खिसमस कार्डासारखे चित्र काढले.

"डेन्मार्कची आठवण म्हणून तुम्ही हे ठेवाल?"

"हो, फारच आनंदाने." मीही उत्तर दिले.

"तुम्हाला माहीत आहे, मी कोणाची नावे बायबलमध्ये लिहून घेतो?"

मला माहीत नव्हते. अर्थात मी प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडे पाहू लागले.

"मला जी माणसे आवडतात त्यांची."

"Thank you," म्हणत असता मला हसू आले. तोही मनापासून हसला!

• • •

* * * * * * * * * * * * * *

दृश्य एकोणिसावे

मिस्टर ब्राईट

* * * * * * * * * * * * * *

"छे बुवा. आपल्याच्याने नाही एवढी सारी पुस्तके वाचणे होत. आणि प्रश्न तर लिहायचा आहे उद्या." माझी खुर्ची विस्तवाजवळ ओढीत तक्रारीच्या स्वरात मी बोलू लागले.

"कशावर प्रश्न लिहायचा?" मि. रॅम्सडे हाल (बहुधा ते रामदयाळ असावे. कारण हे गृहस्थ ब्रिटिश गियानात स्थायिक झालेल्यांपैकी होते). यांनी मला विचारले.

"काही नाही. महायुद्धानंतर कायद्याच्या दृष्टीने ट्रेड यूनियन चळवळीची पीछेहाट झाली की पाऊल पुढे पडले हे मला लिहायचे आहे आणि त्याकरिता विशेषतः खाणीतल्या मजुरांचा मोठा संप झाला ना, त्या वेळची मला माहिती पाहिजे आहे."

"वाः! तुमच्याजवळ एक पक्का माहितगार असताना का पंचाईत करता? मि. ब्राईटला विचारा, तो चांगला पुढाकाराने त्या संपात त्या वेळी भाग घेत होता म्हणे."

"हो तर! आज संपाची माहिती पाहिजे म्हणून ब्राईटला विचारते. उद्या Social legislation (समाजविषयक कायदे) विषयी काही लिहायचे झाले की एक्सप्रेस डेअरीमधल्या तुमच्या त्या जॉयसला विचारते! हवी तेवढी माहितीच माहिती!"

"छे छे, तसे नव्हे, तो खरोखर त्यात पुढारी होता."

"तो सांगतो म्हणून ना!" मी फिरून एकवार हसले व पुस्तके आवरून तासाला जायची तयारी करू लागले.

दुसरा दिवस उजाडला. अजूनही माझा प्रश्न तसाच लिहायचा पडला होता. त्यावरची माहिती वाचायला मला मुहूर्तच लागला नव्हता. कशी-

बशी एकदाची पुसके जमवून कागद गोळा करून मी अभ्यासाला बसू पाहत होते. एवढ्यात मि. ब्राईटची नेहमीची टकटक ऐकू आली.

"हं, आत ये ब्राईट." नेहमीप्रमाणे मी उत्तर दिले. हातात एक हूव्हरचा केर काढायचा पंप, ब्रश, खांद्यावर फडके, तोंडात एक लठ्ठशी पाईप, अशा थाटात मि. ब्राईटची स्वारी आत आली.

"मिस्, मी खोली आता झाडू की मग झाडू?"

"घे घे, आताच झाडून घे. मग एकदम बरे अभ्यासाला बसायला." मी उत्तर केले व पुस्तके बाजूस सारून खोलीतल्या विस्तवाशी जाऊन शेकत उभी राहिले.

"फार थंडी आहे नाही ब्राईट?"

"छे, ही काहीच नाही. अजून किती तरी पडायची आहे." एका हाताने हूवर ब्रश फिरवता फिरवता तोंडातील पाईप काढून ब्राईटने उत्तर दिले.

आदल्या दिवसाचे संभाषण माझ्या स्मरणात अजून ताजे होते. हा नुसता झाडू मारणारा इसम नसून त्याने संपात सुद्धा भाग घेतला होता, ही माहिती काही कमी कुतुहलाची नव्हती. मी ब्राईटकडे लक्षपूर्वक पाहू लागले. त्याची ती ठिगळे दिलेली विजार, किंचित मळका सदरा, वर बाह्या खोवलेला त्यावरचा तसाच पुलोव्हर, त्यामधून वर उठून दिसणारा लालसर चेहरा—छे! तो पाहून तर याने संपात काय काम केले असेल, याचाच मला प्रश्न पडला. त्याचे ते भरदार रुंद मनगट, अंगमेहनतीने खूप कसलेली शरीराची ठेवण, तो चांगला काम करणारा असावा, याची साक्ष देत होते. [illegible] पण त्याचा भकास व कदाचित दारूने बथ्थड झालेला चेहरा मात्र मजुरी-पलीकडे त्याने काही केले असेल असे सांगायला तयार नव्हता.

"ब्राईट! मागे जेव्हा कोळशाच्या खाणीतल्या मजुरांचा संप झाला आणि त्याबरोबर सगळीकडे संप पुकारला गेला, तेव्हाची तुला काही माहिती आहे?"

"हो हो तर—माहिती म्हणजे काय! मी त्यांच्यात कार्य केले आहे. मी एका ठिकाणच्या संघाचा पुढारी होतो. संप कमिटीत सुद्धा होतो मी. मला चांगलीच माहिती आहे."

"अस्सं, अस्सं! तरीच मला कोणी तरी सांगितलं, कशाला वाचता पुस्तकातून, ब्राईटला विचारा, तो सांगेल ते सारं."

मी हळू हळू ब्राईटला प्रश्न विचारायला सुरुवात केली व त्याने मला. अगदी पाहिजे ती नसली तरी इतर व गमतीची माहिती पुष्कळ सांगितली हं. सांगतो खरा गंमतीने. हुषार आहे. निदान आपल्या वेळी तरी खास चांगला हुषार असला पाहिजे! असेल सुद्धा त्यांच्या एखाद्या T. U. (ट्रेड यूनियन) चा पुढारी. सध्या मात्र त्याला पिण्यापेक्षा फारसे काही माहीत नसावे,—अशी माझी समजूत होऊ लागली. पण आज माझ्या प्रश्नाने त्याला मात्र चांगलाच जोर चढला. माझे प्रश्न थांबवून मी हळू हळू कागद काढून लिहायची तयारी करू लागले.

ब्राईटने भराभर माझे टेबल साफ केले. घाण पाणी ओतून टाकले. बिछाना नीट केला व अखेरचा हात म्हणून एकवार इकडे तिकडे जरा झटकून स्वारी पाणी पिण्याचा लोटा भरून आणण्यास गेली.

मी ब्राईटला एखाद्या सामान्य नोकरापेक्षा कधीच जास्त समजले नव्हते. त्यामुळे त्याने कधी हिंदुस्थानविषयी मला काही प्रश्न विचारले तरी फारशी उत्तरे न देता मी फक्त त्याला तोडून टाकीत नसे एवढेच. पण आज मात्र मी त्याच्याकडे सामान्य नोकरापेक्षा थोड्या अधिक योग्यतेच्या समजुतीने पाहू लागले.

पाण्याचा लोटा घेऊन ब्राईट आत आला. त्याने टेबलावर पाणी झाकून ठेवले. चोहीकडे एकदा फिरून सर्व नीट आहेना अशी खात्री करून घेतली आणि प्रश्न विचारायच्या निमित्ताने माझ्याशी फिरून बोलायला सुरुवात केली. "काय, तुम्ही केली सुरुवात अभ्यासाला–?"

"मग काय, करायला नको का? अभ्यास न करून कसे चालणार!"

"By the way (आपले सहज म्हणून), बाई, तुम्हांला या संपाच्या माहितीशी काय करायचे? तुम्ही येथे कसला अभ्यास करता?" त्याच्या मनात खवखवत असलेला प्रश्न त्याने अखेर विचारलाच.

मी त्याला थोडक्यात येथे का आले, Social Science (समाजशास्त्रा) चा कसा अभ्यास करते आहे हे सांगितले.

"मग तुम्ही येथून गेल्यानंतर तुम्हांला चांगली मोठी नोकरी मिळेल तर!"

"नोकरीच कशाला? नोकरी मिळाली तर ठीकच. पण नाही मिळाली तरी माझ्या देशात केवढे तरी काम करता येईल!"

ब्राईट माझ्या ड्रेसिंग टेबलावरील बारीकसारीक वस्तू नीट पुशीत माझ्याशी बोलत होता. त्याने माझ्याकडे पाहिले नी म्हणाला, "Oh, you are one of those few who can afford (अस्से, ज्यांना स्वतःचे पुरेसे आहे अशा थोड्या लोकांपैकी तुम्ही आहा.)" आणि हळूहळू नकशी कामातील धूळ तो हातातील फडक्याने जास्त बारकाईने पुसू लागला.

ब्राईट खोली स्वच्छ ठेवीत असे, पण इतकी बारकाईची स्वच्छता फक्त बोलण्याचे निमित्त म्हणूनच होती हे मी तेव्हाच ओळखले. अर्थात तो मात्र जणू काय खरोखर साफ करण्यात सारे लक्ष गुंतले आहे असे दर्शवीत काही वेळ पुशीत राहिला.

मग हळूच माझ्याकडे वळून म्हणतो, "मिस, तुम्हाला खरोखरी आमच्याकडे येऊन आपण काही घेऊन जाऊ शकू असे वाटते काय?"

"का नाही? आता तुमचीच कोळशाच्या खाणीतल्या मजुरांची T. U. (मजूर संघ) पहा ना. केवढी जबरदस्त संस्था आहे. तशीच कापडाच्या गिरण्यातल्या मजुरांची. आमच्याकडे अजून इतके जबरदस्त असे काही सुद्धा नाही. शिवाय तुमच्याकडे Unemployment Insurance (बेकार भत्ता), Health Insurance (आरोग्य विमा) असल्या कायद्यांनी किती सुधारणा घडवून आणली आहे. जन्मापासून मरेपर्यंत निरनिराळ्या निमित्ताने तुमच्या देशातील गरीब माणसाला कायद्याने थोडे फार, बरे वाईट, कसे का असेना, संरक्षण दिले आहे. पण आमच्याकडे तसे काही नाही. Old age pension (म्हातारपणाचे पेनशन) जाऊ द्या. पण एखादा म्हातारा अगदी अंथरुणावर पडला, तर केवळ सगेसोयरे, शेजारी यांच्या भलेपणावर विसंबून राहिल्याशिवाय त्याचे हाल कुत्रासुद्धा खाणार नाही!"

ब्राईट माझ्याकडे अगदी सरळ रोखून पाहू लागला. बहुधा माझी खोली

साफ करणारा तो एक यःकश्चित नोकर हे तो क्षणभर विसरला असावा.

एकदम गंभीर आवाजाने तो म्हणाला, "Miss, Take it from me (बाई, माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवा) हे जे सर्व तुम्हाला वरवरचे दिसते आहे, ती निव्वळ डागडुजी आहे आणि खरोखर त्याचा काही काही उपयोग नाही. आमच्या ह्या सर्व संस्था, कायदे, सुधारणा ह्यानी खरोखर मूळ प्रश्न आम्ही सोडवला आहे असे तुम्हाला वाटते काय? तसे असेल तर ही बेकारांची, भुकेकंगालांची संख्या फुगत का चालली आहे? सरकार त्याकरता काय करते आहे? बेकार भत्ता! हं! आणखी काही नाही! बेकार भत्ता व त्याबरोबर हळूच Means test! (साधनांचे परीक्षण)! कसे ठरवणार आहेत हे Means test! मी म्हणतो काम द्या, नाही तर सरळ पूर्ण बेकार भत्ता द्या. ही फसवणूक कशाला!"

आपण मिस लीचकडे खोल्या साफसूफ करून झाडायला नोकर आहो हे तो आता पूर्णच विसरला.

"म्हणे बेकार भत्ता! बाई, मी तुम्हाला सांगतो, खरोखर या बेकार भत्त्यासारखे अपमानास्पद काही नाही. बेकार भत्ता का म्हणून? लोखंडाच्या कांबीसारखे एवढे आमचे हात चांगले कामाला समर्थ असताना घरात निरुद्योगी आळशी राहून अपमानास्पद बेकार भत्ता घ्यायचा!"

हाइड पार्कमध्ये पेटीवर उभे राहून भाषण करणाऱ्या रस्त्यांतील वक्त्यांची मला आठवण झाली.

"मिस, तुम्हाला खरोखर माहिती पाहिजे असेल तर माझ्या बरोबर माझ्या परगण्यामध्ये चला. आणि मग पहा. या सर्व सुधारणा, कायदे, संस्था यांच्या रंगसफेतीखाली दडून असलेले खरे इंग्लंड तेथे तुम्हाला दिसेल. आज तेथे माझ्यासारखे किती दणधाकट लोक घरी स्वस्थ बसून आहेत. काम करावे तर काम नाही—एवढेच नव्हे, काम मिळण्याची सुद्धा जबरदस्त आशा दिसत नाही. मी तुम्हाला सांगतो, माझ्यासारखे चांगले एवढे दणधाकट लोक पण घरी बसून निव्वळ कुजून जात आहेत. रोज सकाळ झाली की धाकटी घरातली पोरगी—तिला काम मिळते—ती कामाला जाते. येवढेच नव्हे, मिसेसला सुद्धा काम लागते. आणि माझ्या

सारखाच दणकट माणूस–मोठा पोरगा–ह्यांना काम नाही. त्यांची मजुरी भारी—धंद्याला झेपत नाही.

"मनुष्याला—पुरुषाला—यापेक्षा अपमानास्पद आणि लाजिरवाणे ते काय असेल? चांगली दणकट धीराची माणसे ती, बोलत नाहीत. जवळच्या Pub मध्ये (गुत्यामध्ये) जातात आणि दारू पितात—सगळे विसरून झिंगून जाईपर्यंत दारू पितात. आणि मग घरी आल्यावर आपल्या कणखर हातांची रग मिसेसवर (बायकोवर) काढतात.

"मग ही तुमच्या परोपकारी संस्थेतली माणसे त्यांना दारू पिऊ नये, झिंगू नये, म्हणून उपदेश करायला येतात. बेकारांच्या संस्था काढून त्यांना विरंगुळा वाटावा म्हणून शिकवतात, नाटके करतात. खरोखर अशा पोरी येऊन काही सांगू लागल्या, की मला एक चांगला दांडका घेऊन पाठीत घालावा असे वाटू लागते.

"मिस, मी आता तुम्हाला झाडताना दिसतो आहे. तुम्हांला वाटेल, हा यःकश्चित झाडूवाला, याला काय कळते? पण मी सांगतो, खाणीतल्या यःकश्चित मजुरापासून तो पार्लमेंटचा मेंबर होण्यापर्यंत मी स्वतःच्या कर्तबगारीने चढत गेलो आहे. मी एम. पी. (मेंबर ऑफ पार्लमेंट) होतो. माझ्या काउंटीतर्फे निवडून आलो होतो."

त्याचे शब्द ऐकताच मी आश्चर्याने जवळ जवळ थिजून त्याच्याकडे पाहू लागले. माझ्या कानावर माझा विश्वास बसेना. आमच्यावर राज्य करणाऱ्या एका मोठ्या महान साम्राज्याची सारी सूत्रे हलविणाऱ्या एका सभेचा हा सभासद! आणि तो माझ्या खोलीत झाडू फिरवतो आहे? माझे डोळेही विश्वास ठेवायला तयार होत ना.

आतापर्यंत हा नीट बोलला खरा. पण अजून रात्री चढलेली याची नशा पुरी उतरलेली नसावी!

अखेर माझ्या सर्व खळबळीचा शेवट म्हणून माझ्या चेहऱ्यावर फक्त हसू मात्र उमटले.

"खरंच मिस, मी अगदी शुद्धीवर असून बोलत आहे. मी सारे पाहिले आहे, अनुभवले आहे. आणि म्हणूनच या सर्व परोपकार संस्था, त्यांची

सहानुभूति, यांचे खरे स्वरूप मला माहीत आहे.

"बोलल्याचा राग मानू नका, पण अगदी खरे सांगतो, या सर्व संस्था, —यांची सहानुभूती--निव्वळ वरवरची, कोरडी आहे. भोगल्याशिवाय त्याला खरा पीळ येतच नाही. त्या मोठ्या संपात आज हा आमच्याशी सहानुभूती दाखवणारा 'मधला वर्ग', त्यांच्या संस्था, यांनी दुसऱ्या बाजूला मदत केली नसती तर आम्ही संपही हरत नव्हतो आणि काही होत नव्हते. मग १९२९ तल्या सारखा संपाचा कायदा पास करण्याची House ची (पार्लमेंटाची) काय बिशाद होती! आमच्याबरोबरच भरडला जात असलेला हा 'मध्यम' वर्ग आमच्याशी सहकार्य करील असे आम्हांला वाटले. पण ते दुसऱ्या बाजूला झाले. खरोखर त्यांनीच मजुरांच्या चळवळीचे पेकाट मोडल्यासारखे केले.

"म्हणे या लढ्यात त्रयस्थाची गैरसोय! Hang it (मरू द्या). अरे जेथे स्वतःचा गळा सापडतो आहे तेथे त्रयस्थाची कोण परवा करतो! पण त्यांना तेवढीच स्वतःची सोय गैरसोय दिसते. मी खरोखर सांगतो, तुमच्या या 'मधल्या वर्गा'ला जोपर्यंत स्वतःला गैरसोय किंवा धक्का सहन करावा लागला नाही, तोपर्यंतच तुम्ही मजुरांशी सहानुभूती दाखविता, त्यांची दुःखे वेशीवर टांगण्याचा आव आणता, भांडवलशाहीशी झगडण्याचे सोंग करता. पण जरा धक्का लागला की तुम्ही सरलाच दुसऱ्या बाजूला. हे त्यातले तथ्य म्हणा, सत्य म्हणा, काय आहे ते आहे."

"असेल, पण तुम्हाला इतके कळू लागायला सुद्धा अखेर असलेच प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. तसे नसते तर आज इंग्लंडातील मजुरांची स्थिती काय असती?"

"हं, ते खरे! अगदीच नाही असे नाही"—बोलण्याच्या कैफातून फिरून भानावर यावे–तसे होऊन त्याने उत्तर दिले.—"तरी पण त्याचे व्यर्थत्व पटल्याखेरीज राहत नाही...

"अरे बापरे! अकरा वाजले की." घड्याळाकडे पाहत त्याने उद्गार काढले. बसला गेले पाहिजे म्हणून दार बंद करून हूवर ब्रश उचलून तो खालची खोली झाडायला गेला.

थोडा वेळ मीही माझा अभ्यास सोडून त्याच्या बोलण्याचा विचार करीतच राहिले.

दोन दिवसानी संध्याकाळी माझ्या खोलीत पाणी ठेवण्याकरता ब्राईट आला, तेव्हा त्याच्या हातात एक पाकीट होते.

"मिस, तुम्हांला एक गंमत दाखवू का?"

"अवश्य. ब्राईट, काय आहे ते?"

ब्राईटने M. P. (पार्लमेंटचा सभासद) असताना आपल्या शायरमध्ये संपाबद्दल भाषण करीत असतानाचे स्वतःचा फोटो असलेले एक कटिंग आणले होते.

माझी खात्री पटली. खरंच तो M. P. होता. मी त्याला बरे वाटावे म्हणून भाषण वाचण्याच्या निमित्ताने त्याचे कटिंग ठेवून घेतले. त्यानंतर अशीच चौकशी करता मला कळले की संपानंतरच्या निवडणुकीत तो हरला. त्याच्या बऱ्याच एकांगी वृत्तीकडे झुकणाऱ्या मतांमुळे त्याचे कामही गेले. खाणीतही काम मिळेना, तेव्हा तो इकडे आला व तेव्हापासून लंडनमध्येच काम करून राहतो आहे.

पोरेबाळे बायको कोणी नाहीत त्याला?

वा:! सारी आहेत तर काय झाले! पण हा चिकार पितो. कसे पटणार त्यांचे याच्याशी—??

• • •

कृष्णाबाई मोटे : या नुसत्याच लेखिका नाहीत तर एक अभ्यासू व डोळस समाजकार्यकर्त्या आहेत. त्यांच्या लिखाणाला प्रत्यक्ष कार्याची पार्श्वभूमी आहे. महर्षी अण्णासाहेब कर्व्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोविली त्यावेळी त्यांच्या या उदात्त कार्यामध्ये अगदी सुरुवातीला आलेल्या विद्यार्थिनींमध्ये कृष्णाबाई व बाळूताई (सौ. मालती वेडेकर) या खरे भगिनी होत्या.

हिंगणे येथील शालेय व महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर कृष्णाबाईंनी १९२२-२३ मध्ये पुणे येथील कन्याशाळेत आणि १९२३ ते २८ पर्यंत अमरावती येथील मुलींच्या सरकारी शाळेत मराठी व संस्कृत शिकविले. अमरावती येथे त्यांचा संबंध कु. मॉट (विवाहानंतर सौ. व्हिवियन बोस) या अमेरिकन तरुणीशी आला आणि दलित समाजाच्या उध्दारासाठी त्यांच्याबरोबर त्यानी १९२८-२९ मध्ये काम सुरू केले. समाजकार्याचे हे व्रत घेऊनच कृष्णाबाई १९२९ साली मुंबईच्या नायगाव सेंटरमधे आल्या आणि कामगार स्त्रिया, व मुले यांच्या कल्याणार्थ झटल्या. त्यानंतर त्या कामगार कल्याण विषयाचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेल्या आणि १९३२-३४ या काळात लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचा अभ्यास करून सोशल सायन्सचा डिप्लोमा त्यानी मिळविला.

भारतात आल्यावर त्यांनी मुंबई येथे कामगार कल्याण केंद्राच्या स्त्री-मुले विभागाच्या प्रमुख म्हणून काम केले.

१९४४ ते १९५९ पर्यंत राज्य सरकारच्या स्त्री-कर्मचाऱ्यांच्या कल्याण अधिकारी म्हणून आणि नंतरच्या सहा वर्षात (१९५९ ते ६५) महाराष्ट्र बालविकास समितीत संघटक म्हणून काम करून १९६५ साली त्या नोकरीतून निवृत्त झाल्या. **'काळाची पावले'** हे स्त्रिया व मुले यांच्या प्रश्नांचा विचार करणारे त्यांचे पुस्तक तसेच **'मीनाक्षीचे जीवन'** या प्रकाशित पुस्तकांखेरीज आपल्या आवडत्या विषयांवर त्यानी विविध स्वरूपाचे लिखाण केले आहे.

• • •



REFBK-0023021

ललित गद्य

१	माझ्या आजोळची वाट : प्र. श्री. नेरूरकर	१०-००
२	तामिळनाडचे संगमकालीन सुवर्ण युग : ज. शा. देशपांडे / वि. वा. जोग	
३	उधानवारा : भानू शिरधनकर	३-००
४	चिडिया घर ,, ,,	७-००
५	घनु वाजे घुणुघुणा : ,, ,,	८-००
६	पाखरे भिरभिरती अंबरी : ,, ,,	२०-००
७	चोरटं सोनं : ,, ,,	६-००
८	तिळफुले : विद्याधर भागवत	७-००
९	विज्ञान गवाक्ष : डॉ. पु. ज. देवरस	८-००
१०	खलाटी : म. ना. पाटील	७-००
११	गर्भश्रीमंतीचं झाड : पद्मजा फाटक	१२-००
१२	नरकपुरी गवसली : श्री. अ. डांगे	८-००

अभिनव प्रकाशन, मुंबई १४.